# माणूस

शनिवार । १० जुलै १९७६ । साठ पैसे

## सप्रेम नमस्कार

श्री. रा. रा. संपादक ' माणूस ' यांस,

श्री. इनामदारांच्या कहाणीत श्री. भोपटकरांचे मत होते की, डॉ. परचुरे यांस फाशी अवश्य होईल. त्याचप्रमाणे माझे मित्र मध्यप्रदेशचे हायकोर्ट-जज्ज जस्टिस **' अब्दुल हकीम खान '** यांचेही मत होते. इनामदार दिल्लीला गेल्यावर एक दिवस जस्टिस माझ्याकडे आले व म्हणाले, ' खोतसाब, आपके दोस्त इनामदारनें डॉ. परचुरे की केस ली है, ऐसा सुना है. क्या वह केस जितेंगे? ' मी म्हणालो, ' जरूर जितेंगे. " ते म्हणाले, " आप नजुमी है. नजुम के बारे में कुछ नही कह सकता, लेकिन डॉ. परचुरे नें ' कबुली जबाब ' दिया है, और वह आपके दोस्त जज्ज ' अटल 'नें लिया है. उन्होंनें जो मुझे बताया उससे मुझे मालुम होता है की कायदेसे डॉ. परचुरे को **सजा जरूर मिलेगी.** "

पुढे इनामदार सिमल्याच्या हायकोर्टात केस जिंकले व डॉ. परचुरे निर्दोष सुटले.

ज्या दिवशी इनामदारांकडून जिंकल्याची बातमी आली, त्याच दिवशी संध्याकाळी हायकोर्टहून माझे मित्र माननीय हायकोर्ट जज्ज जस्टिस अब्दुल हकीम खान माझ्या घरी आले व म्हणाले, " मुबारिक हो ! और मेरे तरफसे आप इनामदार को मुबारिक देना. उन्होंनें यह केस अच्छी चलाई और भाग ने भी उन्हें मदत की.'

सांगायचे एवढेच की, ही अशक्य गोष्ट केवळ इनामदारांनी अति मेहनतीनें साध्य केली आणि दैवानेंही त्यांना साथ दिली !

**–दत्तात्रत खोत,** ग्वाल्हेर

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक पाचवा

१० जुलै १९७६

मूल्य : साठ पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


### मुक्काम : मुंबई

# नाटक आणि प्रचार : काही विचार

३० तारखेला शेवटच्या बुधवारी प्रघाताप्रमाणे 'रूपवेध 'ने रामनारायण रुइया महाविद्यालयात 'नाटक आणि प्रचार ' ह्या विषयावर चर्चा आयोजित केली होती. चर्चेची खासीयत म्हणजे 'उद्ध्वस्त धर्मशाळा 'कार गो. पु. देशपांडे चर्चेला हजर होते. नेहमीप्रमाणे सौ. पुष्पा भावे, डॉ. श्रीराम लागू इत्यादी मंडळी हजर होतीच, शिवाय 'सत्यकथा 'चे राम पटवर्धन आणि अशोक दातार (दातारांचा आवाज बसल्यामुळे ते चर्चेत भाग घेऊ शकले नाहीत.) हेही हजर होते. चर्चेची सुरुवात सौ. पुष्पा भावे ह्यांनी केली.. प्रचार आणि अनुनय ह्यात फरक आहे– बाळ कोल्हटकरी नाटके अनुनय करतात, प्रचार करत नाहीत असा एक महत्त्वाचा मुद्दा त्यांनी मांडला. विषयाची तोंडओळख करून देण्याची भावेबाईंची हातोटी चांगली असल्याचे परत एकदा जाणवले.

गो. पु. देशपांडे बोलताना अत्यंत मुद्देसूद बोलले. आपले विचार त्यांनी सहा मुद्द्यांत मांडले. इतका मुद्देसूद बोलणारा मराठी नाटककार पाहून आणि ऐकून खरोखरच आनंद झाला. देशपांड्यांच्या संपूर्ण बोलण्यात एकही वाक्य 'off the track' नव्हते, टिपून आणलेला एक एक मुद्दा उच्चारून त्यावर ते भाष्य करीत होते. त्यांनी बोलण्याची सुरुवातच राजकारणापासून केली. राजकीय परिस्थितीचा आणि स्टेजचा अगदी निकटचा संबंध आहे. नाटकांत राजकीय परिस्थितीचा संदर्भ आला, तर त्यात आश्चर्य नाही. मूल्यव्यवस्था आणि प्रचाराचाही घनिष्ट संबंध आहे. मान्य नसलेली मूल्यव्यवस्था कोसळून पडण्यासाठी नाटक हासुद्धा एक प्लॅटफॉर्म आहे, अशा आशयाचा विचार त्यांनी बोलून दाखवला. नाटकांतून होणारा प्रचार हा कसा असावा ह्याचे उत्तर नाटकाचा मूल्यव्यवस्थेशी असलेला संबंधच देईल! प्रचलित आणि सन्मान्य मूल्यव्यवस्था जर अमान्य असेल, तर ती फोडण्यासाठी नाटक ह्या माध्यमाचा वापर जरूर व्हावा–हा त्यांचा दुसरा मुद्दा. 'गडबडीत एखादा हुंकार ऐकू येणे शक्य नसते; पण भयाण शांततेत मात्र तोच हुंकार प्रकर्षाने जाणवतो.' आरडाओरड्यात असे अनेक हुंकार लोप पावतात! त्यापुढील म्हणजे तिसऱ्या मुद्द्यात देशपांड्यांनी औद्योगीकरणाच्या परिणामांवर प्रकाश टाकला. कालनिरपेक्षतेच्या कसोट्या कोणत्या? तेराव्या शतकातील माणूस आजचे नाटक पाहू लागला तर त्याला काय वाटेल? कालमानाप्रमाणे नाटक बदलते आणि ह्यात सर्वांत महत्त्वाची भूमिका औद्योगीकरणाने केली आहे. औद्योगीकरणाने माणसाची मुक्तता नष्ट झाली आहे, माणसाच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला आहे. आता हा विचार लक्षात घेऊन आजची नाट्यकला पाहू गेलो, तर नाटकात झालेल्या बदलांचे उत्तर मिळेल. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची स्वायत्तता नष्ट झाल्यावर कलेची स्वायत्तता ती काय उरणार? कलावादी आणि जीवनवादी अशा दोन दृष्टिकोनांतून नाट्यकलेच्या प्रवासाचा विचार करायला हवा. पारंपरिक (Traditional) नाटक हे नेहमीच Static लेव्हलवर राहिलेले आहे, परंतु आजचे नाटक आपण पाहू गेलो तर, त्यातील Dynamic Approach आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही. ह्या संदर्भात त्यांनी आधुनिक संवेदनशीलतेचा उल्लेख करून 'महाराष्ट्र टाईम्स 'च्या एका गाजलेल्या अग्रलेखाचे उदाहरण दिले. (ह्या अग्रलेखात बाळ गंगाधर टिळक, बा. सी. मर्ढेकर आणि बाळ कोल्हटकर ह्यांना रांगेत बसवण्यात आले होते.) त्यांच्या चौथ्या मुद्द्यात ते सरंजामशाहीकडे वळले. सरंजामशाही आणि आधुनिक जग ह्यात जी पोकळी आहे ती Bridge झाली पाहिजे, भरून निघाली पाहिजे. आधुनिक काळात संवेदनशीलता संपूर्णपणे बदलून गेली आहे. ह्या इतक्या बदलाचे कारण

म्हणजे, सरंजामशाही ते आजचे आधुनिक जग ह्यातील पोकळी होय. संवेदनाशीलतेच्या नवीन आविष्काराचे निश्चितच स्वागत व्हायला हवे, पण हे स्वागत करताना पोकळी भरून काढायचे विसरून चालणार नाही. प्रचारकी नाटक चांगले की वाईट— तर ते वाईट नक्कीच नव्हे. हा देशपांड्यांचा पाचवा मुद्दा. नाटकातील प्रचारशक्ती ही एक तलवार आहे, ती नीट वापरता यायला हवी. प्रचारकी नाटक हे चांगले नाटक असा मुद्दा जरी देशपांड्यांनी मांडला नाही, तरी ते त्याच्या बरेच जवळ जाऊन आले. प्रत्येक नाटक प्रचारकी असते आणि त्याच्या प्रचाराचा संबंध मूल्यव्यवस्थेशी असतो. नाटकाचा मूल्यव्यवस्थेविषयी दृष्टिकोन कसा व्यक्त होतो ह्यावर प्रचारकी नाटक चांगले की वाईट हे ठरवायला हरकत नाही. आपल्या सहाव्या, आणि शेवटच्या मुद्द्याशी आपण स्वतःच संपूर्णतः सहमत नसून आपला त्याबाबतीत थोडासा गोंधळ झाला आहे अशी प्रांजळ कबुली देत त्यांनी मुद्दा मांडला. प्रचलित मूल्यव्यवस्था जर नामंजूर असेल, तर मंजूर नसलेल्या मूल्यव्यवस्थेवरच्या चांगल्या नाटकाचे स्वागत करावे का? संक्रमणशील समाजात नेहमीच चांगली कलाशक्ती आढळते व चांगली कलाशक्ती स्वागतशील असते. आधुनिक काळात 'अनुनयी' नाटके लिहिणारा नाटककार प्रेक्षकांच्या पन्नास पावले मागे असेल. शेवटी कलापूर्ण आणि कलाहीन आक्रमणांचा उल्लेख करून त्यांनी आपले बोलणे संपवले.

त्यानंतर श्री. राम पटवर्धन उभे राहिले. सुरुवातीलाच इथे लेफ्टिस्ट हवे होते असे मला वाटत होते, पण माझी ती इच्छा पूर्ण झाली. देशपांड्यांना उत्तर द्यायला बरेच लेफ्टिस्ट उपस्थित आहेत, अशी काहीशी तिरकी सुरुवात त्यांनी केली. पुढे त्यांनी 'रूपवेध' चा उल्लेख केला तेव्हा त्यांनाच खात्री नव्हती की, चर्चा 'रूपवेध' ने आयोजित केली आहे की आणखी कोणी? सौ. पुष्पा भावेंकडून त्यांनी ह्याबद्दल खात्री करून घेतली. लोकांना हा एक विनोद वगैरे वाटला तो भाग अलाहिदा. राम पटवर्धन इतर सर्वसाधारण वक्त्यांप्रमाणे नाटक व नाटककाराच्या अडचणींकडे वळले. नाटकात तेच तेच मुद्दे फार येतात असे म्हणत त्यांनी नाटक हा शंभर टक्के साहित्यप्रकार नव्हे, त्याची संहिता कदाचित......वगैरे मते त्यांनी मांडली. त्यांचा बोलण्याचा एकंदर ओघ देशपांड्यांच्या मुद्द्यांच्या विरुद्ध दिशेला वाटला. पण बोलणे मुद्देसूद व व्यवस्थित नसल्यामुळे त्यांना आपला दृष्टिकोन पटवता मात्र आला नाही. चिरंतर मूल्ये देशपांड्यांच्या कल्पनेच्या चौकटीपलीकडे आहेत. कालातीत मूल्ये 'आज' च्यापेक्षा महत्त्वाची आहेत, मात्र आजचे प्रश्न, झगडे आधी सोडवले पाहिजेत ह्या संदर्भात त्यांनी भगवद्गीतेचा उल्लेख केला. Complexity चा विचार करता आधुनिक आणि पुरोगामी हे दोन्ही दृष्टिकोन विचारात घेतले गेले पाहिजेत. भगवद्गीता ही पुरोगामी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. ह्यापुढे त्यांनी सरळ सरळ देशपांड्यांच्या पाचव्या मुद्द्याच्या विरोधी असे विधान केले. चांगले नाटक प्रचारकी कधीही असत नाही. जेव्हा नाटकातला प्रचार जाणवतो तेव्हा प्रेक्षक ते नाटक Resist करतो, प्रचार डावलतो. हा महत्त्वाचा विचार मांडताना त्याचे विवरण मात्र अधिक खोलात जाऊन केले नाही. खरे तर हा विरोध मतैक्य नसेल तरच होईल, एरवी होणार नाही, हा विचार त्यांनी मांडायला हवा होता. प्रचार म्हणजे तो काही मान्य नसलेल्या विचारांचाच असेल असे नाही. 'मी मंत्री झालो'तील प्रचार कोण डावलेल? असो. पटवर्धनांना कमीतकमी प्रचारकी नाटक जास्तीतजास्त कलात्मक वाटते—वगैरे.

देशपांड्यांचे बोलणे इतके मुद्देसूद व स्वच्छ होते त्यामानानी पटवर्धनांची विधाने थोडी वरवरची आणि अधिक वैयक्तिक स्वरूपाची होती. ह्या दोघांच्याही बोलण्यावर कोणालाही प्रश्न विचारावासा वाटला नाही, ह्यात नवल नाही. पण तरीही डॉक्टर लागूंनी 'नाटकाने प्रचार होतो काय?' असा एक प्रश्न विचारला.

पण या प्रश्नाला देशपांड्यांनी पुन्हा नव्याने चांगले उत्तर दिले. पुढे एका संदर्भात बोलताना 'उद्ध्वस्त धर्मशाळा' बसवताना आपला प्रचाराचा हेतू वगैरे नव्हता, पण अँटिगनी बसवताना मात्र असा हेतू नक्कीच होता. आता 'अँटीगनी' ऐवजी अनेक नाट्यकृती मला ह्यासाठी मिळाल्या असत्या, पण अँटीगनी मला जास्त अपील झाली असा सडेतोड आणि मनमोकळा खुलासा लागूंनी केला.

ह्यानंतरची चर्चा थोडीशी मार्क्सिझम म्हणजे काय वगैरे ह्या धर्तीवर वाट पाहत होती. मार्क्सला मूलभूत बदल हवा होता म्हणून एका गृहस्थांनी एक इंग्रजी वाक्य फेकले. (तरी बरे, श्री. अशोक दातारांचा आवाज बसला होता.) वेळात चर्चा पूर्ण न झाल्यामुळे म्हणा किंवा अजून बऱ्याच लोकांना बरेच काही बोलायचे असल्यामुळे म्हणा, पुढच्या महिन्याच्या शेवटच्या बुधवारी पुन्हा 'नाटक आणि प्रचार' ह्या विषयावरच चर्चा करण्याचे ठरले आहे. ह्या चर्चेच्या वेळी अपेक्षित वक्ते मोकळ्या आवाजात बोलतील अशी आशा वाटते.

—जयंत साळगावकर

मुक्काम : पुणे

# संगीत नाटकांच्या निखळत्या परंपरेत नवा दुवा

## धाडिला राम तिने का वनी?

शिरीष सहस्रबुद्धे

नाटकाच्या नावावरून त्याच्याविषयी काही कल्पना करणं योग्य असेल तर, या नाटकाविषयी माझ्या मनात तरी, नावामुळे काही विशेष अनुकूल ग्रह निर्माण झाला नव्हता. एक तर नाव प्रश्नात्मक, त्यामुळे काहीसं विचित्र आणि पुन्हा अवजड, लांबलचक, त्यातही 'धाडिला' सारखा कठोर वर्णांचा कमी प्रसाराचा शब्द सुरुवातीला. थोडंफार कुतूहल निर्माण करणं हाच त्याचा एकमेव गुणविशेष. तथापि अशा नावाचं नाटक पाहिल्यानंतर 'नावात काय आहे?' या सवालाची सच्चाई पटली खरी.

तेव्हा 'धाडिला राम तिने का वनी?' हे दाजी भाटवडेकरदिग्दर्शित संगीत नाटक मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेनं सादर केलं आहे. आद्य संस्कृत नाटककार भास याच्या 'प्रतिमा' नाटकाचं हे स्वैर मराठी रूपांतर चित्रकार द. ग. गोडसे यांनी केलेलं आहे. विशेष म्हणजे या नाटकाची त्यांनीच केलेली नेपथ्यरचना ही भरतमुनी-

निर्मित नाट्यशास्त्राच्या आधाराने केलेली आहे. 'मुद्राराक्षस' या नाटकासाठी तयार केलेल्या खास भरतवर्णित रंगमंचात आवश्यक ते फेरफार करून हा रंगमंच तयार करण्यात आला होता. या रंगमंचाचे प्रमुख घटक चार : रंगपीठ, रंगशीर्ष आणि दोन मत्तवारणी. रंगपीठ आणि रंगशीर्ष हे सर्वसामान्य उंचीचे स्टेज आणि त्यावरची एखादी 'लेव्हल' याच स्वरूपातले, पण अधिक सुशोभित. चार नक्षीदार खांबांवर तसेच छप्पर असलेली, मंडपी किंवा मेघडंबरीसारखी दिसणारी मत्तवारणी ही मात्र तशी अनोळखी बाब. एकूण दिसायला रंगमंच देखणा. राजवाड्याच्या निरनिराळ्या भागांपासून वनवासापर्यंतचे सर्व प्रसंग याच रंगमंचावर बदल न करता घडत होते. हे सर्व विस्तारानं लिहायचं कारण हेच की, अशा परिस्थितीत रंगमंचरचनेसाठी भरतमुनीपर्यंत धाव घेण्याचे निश्चित प्रयोजन कुणी समजावून दिलं, तर ते योग्य होईल. विशेषतः भरत नाट्यमंदिराच्या 'मिनि-स्टेज'वर हा मत्तवारणी वगैरेंचा दिमाख मोकळ्या हालचालींना बाधक ठरणार, हे निश्चितच. 'आजच्या नाट्यगृहात भरतकालीन रंगमंच कशाप्रकारे उभारता येईल, या दृष्टीने केलेला हा प्रयत्न आहे' ही गोष्ट ठीक आहे, पण एक नवा (?) प्रयोग याशिवाय त्याचा काही व्यावहारिक फायदा आहे काय? की जुनं नाटक म्हणून जुना रंगमंच एवढाच भावनात्मक व्यवहार त्यामागे आहे? पुन्हा, 'रंगशीर्ष आणि मत्तवारणी म्हणजेच राजवाड्यापासून झोपडीपर्यंत सर्व काही', असंच जर प्रेक्षकांना जाणून घ्यावं लागत असेल, तर 'लेव्हल्स' किंवा 'सिम्बॉल्स'ची आधुनिक नेपथ्यरचना कुठं कमी पडते? थोडक्यात, या भरतमुनीवर्णित रंगमंचामुळे या नाटकात नक्की काय फरक पडला, लाभ घडला, याबद्दल खुलासा होण्याची जरूरी आहे. केवळ भरतपरंपरेच्या जयजयकारावरच प्रकरण संपू नये.

असो. नाटकाच्या नावातील 'तिने' हा शब्द अर्थातच कैकेयीचा संकेत करतो, आणि त्यानुसार नाटक बरंचसं कैकेयीभोवती केंद्रित झालं आहे. भासानं आणि अर्थातच गोडशांनी यातील कैकेयीचं पात्र अगदी वेगळ्या तऱ्हेनं रंगवलं आहे. भासकाली प्रचलित असलेल्या रामकथेशी कदाचित ते सुसंगत असावं. सध्या प्रचलित असलेल्या रामायणात कैकेयीची भूमिका ही उणीअधिक खलनायिकेचीच आहे. भासानं रंगविलेल्या कैकेयीच्या वेगळेपणामुळे भासकालीन रामायणातील कैकेयीच्या व्यक्तिरेखेवर वेगळा प्रकाश पडतो आणि एरवी रोषास पात्र होणारे हे पात्र प्रेक्षकांची सहानुभूती मिळविताना दिसते. कैकेयीनं रामाला वनवासी केलं ते निव्वळ स्वार्थापोटीच असं जनसामान्य मानतात. हे नाटक मात्र तिच्या या कृतीचं अतिशय नाट्यपूर्ण आणि तर्कनिष्ठ समर्थन करतं आणि त्यामुळेच कैकेयीची व्यक्तिरेखा सांकेतिक, ढोबळ, भडक न होता सूक्ष्म व स्वाभाविक बनते. कैकेयीने रामाला वनवासात का पाठवलं, हे या नाटकातील एक कुतूहल आहे आणि ते कुतूहल कायम ठेवण्याच्या उद्देशानेच 'धाडिला राम तिने का वनी?' असं प्रश्नार्थक शीर्षक या मराठी रूपांतराच्या रंगावृत्तीला देण्यात आलेलं आहे. भासाच्या प्रस्तुत नाटकातील भूमिकांच्या चित्रणावरून भासकालीन रामकथेचं स्वरूप स्पष्ट होतं. भासाचा राम मनुष्य आहे; देव नाही. त्याचप्रमाणे भासाचा रावणही मनुष्य आहे; राक्षस नाही. भासाचे राम-रावण व इतर पात्रे मानवी व ऐहिक वाटतात. मनुष्यस्वभावातील बरेवाईट गुण त्यांच्याही ठिकाणी आढळून येतात. रामाच्या देवत्वाची कल्पना कदाचित रामायणाच्या नंतरच्या आवृत्तींच्या काळात दृढमूल झाली असावी.

भासाचं प्रतिमा नाटक सात अंकी आहे. या रूपांतरात ते चार अंकांत बसविण्यात आलं आहे. पहिले दोन अंक मिळून पहिला अंक, पुढचे दोन अंक मिळून दुसरा अंक, पाचवा अंक म्हणजे तिसरा अंक आणि शेवटचे दोन अंक मिळून चौथा अंक अशी ही विभागणी आहे. मूळ संहितेतली काही प्रकरणं किंवा काहींचा आशय या चार अंकांतच समाविष्ट करून घेण्यात आला आहे. प्रतिमा नाटकाचं कथानक वाल्मीकीच्या रामकथेवरच आधारलेलं असलं तरी, नाट्यरचनेच्या सोयीसाठी भासाने काही घटना स्वतःच्या कल्पनेनं नवीन घातल्या आहेत. पहिल्या अंकातील सीतेने हौसेनं वल्कले नेसण्याचा प्रसंग, राम-रावण भेट, वडिलांच्या श्राद्धातील आवश्यक वस्तू म्हणून रामाने कांचनमृगाचा पाठलाग करणं, या सर्व प्रसंगातील लक्ष्मणाची संपूर्ण अनुपस्थिती, तपोवनातच कैकेयीच्या उपस्थितीत रामाला करण्यात येणारा राज्याभिषेक या साऱ्याच घटनांचे उगमस्थान भासाची नाट्यप्रतिभा हेच आहे. वाल्मीकीरामायण हे नव्हे. भासकालीन भारतीय समाजाच्या लोकव्यवहारांचे, श्रद्धानिष्ठांचे वेगळेच दर्शन त्यातून घडते.

'धाडिला राम...' हे नाटक प्रतिमा नाटकाचं शब्दशः भाषांतर नव्हे. भासाची भाषा अतिशय अल्पाक्षरी आणि गतिमान आहे. कमीत कमी शब्दांत अधिकात अधिक आशय सूचित करणारी आहे. भासकालीन विशिष्ट भावविश्वाची ती भाषा आहे. इतर कालखंडात या भाषेचं शब्दशः भाषांतर करून भासाला अभिप्रेत असलेला आशय नेमकेपणानं व्यक्त करणं शक्य नाही. कै. ब. रा. हिवरगावकर यांनी केलेलं 'प्रतिमा' व अन्य भासकृत नाटकांचं शब्दनिष्ठ भाषांतर माझ्या पाहण्यात आलं होतं. तथापि तो उत्तम भाषांतरकर्तृत्वाचा नमुना होता, नाट्यलेखनाचा नव्हे. 'धाडिला राम...'ची संहिता व हिवरगावकर किंवा अन्य कुणी केलेलं प्रतिमाचं भाषांतर यांची तुलना करून पाहिली असता लक्षात येतं की, प्रस्तुत नाटकाची संहिता हे प्रतिमाचं बरंच स्वैर भावरूपांतर आहे; आणि रूपांतर करतानासुद्धा अनेक ठिकाणी वाक्ये व प्रकरणे या दोन्ही अंगांनी ते सविस्तर करून मूळ नाटककाराचा आशय स्पष्ट करावा लागला आहे. अर्थात नाटकातील प्रतीके, प्रतिमा आणि व्यवहार ध्यानात घेता, भासाच्या मूळ आशयाला किंवा प्रतिमासृष्टीला फारसा धक्का पोचणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली दिसते. काही ठिकाणी नाट्यप्रसंगांचं स्वरूप विशद करण्यासाठी किंवा भूमिकांचं अंतरंग उघड करून दाखविण्यासाठी मुळातील संवाद सविस्तर केले आहेत, तर कुठे मुळात नसलेली स्वगते अंतर्भूत केलेली आहेत.

वाल्मीकीरामायणातील दुसऱ्या व तिसऱ्या कांडातील घटनांवर आधारित असलेल्या

या नाटकाची कथावस्तू वगैरे काही सांगण्यात मतलब नाही. सर्वसामान्यांना आणि विशेषतः भाविकांना रामकथा अवीट गोडीची वाटते, यातच नाटकाच्या कथानकाचे बरेचसे यश आले. कैकेयीच्या व्यक्तिरेखाटनातली अविश्वसनीय वाटावीत इतकी वेगळी वळणं हे नाटकाचं दुसरं वैशिष्टय आणि तिसरं महत्वाचं वैशिष्टय म्हणजे संगीत नाटकाच्या मृनवत परंपरेमध्ये एखादा तरी आशेचा किरण ठरावा अशा दर्जाचं हे नाटक निश्चितच आहे. दशरथाला पुत्रशोकानं मृत्यू येण्यासंबंधी मिळालेला शाप, पुत्राचा अपमृत्यू होऊन खरा ठरण्याऐवजी पुत्राच्या क्षणकालीन वियोगाने खरा ठरावा या सदहेतूनेच कैकेयीनं रामनववासाची योजना आपल्या खास वचनांमार्फत सुचविली असं स्पष्टीकरण देऊन भास कैकेयीला दोषमुक्त ठरतो. हा प्रकार तर्कबुद्धीला रुचणारा असला तरी, रूढीला मानवणारा नाही. अर्थात या स्पष्टीकरणामुळे कैकेयीवर परंपरेनं मारलेला घातकीपणाचा शिक्का अनाठायी ठरतो आणि तिच्या समंजस, सोशिक आणि सहृदय प्रवृत्तीबद्दल प्रेक्षकांना साहानुभूती वाटल्यावाचून राहत नाही. तथापि 'घाई–अस्वस्थतेमुळे चौदा दिवसांऐवजी चौदा वर्षांचा वनवास मागितला गेला' ही कारणमीमांसा कुठल्याही तर्कचौकटीत बसणारी नाही

या नाटकात सुमारे डझनभर गाणी आहेत. त्याची अंकवार विभागणीही फारशी विषम नाही. सीतेच्या तीन गाण्यांपैकी पहिल्या अंकातील 'लेऊ कशी वल्कला' आणि तिसऱ्या अंकातील 'घाई नको बाई अशी' ही दोन विशेष लक्षात राहण्याजोगी होती. याशिवाय 'जीलोकां विस्मय हा' (रामचंद्र) 'मंद मंद ये समीर' (भरत) आणि मी जाया धर्ममया' (कैकेयी) ही गाणीही लक्षवेधी ठरली. श्री. नारायण बोडस (राम), श्री. अरविंद पिळगावकर (भरत), सौ. रजनी जोशी (कैकेयी) आणि श्री. आशा खाडिलकर (सीता) या चौघांनीही आपापली गाणी आणि अभिनय या दोन्ही दृष्टींनी चांगली खुलवली आणि नाटकाच्या संगीताच्या व पर्यायानं नाटकाच्या यशाला मोठा हातभार लावला. विशेषतः 'घाई नको बाई अशी' या गीताला आंगिक व मुद्राभिनयाची सर्वाधिक समर्थ जोड सौ. आशा खाडिलकर यांनी करून दिली. अर्थात आंगिक अभिनयाचं, विशेषतः मोकळ्या हालचालींचे प्रमाण कमी पडल्याचंही काही गाण्यांच्या वेळी जाणवलं. श्री. बोडस (राम) यांच्या गाण्यात्र परीक्षण या दृष्टिकोनातून उदाहरण म्हणून व्हावं. कवी श्री. राजा बढे यांनी लिहिलेल्या आणि श्री. जितेंद्र अभिषेकी यांनी स्वरबद्ध केलेल्या या गीतांबद्दल माझी आणखी एक तक्रार आहे. संगीत नाटकात गाणी ही चौकट मानली जाऊ नये, तो चित्राचाच एक भाग असावा ही अपेक्षा या नाटकात अपेक्षित प्रमाणात पूर्ण होत नाही. 'मंद मंद ये समीर जागवीत आठवणी' (भरत) आणि 'घाई नको बाई अशी आले रे वकुळफुला' (सीता) ही दोन गाणी विशेषेकरून आणि आणखीही एक-दोन गाणी ('शांत दांत कांते' व 'या लतां शिकविते' राम) ही नाटकाच्या कथाप्रवाहात वरवरच तरंगल्यासारखी वाटतात, त्याच्याशी एकजीव झाल्यासारखी दिसत नाहीत. विशेषतः पहिली दोन आणि त्यातही 'घाई नको बाई अशी' ही तर सरळ सरळ भावगीतं म्हणून खपून जातील अशी आहेत, नाटचगीतं होण्यासाठी त्यांची कथानकाशी जी एकरसता व्हावी लागते ती फारशी होत नाही. नाटक त्या गाण्यांमुळे कुठं पुढं सरकतंय असं वाटत नाही आणि मग मुद्दाम लिहून तिथं घातलेली ही गाणी नाटचगीतांसारखी म्हटली जात नाहीत, ती बरीचशी एका ठायी उभं ठाकून भावगीतांसारखीच सादर करावी लागतात. क्वचित एखादं पात्र गाणं म्हणण्यासाठीच आणि म्हणण्यापुरतंच रंगमंचावर येऊन गेल्याचाही भास होतो, ह्या गोष्टी नाटचसंगीताला पुढं नेणाऱ्या निश्चितच नव्हेत. अर्थात गीतरचना, चाली किंवा साथ यांबद्दल तक्रार असण्याचं काहीच कारण नाही. राजा बढे, जितेंद्र अभिषेकी आणि सहकारी मंडळींनी आपापली कामगिरी चोख बजावली आहे.

नाटकाचं लेखन – किंवा रूपांतराचं कार्य – फारसं समाधानकारक नाही. अंकांची महत्त्व व घटनानुसार विभागणीही विषम आहे, वेळेच्या दृष्टीनंही कमी–जास्त आहे. पहिला अंक राजा दशरथाच्या मृत्यूनंतर संपतो, त्यामुळे बराच मोठा व महत्त्वाचा कथाभाग त्यात येतो. तथापि त्यामुळेच तो कसाबसा त्यात कोंबल्यासारखा वाटतो. विशेषतः पहिल्या अंकाचा पूर्वार्ध फार घाईगडबडीनं उरकला आहे. तर उत्तरार्ध– विशेषतः सुमंत्राच्या प्रवेशानंतर – जास्त पसरट व जरूरीपेक्षा जास्त संथपणे रेंगाळणारा आहे. आणखी एका मोठ्या दोषाचा उल्लेख केला पाहिजे. प्रथमांकाच्या पूर्वार्धात व पुढील कथाभागातही, रामकथा सर्वपरिचित असल्याच्या खात्रीनेच की काय, अनेक गोष्टी, प्रसंग दाखविले – ऐकविले न जाताच पात्रांकडून गृहीत धरले जातात. दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी रामवनवासवृत्त कळताच, त्याचं कारण जाणून घेण्याआधीच भरत आपल्या आईची जी निर्भर्त्सना सुरू करतो, ते अशा प्रकारे पात्रांकडून काही गोष्टी taken for granted असल्याचं एक ठळक व बोचणारं उदाहरण होय. अंक २, ३ व ४ हे एकापेक्षा एक लहान होत जातात. वनवासात भेटायला आलेल्या भरताला राम परत पाठवितो इथे दुसरा अंक संपतो. सीताहरणाचं नाटच तिसऱ्या अंकात घडतं तर चौथ्या अंकात रावणविजयी रामाला तपोवनातच आणि कैकेयीच्या उपस्थितीत राज्याभिषेक होतो. तिसऱ्या आणि चौथ्या अंकांत सुमारे एक दशकाइतका उणापुरा कालावधी लोटतो, हा कालविक्षेप – time gap – वगळता तिसरा व चौथा अंक वेगवेगळे ठेवण्याचं अन्य प्रयोजन समजलं नाही. 'घोळ–घोटाळचाच्या घटना' सारखे खटकणारे किरकोळ अनुप्रास वापरण्याचा मोहही टाळायला हवा होता, निदान त्याची पुनरावृत्ती नको होती. दशरथाच्या मृत्युप्रसंगातील नियतीवर खापर फोडण्याचा प्रयत्नही स्वागतार्ह वाटला नाही.

दशरथ, लक्ष्मण, रावण आणि सुमंत्र ही चार महत्त्वाची दुय्यम पात्रं या नाटकातली 'गद्य' पात्रं होती. स्वतः दिग्दर्शक श्री. दाजी भाटवडेकर यांनी दशरथाची भूमिका रंगविली. वाक्यांची वजनदार फेक हे त्यांचं वैशिष्ट्य दशरथाच्या भूमिकेला शोभून दिसलं. 'नुसता रिकामा रथ घेऊन सुमंत्र आले'. हे एक साधंच वाक्य केवळ तिच्या फेकीतल्या वजनामुळे लक्षात राहू शकलं. दशरथ रंगभूमीवर येतो तो फक्त पहिल्याच अंकात. त्याच्या मृत्यूच्या प्रसंगात मात्र दाजी भाटवडेकर दिग्दर्शक आणि अभिनेता या दोन्ही बाजूंनी फसले आहेत. आणि तो प्रसंग कृत्रिम व वाजवीपेक्षा जास्त भडक झाला आहे. शोकग्रस्त दशरथाचे काही अंगविक्षेप, त्याची धावपळ ही उरी फुटलेल्या पण धीरोदात्त सम्राटापेक्षा, हिस्टेरियाचा जबरी अॅटॅक आलेल्या सामान्य इसमाचे चाळे, या सदरात शोभण्यासारखी असावी. त्यातला अतिरेक तो शोकप्रसंग अधिक प्रभावी करू शकेलही, पण 'खरा' करू शकणार नाही. पुत्रशोक आणि आक्रस्ताळेपणा यातला फरक दाजी भाटवडेकर जाणत नसतील असंही नव्हे. असाच अभिनयातिरेक लक्ष्मण झालेले श्री. माधव खाडिलकर व श्रीराम झालेले श्री. नारायण बोडस यांच्याही आविष्कार पद्धतीत क्वचित आढळतो. विशेषतः श्री. खाडिलकर यांनी अभिनयातिरेक, डोळे फिरविणे अणि स् – श् – ष् – मधील उच्चारदोष अशा तीन सुधारणा प्रामुख्यानं करायला हव्यात. सौ. दुर्गा शिंदे व अनिता मोरे या अनुक्रमे कौसल्या व सुमित्रा दिसल्या – शोभल्याच नाहीत. सौ. रजनी जोशी (कैकेयी), सौ. आशा खाडिलकर (सीता), श्री. अरविंद पिळगावकर (भरत) व मास्टर रवीन्द्र (रावण) नाना गवंड (सुमंत) या सर्वांनी आपापल्या भूमिका सामर्थ्यानं व जबाबदारीनं पेलल्या.

प्रकाश, ध्वनी, वेशभूषा व अन्य तांत्रिक बाबी समाधानकारक होत्या. प्रयोग देखणा करण्यातला त्यांचा वाटा मोठा होता.

# सो ल क ढी

## □ बालगंधर्वांना काय वाटेल ?

बालगंधर्व म्हणजे केवढे अबब आणि अहाहा. मराठी रंगभूमीला पडलेले सोनलस्वप्न ! मराठी रंगशारदेच्या ओंजळीतला केशरी दिवा ! पालव-मालवणाऱ्या रंगऋतु चक्रातला अक्षय वसंत ! मराठी रंगदेवतेच्या रंगदरबारातला हुर्मुजी मानकरी ! भूलोकीचा गंधर्व ! बगळ्या बदकांच्या चिखली दुनियेतला राजीव 'राजहंस' ! पाचोळ्याने ज्याच्याकडे सख्त आदराने पाहावे असा देवआंब्याचा टाळा ! —अशा झुळझुळ झकास शैलीत बालगंधर्वांबद्दल या अनंतरावाला किती तरी लिहिता येईल. विशेषत: बालगंधर्वांना पाहिलेले नसल्यामुळे शैलीत आपोआपच हवा तितका जिव्हाळा आणणे सोपेही जाईल. परंतु 'बालगंधर्व' हा आपला आजचा विषय नसून 'बालगंधर्व रंगमंदिर' हा आहे. त्या विषयाकडे येण्यासाठी बालगंधर्वांना धरून जेवढे विषयांतर करणे योग्य, उचित आणि स्वाभाविक दिसले असते तेवढे मी काळजीपूर्वक केले आहे.— ( हो उगाच बोलायला नको कुणी. काय ? ).

बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे आहे. पुण्यात जी अनेक प्रेक्षणीय स्थळे ( स्थळांमध्ये व्यक्तींना मोजू नये, ही विनंती ) आहेत त्यातले हे एक. हे नव्हते तेव्हा पुण्यातले सांस्कृतिक जीवन काहीसे ठुबरे होते. मग छत्तीस आणि वर लाख रुपये खर्च करून हे उभारले. त्यावेळी एक, डॉक्टर आणि अनिल अवचट सोडले तर बाकीच्या पुणेकरांनी त्याचे जयस्वागत केले होते. हे श्रीमंती चोचले असून बालगंधर्व रंगमंदिर ही जणू पुण्यातल्या निराधार गरिबांना दाखवलेली सिमेंट-कॉंक्रीटची प्रचंड वाकुली आहे, असा आक्रोश पू. अनिलजी अवचटजींनी केला होता. पण तो कोणी ऐकला नाही. या स्फुटाच्या सुरुवातीच्या वाक्यात वर्णिलेल्या 'त्या' बालगंधर्वांचे यथोचित स्मारक करण्याच्या कल्पनेने नेहमीचे कुचिद्री पुणेकरसुद्धा बंबेहोष झाले होते.

'बालगंधर्व रंगमंदिर' झाले आणि तेथे आत-बाहेर नुसती नाटकेच होऊ लागली. आता एखादे नाटक चालते आहे, त्यामुळे त्याला पैसे मिळताहेत, म्हणून काही कोणी बालगंधर्व रंगमंदिरात नाटक लावत नव्हते. बालगंधर्व रंगमंदिरातली नाटके ही द्वैवस्वरूपी प्रेक्षकांची सेवा होती : 'रसिकपुजेस्तव सदैव तत्पर या आत्म्याची कुडी । वाहतो ही दुर्वांची जुडी' या भल्या भावनेने नाटकवाले येथे नाटके करत होते. असे आपण केले नाही तर बालगंधर्व काय म्हणतील, असा धाक त्यांना वाटायचा. नाटके झाली नाहीत तर पुण्यात ( आणि महाराष्ट्रात ) सांस्कृतिक ॲनिमिया होईल की काय, असे भय होते. तो होऊ नये म्हणून, भरमसाठ तोटा सोसूनही, नाटकवाल्यांनी आपली संस्कृतिवर्धक अस्सल नाटके, तब्बल सात वर्षे, चालू ठेवली याबद्दल कोणी त्यांचे कौतुक करायला गेले तर ते म्हणणार आम्ही तर आपले कर्तव्यच केले; कर्तव्याचे का, देवा !, कोणी कौतुक करायचे ?

पण कधी कधी कर्तव्याचीही पंचाईत होते. ते गोते खायला लागते. इथेही तसेच झाले. बालगंधर्व रंगमंदिराची रखवालीण असलेल्या पुण्याच्या महानगरपालिकेने, दोन महिन्यांपूर्वी, रंगमंदिराचे भाडे आपले साटदिशी वाढवून टाकले. कोणाला विचारले नाही. पुसले नाही. कोणाचा सल्ला नाही. मसलत नाही. कसली चर्चा नाही. गोलमेजगप्पा नाहीत. रंगमंदिरापायी येणारा हजारो रुपये तोटा भरून काढण्यासाठी महापालिका आपली भाडे वाढवून मोकळी. ही पुण्याची महापालिका स्वत:ला काय नाटककंपनी समजते की काय ? की आपले वाढवले (तिकिटांचे) दर आणि केला तोटा कमी. सभ्य आणि कुलीन सार्वजनिक संस्थेला असे वागता येत नाही, असे संस्थोपनिषदात सांगितले आहे. महापालिकेने अशी एकतर्फी भाडेवाढ केल्यामुळे 'नाट्य निर्माता संघा'ला अनावर असा एक अभिजात संताप आला. 'नाट्य निर्माता संघ' म्हणजे व्यावसायिक नाटकवाल्यांची प्रप्रातिनिधिक संस्था. बालगंधर्व रंगमंदिराकडून घाऊक मिळालेल्या टोपलीभर तारखांच्या लहानमोठ्या जुड्या बांधून त्या सगळ्या नाट्यसंस्थांना वाटून देण्याचे काम संघ बिनबोभाट करतो. आता संघाबाहेरची मंडळीसुद्धा आपले खेळ तिथे करतात हे खरे; रंगमंदिरासंबंधी काही घडवाई–मोडवाई करायची असेल तर, 'नाट्य निर्माता संघा'शी आगाऊ बोलणी केली पाहिजेत असे महापालिकेच्या नियमावलीत नाही हेही खरे; 'नाट्य निर्माता संघ' रंगमंदिरवाल्यांना धूप घालून विचारत नाही हेसुद्धा खरेच. तरी महापालिकेने भाडे वाढवल्यावर 'नाट्य निर्माता संघा'ने सनई-चौघडा बंद करून आणि तोरण-केळखुंट उतरवून निमूट होणे त्याला शोभून दिसले नसते. संघ भडकला. भंभडकला म्हणणे अधिक बरे. (कारण संघाचे अध्यक्ष कोणी अनंतरावच–काणे–आहेत.) प्रश्न भाडेवाढीचा होताच; पण तत्त्वाचाही होताच. संघाने एप्रिल ते जून या कालावधीत योजलेले सगळे नाट्यप्रयोग सफै रद्द करून टाकले. 'बालगंधर्व रंगमंदिरा'वर त्यांचा बहिष्कार पडला. त्यांनी बहिष्कार टाकताना, बालगंधर्वांना काय वाटेल, एवढाच विचार केला होता.

आता जून सरला. पाऊस एकदा येऊन गेला आणि पुन्हा आला. कणसे मिळेनाशी झाली. पावसावरच्या कविता अधिक पाठवू नका असे व्याकुळ आवाहन 'महाराष्ट्र टाईम्स'च्या संपादकांनी कविमंडळींना केले. आणीबाणीबद्दल आणि उकाड्याबद्दल बोलणारी माणसे आता पावसाबद्दल बोलू लागली. मंडळाच्या आणि विद्यापीठांच्या परीक्षांचे निकालसुद्धा लागले. इतकेच नव्हे तर, अकरावी–बारावीचे वर्गही चालू झाले. बसेस आणि गाड्यांना आता पावसामुळे उशीर होऊ लागला. झाडे लावायच्या महापोरकट कार्यक्रमात लावलेली झाडे चांगली दोन बोटे वर आली. नव्या नाटकांचे मुहूर्त झाले आणि तालमी मार्गी लागल्या. दत्ता बाळ आणि ग. वा. बेहेरे यांनी आपल्या जुन्या छत्र्यांना नवे टणक दांडे बसवून घेतले. सगळ्या नाट्यसंस्था 'दुर्वांची जुडी'सारख्या सुखी होवोत असे पसायदान कोल्हटकरांच्या बाळेश्वराने मागितले. सर्दीखोकल्याच्या आणि डोकेदुखीच्या गोळ्यांची विक्री वाढली. उन्हाळ्यात खाल्लेल्या आंब्यांची चव आठवेनाशी झाली. हे सोडा; पाठ्यपुस्तकेदेखील बाजारात आली. तरी महानगरपालिका आणि 'नाट्य निर्माता संघ' यांच्यातला तात्त्विक आणि तात्त्विलिक संघर्ष मिटलेला नाही.

सगळे होऊन मिटलेला नाही. महापालिका आणि संघ यांनी मिटवायचे फुटकळ प्रयत्न करता करता आणखीच फाटवले. साक्षात गंधर्वगोत्री मध्यस्थगणी पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांनी तडजोडीचा अटाट केला. गोविंदराव तळवलकरांनी लवाद नेमायची सूचना केली. पुण्याच्या भरत नाट्य मंदिराने

दंडातली वेटकुळी चाचपायला सुरुवात केली. काही नाटके आणि करमणुकीचे इतर प्रकार रंगमंदिराच्या रंगमंचावर सादर होतच राहिले. बालगंधर्व रंगमंदिर आणि नाट्य निर्माता संघ या दोघांचेही मायबाप असलेले प्रेक्षक, आपल्या या रंगड्या लेकरांचे कर्तृक पाहून बालगंधर्वांना काय वाटेल, याचा हिशोब करत बसले आहेत.

—अनंतराव

# जे. पॉल गेट्टी

## जगातील सर्वांत श्रीमंत माणूस

जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींमध्ये जे. पॉल गेट्टी यांची गणना होते. ५ जून १९७५ रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी इंग्लंडमधील आपल्या निवासस्थानी ते मरण पावले. कित्येक अब्ज डॉलर्सची त्यांची मालमत्ता आहे. ही मालमत्ता त्यांनी गेट्टी तेल कंपनीच्या व्यवहारातून मिळवली. व्यवहारज्ञान, कुशल प्रशासन, चिकाटी, परिश्रम, तीव्र स्मरणशक्ती यांच्या जोडीलाच त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'योग्य काळी जन्म घेतल्याने' मिळालेली सुसंधी यामुळे एवढी प्रचंड संपत्ती त्यांना जमवता आली.

जन्माने जे. पॉल गेट्टी हे अमेरिकन होते, परंतु शेवटी २५ वर्षे ते इंग्लंडमध्येच राहिले. मिनिओपोलीस येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील जॉर्ज फ्रॅंकलीन गेट्टी हे पेशाने वकील होते. १९०३ मध्ये ओक्लहोमा येथे त्यांनी तेलाचा व्यवसाय सुरू केला.

जे. पॉल गेट्टी यांनी लॉसएंजेलिसमधील हॉर्वर्ड मिलिटरी अ‍ॅकेडेमी आणि पॉलिटेक्निक हायस्कूलमधून हायस्कूल शिक्षण घेतले. नंतर कॅलिफोर्निया विद्यापीठातून ते ग्रॅज्युएट झाले. १९१४ साली त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयात डिप्लोमा घेतला. वयाच्या २१व्या वर्षी ते शिक्षण संपवून ओक्लहोमामध्ये व्यवसाय करू लागले. दोन वर्षांत १० लाख डॉलर्स कमवायचा त्यांचा निश्चय होता.

१९१४ च्या सप्टेंबरमध्ये ओक्लहोमामधील रेड बेडस् भागात त्यांनी तेलविषयक करार केले. जिथे अजिबात तेल मिळणार नाही असे लोकांचे मत होते, पण पितापुत्राने जनाचे न ऐकता आपल्या मनाने अल्प किमतीत अनेक जमिनी घेतल्या आणि तिथेच त्यांना लक्ष्मीने हात दिला. जवळ जवळ सर्वच विहिरींना तेल लागले आणि गुंतवलेल्या पैशाच्या कितीतरी अधिकपट फायदा झाला.

१९३० मध्ये त्यांचे वडील वारले. मुलाच्या रंगेलपणावर नाखूष होऊन त्यांनी फक्त ५ लाख डॉलर्सची मालमत्ता त्याला ठेवली आणि उरलेली १ कोटी डॉलर्सची इस्टेट पत्नीच्या म्हणजे पॉलच्या आईच्या नावावर केली.

जे. पॉल गेट्टी यांनी पुनश्च निर्धाराने करोडपती होण्याचा चंग बांधला. त्यांनी पॅसिफिक वेस्टर्न ऑईल कॉर्पोरेशन विकत घेतले आणि त्यातूनच शेकडो कंपन्या, तेलशुद्धीकरण कारखाने वगैरे उदयास आले.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने भाग घेतला, तेव्हा गेट्टी यांनी अमेरिकन आरमारात सामील होण्याची तयारी दर्शवली. पण त्यांना आरमारात घेण्यात आले नाही. स्पार्टन एअर क्रॅफ्ट कंपनी ताब्यात घेऊन विमानाचे सुटे भाग आणि शिकाऊ विमाने बनवण्याचा कारखाना त्यांनी घातला.

१९४९ मध्ये त्यांच्या नशिबाने त्यांना चांगलाच हात दिला. सौदी अरबस्तान आणि कुवेत यांच्यामधील ओसाड जमीन त्यांनी ६० वर्षांच्या कराराने घेतली. सौदी अरबस्थानचे राजे सौद यांना त्यांनी ९५ लाख डॉलर्स रोख दिले आणि तेल मिळो वा न मिळो, दरवर्षी १० लाख डॉलर्स देण्याचे मान्य केले. ही जमीन जे. पॉल गेट्टी यांनी खरेदी केली तेव्हा सर्व दुनियेने त्यांना वेड्यातच काढले. पण त्यातून अक्षरशः त्यांनी 'काळे सोने' बाहेर काढले. एवढा मोठा जो धोका त्यांनी पत्करला होता, त्याची पुरेपूर वसुली झाली. १९५३ मध्ये त्यांना या जमिनीत तेल सापडले. आणि दरवर्षी १ कोटी ६० लाख बॅरल्स तेल तिथून निघून श्री. गेट्टी अब्जाधीश आणि 'तेलसम्राट' झाले.

लंडनपासून ३५ मैलांवर एरे येथे ७२ खोल्यांचा त्यांचा महाल आहे तिथेच राहणे ते पसंत करीत. मध्यपूर्वेतील तेलव्यवहारांवर लक्ष ठेवणे अमेरिकेत राहून त्यांना शक्य नव्हते म्हणून हा मधला मार्ग त्यांनी स्वीकारला होता. कॅलिफोर्निआत मालिब्रू बीच येथेही त्यांचे एक प्रचंड निवासस्थान आहे. श्री. गेट्टी यांनी जमवलेल्या असंख्य कलात्मक वस्तूंचा, चित्रांचा आणि मूर्तींचा तेथे संग्रह आहे. हा संग्रह पाहण्यासाठी दरवर्षी हजारो रसिक तेथे जातात. सौदी अरबस्तानच्या किनाऱ्यावरही त्यांनी घर घेतले असून, इटलीत रोमच्या जवळ १५ व्या शतकातील एक राजवाडा त्यांनी विकत घेतला आहे.

जे पॉल गेट्टी यांनी एकूण पाचवेळा विवाह केला. त्यांची एक पत्नी जर्मन होती. दोघी चित्रपट अभिनेत्या तर उरलेल्या मॉडेल्स होत्या. शेवटी त्यांना ३ मुले, ६ नातवंडे आणि एक पणतू होता. आपल्या प्रकृतीची ते विशेष काळजी घेत. नैमित्तिक आहार आणि व्यायाम आणि रोज दोन मैल चालणे हे त्यांच्या उत्तम प्रकृतीचे रहस्य होते.

जगातील या सर्वांत श्रीमंत माणसाला, तेलसम्राटालाही दुःख होतेच. त्यांच्याच शब्दात ते असे, 'मी स्वतः व्यक्ती म्हणून कोणाला आवडतो की नाही हे समजतच नाही. सगळेच जण माझ्या पैशांवर (च) प्रेम करतात.'

लोक आपल्या मागे फार लागतात, जास्त बील आकारतात आणि जास्त बक्षिसाची अपेक्षा करतात, अशी त्यांची तक्रार होती. पैशाची मागणी करण्यासाठी त्यांना दर महिन्याला सुमारे ३ हजार अनोळखी व्यक्तींची पत्रे येत. ते फक्त संस्थेलाच दान देत. व्यक्तीला नाही.

१९७३ मध्ये इटलीत त्यांच्या नातवाला पळवण्यात आले. १ कोटी ६० लाख डॉलर्स दिले तरच त्याला परत करण्यात येईल अशा धमक्या त्यांना देण्यात आल्या. श्री. गेट्टी यांनी गुंडांना कळवले की, मला अजून बरीच नातवंडे आहेत आणि मी एकासाठी पैसे दिले तर बाकीच्यांनाही पळवण्यात येईल. शेवटी गेट्टी कुटुंबाने २८ लाख डॉलर्स दिले, पण जे. पॉल गेट्टी यांनी त्यातील किती पैसे दिले हे कळले नाही.

—विजया जोशी

# राष्ट्राला सरकारच्या भावनेचा पुनर्लाभ

## 1975-76

### काळ्या पैशाविरुद्ध मोहीम

- ☐ चोरट्या व्यापाऱ्यांचे विश्व उद्ध्वस्त करण्यात आले. बड्या चोरट्या व्यापाऱ्यांना अटक करण्यात आली. 42 चोरट्या व्यापाऱ्यांना फरारी म्हणून घोषित करण्यात आले, आणि त्यांची मालमत्ता जप्त करण्यात आली.

- ☐ नागरी भागातील रिकाम्या जागांच्या मालकीवर निर्बंध घालण्यात आले. कमाल मर्यादेमधील हस्तांतरणाला मनाई करण्यात आली.

- ☐ निवास क्षेत्राची मर्यादा निश्चित करण्यात आली. कर-चुकारांना जाळ्यात पकडण्यासाठी आलिशान इमारतींचे मूल्यमापन सुरू झाले. धाडी घालण्याचे सत्र सुरू झाल्यानंतर, जुलै, 1975 पासून प्रत्यक्ष कराची वसूली 27·4 टक्क्यांनी वाढली.

- ☐ स्वेच्छेने उत्पन्न जाहीर करण्याच्या योजनेनुसार 2,50,000 पेक्षा जास्त लोकांनी 15 अब्ज 87 कोटी रुपयांहून जास्त उत्पन्न आणि मालमत्ता जाहीर करण्यात आली. कर महसूल 2 अब्ज 49 कोटी रुपये मिळाला.

DAVP 76/90

## तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी

# वा त्स्या य न

## दि. बा. मोकाशी । दोन

### । महेश्वरदत्त ।

वात्स्यायन सायंकाळी अवंतीत प्रवेश करता झाला. सूर्याच्या लाल प्रकाशातील सुंदर अवंती तो आज अनेक वर्षांनंतर पाहत होता. राजधानी कधी बदलत नाही. त्याच्या मनात आले. तिची आकाशरेषा तरी तशीच राहते. तो उज्जयनीच्या वेशीपाशी आला तेव्हा अंधार वाढला होता. लग्न झाल्यापासून त्याची लांब प्रवासाची सवय गेली होती. आणि आता पाय बोलू लागले होते. पापण्यांवरची धूळ कळू लागली होती. धूळ, अधून मधून जाणाऱ्या उंटांच्या गाड्या उडवीत होत्या. 'वसंत' आणणारा वाराही त्यांना सहाय्य देत होता.

उज्जयनीच्या परिचित वेशीकडे पाहताना वात्स्यायनाच्या छातीत धस् झाले. प्रेयसीची अवचित गाठ पडावी तसे त्याला वाटले. उज्जयनीचा नगरवासी पुन्हा उज्जयनीतच यावयाचा. आणि असेही म्हणतात की उज्जयनीच्या नागरिकास पत्नी अधिक प्रिय की उज्जयनी हे सांगता येणार नाही. आपली सासुरवाडी उज्जयनीला आहे हे किती चांगले आहे! आपण या आधी येथे वारंवार यावयास हवे होते. पत्नीला घेऊन ती चिरपरिचित उद्याने, प्रचंड वाडे, क्षिप्रेचे घाट आणि त्यावरची देवालये, कमलांनी भरलेले तलाव, नाना वस्तूंनी भरलेले हाट पाहत, बालपणची स्थळे परस्परांना सांगत हिंडायला हवे होते. उद्याने, देवळे, घाट-येथे बसलेली प्रेमी युगुले पाहत आमच्या प्रेमाचे संवर्धन करायला हवे होते.

देवळात, घाटांवर, उद्यानात पाहिलेल्या प्रेमी युगुलांच्या स्मृतीने वात्स्यायनाचा ऊर भरून आला. आता, यापूर्वी आणि पुढेही अशा भेटीगाठी घेणाऱ्या युवयुवतींचे विवाह होवोत. ती सुखी होवोत. सुख घेण्याचे त्यांना कळो. त्यांचे परस्परांवरचे प्रेम वृद्धिंगत होवो. त्याने मनोमन आशीर्वाद दिला, आणि हा वसंताचा रथ तरुणतरुणींच्या हृदयांचा थरकाप करीत, धडधडत आलाच आहे. कुणाचीही पत्नी माहेरी न जावो. यावेळी अवंतीत नाना उत्सवांना आरंभ झाला असेल. ही उत्सवांची नगरी आहे. तशीच विद्वानांची आणि गणिकांचीही. विद्वान आपण पाहिले आहेत. पण गणिका खरी एकच पाहिली—आनंदिका. वात्स्यायन स्वतःशी हसला. प्रत्येक नागरिकाच्या मनात दोन स्त्रिया असतात. एक त्याची पत्नी, दुसरी त्याची गणिका. दोघींचे मिश्रण करून तो आपले स्त्रीरूप उभे करीत असतो.

वेशीच्या आंत येऊन थकलेल्या पायांना विश्रांती देत तो एका कट्टयावर बसला. पाय फारच थकले आहेत. त्याच्या मनात आले. आणि तहान लागली आहे. प्रिय मित्र महेश्वरदत्त घरी असेल का? तो नसला तर विष्णुगुप्त आहे. आणि तोही नसला तर आणखी चार गुरुबंधू आहेत. म्हणजे आपण प्रथम सासुरवाडीस जाणार नाही तर! सासुरवाडीचे लोक हसतील म्हणून आपण भीत आहोत? हसू द्या. आपल्या यातना आपणास ठाऊकी.

महेश्वरदत्ताच्या वाड्याशी येईपर्यंत वात्स्यायनाचे मन अस्वस्थच होते. वाड्याशी येताच तो थबकला. वाड्याच्या गवाक्षात अंधेर होता. वाड्यात शिरता शिरता कसला तरी विषण्ण वारा त्याच्या अंगावरून गेला. आणि एक एक दालन ओलांडताना त्याला उदास वाटत गेले. खांद्यावरचे बोचके मागे करून आणि हातातील दंडावर तोल घेत, मान उंच करून, त्याने मधल्या चौकात उभे राहून सभोवार पाहिले. चहूबाजूने अंधाराने येऊन त्याचे स्वागत केले. जरा वेळ अंधाराचा दाब सहन करीत त्याने मोठ्याने हाक मारली.

'मित्र महेश्वरदत्त!'

रिकाम्या जागेत घुमावा तसा त्याचा आवाज चहुकडे घुमला. गच्चीतून एका स्त्रीचा आवाज आला,

'कोण आहे?'

महेश्वरदत्ताच्या बायकोचा आवाज वात्स्यायनाने ओळखला. तो ओरडला,

'मी—मल्लनाग वात्स्यायन. एक परिचित अतिथी.'

'अतिथीचे स्वागत असो,' रीतीप्रमाणे म्हणत ती आत गेली. आणि वात्स्यायन जिना चढू लागला. जिन्यात काळोख अधिकच दाटला होता. त्यातूनही जिन्याची दैन्यावस्था कळत होती. उडालेल्या गिलाव्यामुळे आणि पडलेल्या विटांमुळे पायऱ्यांतील अंतरे बदलून पावले फसत होती. पूर्वी या जिन्यात कोनाड्याकोनाड्यांतून पणत्यांच्या ज्योती चमकत उभ्या असत. कुणी म्हणे, त्यांत अत्तराचे तेल असे.

वात्स्यायन वर आला आणि दारातच थबकून उभा राहिला. आतला अंधार निरखीत उभा असता, महेश्वरदत्ताच्या पत्नीचा पुन्हा आवाज आला,

'दिवा बाहेर आणते. आत या भावजी! उजव्या भिंतीशी गाठोडे टेका. डाव्या भिंतीशी आसन आहे त्यावर बसा.'

सांगितल्याप्रमाणे चाचपडत आत येऊन त्याने उजव्या भिंतीशी गाठोडे ठेवले आणि डाव्या भिंतीकडे चाचपडत जाऊन पायाला लागलेल्या आसनावर बसला.

पण दिवा आला नाही. जरा वेळ अगदी विचित्र गेला. कुणीतरी बोलायला सुरुवात करायला हवी. शेवटी त्यानेच विचारले,

'महेश्वरदत्त कुठे आहे ? पेढीवर ?'

'पेढी गेली.'

महेश्वरदत्ताची पत्नी म्हणाली आणि मागोमाग हुंदका फुटला. मग रडणे. मग नाकाचा आवाज. वात्स्यायन काही न बोलता बसून होता. मग काकणे वाजली. हस्तीदंती असावीत. मग पोकळ हसण्यातून तिचे शब्द आले,

'आज अतिथीला फराळ चांगला आहे–थंडा.'

वात्स्यायनाने म्हटले,

'वहिनी ! म्हणजे जो फराळ अतिथीला तोच यजमानांना ?'

काही उत्तर आले नाही तेव्हा वात्स्यायन उठला. कोपऱ्यातला दंड घेत तो म्हणाला,

'वहिनी ! जरा जाऊन येतो.'

'भावजी, काही घेऊन येऊ नका.'

वात्स्यायन काही उत्तर न देता जिना उतरू लागला आणि वाड्याबाहेर आला. तिचे पहिले पुटपुटणे त्याच्या कानात घुमत होते. 'अतिथीचे स्वागत असो.' 'आज चांगला फराळ आहे अतिथीला; थंडा.'–परिस्थितीने माणूस संस्कारांना अधिक चिकटतो. आपल्याला दिसत नव्हते का ; तिने सरळ सांगायला हवे होते. तिच्या नवऱ्याची व आपली मैत्री तिला ठाऊक नाही काय ? काय झालेय महेश्वरदत्ताचे ? कुठे घालविले एवढे धन ? आपल्याला त्याने कळवूही नये ? पण आपण तरी कुठे कळवले होते तेव्हा ? तरी तो आला होता. आपत्तीत न कळविता येतो तोच मित्र. मित्रा ! माझे मन बावरले असता तू अनाहूत येऊन मला सावरलेस. आता मीही अनाहूत आलो आहे. तू चिंता करू नको. हा मल्लनाग वात्स्यायन तुझ्यामागे आहे.

या निश्चयाने वात्सायनाला जरा बरे वाटले. तो ज्या मार्गानं चालला होता तो अवंतीतील प्रासादांचा भाग होता. प्रासादांची एकएक भिंत संपता संपत नव्हती. काही ठिकाणच्या गच्चींवर अवंतीची सायंकाळची शोभा पाहत स्त्रिया उभ्या होत्या. वात्स्यायनाच्या मनात आले– हा धुळीने भरलेला प्रवासी पाहून त्यांच्या मनात काय येत असेल ? महेश्वरदत्त म्हणाला असता– आपण त्यांना राजपुत्रही वाटत असू.– खरे आहे. स्त्रियांचीही मने रमणीय का असू नयेत ?

दुरून वाऱ्याबरोबर हाटांतील भीडेचे ध्वनी येऊ लागले. पुढचा चौक संपला की, दुकाने लागतील. कुठेतरी पेयपान करू. कुठल्याही परिस्थितीत माणसाने प्रथम देहाची चिंता करावी. वात्स्यायन स्वतःशी हसला. हा विचार नास्तिकवादी लोकायतिकांसारखा झाला. शेवटी प्रत्येकजण आत लोकायतिक असतो– महेश्वरदत्त म्हणे. गुरुगृही हे लोकायतिक नेहमी येत. घोंगड्या पांघरलेले, केस वाढवलेले, शुष्क कातडींचे. ती तैलहीन, अस्वच्छ माणसं आपल्याला कधी आवडली नाहीत. त्यांची काही तत्त्वे आपल्याला आवडत. नवल वाटे ते त्यांच्या आवेशाचे. कुऱ्हाड घेऊन अरण्य तोडीत जावे तसे शब्दांचे घाव घालीत वाद घेत. कुणी म्हणत हा यवनांकडून आलेला वाद आहे, पण गुरू म्हणे– हे लोक वेदकालापासून आहेत. हे पूर्वी नीटनेटके स्वच्छ राहत. पण त्यांचा पंथ आता बिघडला आहे. अस्वच्छ राहण्यापुरताच तो आता उरला आहे. गुरू त्यांचे स्वागत करी. त्यांच्या निर्भयतेबद्दल तो आदरानं बोले.

वात्स्यायनाच्या पोटात क्षुधा उसळून येत होती. तोंड आणखी कोरडे पडले होते. कुठे पाणी मिळाले तर यजमानाआधी ते प्यायला प्रत्यवाय नसावा. आणि पाणी प्यायल्यावर तोंडात थोडा खवा टाकला तर काय बिघडेल ? छे ! लहानसहान गोष्टींवर आपण फारच विचार करतो. अतिथीने यजमानाच्या परिस्थितीला मानून घ्यायलाच हवे. तिथे थंडा फराळ असेल तर तो मानून त्यावर ढेकर द्यावयाला हवी. उठून बाहेर जाऊन मिठाईवर त्याला ताव मारता येणार नाही.

पण इथे आपण केवळ अतिथी नाही. मित्रभावही आहे. मित्राच्या घरी अन्न नाही. ते आणून टाकणे आपले काम आहे.

छे ! फारच विचार होताहेत आज. पेयगृहात शिरताना त्याच्या मनात आले. तहानभुकेचा परिणाम आहे हा. देहस्थिती मनाच्या विकृतींना कारण होते. कुणी म्हटलंय हे ? पेयपान करीत तो स्वतःशी म्हणाला, आपणच म्हणालो असू केव्हातरी.

पेयपानानंतर पुढे जाऊन त्याने मिठाई विकत घेतली आणि तो महेश्वरदत्ताच्या वाड्याकडे परतला. वाड्याचा जिना चढताना मिठाईची करंडी त्याने उत्तरियाखाली लपवून धरली होती. खोलीत येऊन आसनावर बसल्यावरही करंडी उत्तरियाखालून बाहेर काढण्याचा धीर त्याला होईना. त्याने महेश्वरदत्ताच्या पत्नीला विचारले–

'किती काल लागेल महेश्वरदत्ताला ?'

ती म्हणाली, 'दैव जाणे ! पण रात्र संपण्यापूर्वी येतील.'

आपल्या अंगात त्राण उरले नाही हे ओळखून वात्स्यायनाने तिथेच निद्रा घ्यावी असे ठरवले. तो म्हणाला,

'एखादी चारपाई असेल तर मी पलीकडच्या खोलीत निद्रा करतो.'

ती म्हणाली– 'या खोलीव्यतिरिक्त कुठलीच आपच्या स्वाधीनची नाही. तुमचे मित्र आल्यावर 'ही खोली गेली आहे, आपली राहिली नाही,' असे सांगत आले तर समाप्तीच.'

'कुठे जातात खोल्या ? काय करतो तो ?'

महेश्वरदत्ताची पत्नी अगदी थंडपणे म्हणाली,

'विट झाले आहेत ते.'

'विट' शब्द ऐकताच, सर्पाने दंश करावा किंवा विद्युल्लतेचा आघात व्हावा तसा वात्स्यायन दचकला. किती वर्षांनी हा शब्द आपण इतक्या जवळ ऐकलाय ? त्या एका शब्दाने मित्राचे काय झालंय हे त्याच्यासमोर उभे राहिले. महेश्वरदत्त विट झाला ! पित्याची स्मृती येऊन त्याच्या मनात आले, अवंतीतील एका श्रीमान श्रेष्ठीचा पुत्र पुन्हा एकदा विट झाला. पुन्हा एकदा सगळे धन व्यसनात खर्च करून, पुन्हा एकदा एका धनवान श्रेष्ठीचा पुत्र नागरिकांना वेश्येकडे आणि गणिकांकडे नेऊन उपजीविका करण्याचा विटाचा व्यवसाय करू लागला. पुन्हा एकदा एका धनिक श्रेष्ठीची स्नुषा, अलंकारहीन होऊन दुःखाकष्टात जीवन व्यतू लागली.

हे 'विटपण' आपल्याला सोडीत नाही. पाठीवर बसलेल्या समंधासारखे ते चिकटले आहे. पित्याकडे नित्य येणारे, दरिद्री, लोभी, निर्घृण, व्यसनासक्त विट वात्स्यायनाच्या डोळ्यापुढे आले. महेश्वरदत्तही असाच एखाद्या विटप्रमुखाकडे लाचारीने जात असेल. एक क्षणच मित्राच्या भेटीची वात्स्यायनाला भीती वाटली.

वात्स्यायनाला निःशब्द पाहून महेश्वरदत्ताची पत्नी म्हणाली,

'तुम्ही त्यांचे बालमित्र आहात. जे सर्व अवंतीला ठाऊक आहे ते तुम्हास कळले तर काही बिघडणार नाही. म्हणून सांगून टाकत्ये. धन संपल्यावर त्यांनी वाड्यातील एक एक खोली विकायला आरंभ

केला. घरातील सर्व मौल्यवान वस्तू आधीच धनकोकडे गेल्या होत्या. मग त्या धनकोने एकेका खोलीवर ऋण देण्यास आरंभ केला. असा अर्धा वाडा धनकोचा झाला. तोपर्यंत काहीतरी चमत्कार होईल आणि गेलेल्या खोल्या परत घेता येतील अशी आशा वाटत होती. नंतर मात्र आशा सुटली. आता या खोलीची मायाही सोडली आहे. कोणत्याही क्षणी येथून निघावे लागले तरी मन तयार आहे.'

तिने कष्टाचा दीर्घ श्वास टाकला. वात्स्यायनाने विचारले, 'कुठे गेले सगळे धन ?'

ती म्हणाली, 'कुठे जाणार ? सर्व व्यसनी लोकांचे जाते तसे गेले. वेसमध्ये वेश्यांकडे, जुगारात, मद्यात, कोंबड्यांच्या झुंजीत. तुम्हाला स्मरत असेल, या खालच्या चौकात मोर असत. त्यांच्या पायांत सोन्याचांदीचे वाळे असत. मोर नाचू लागले की, मधुर ध्वनींनी वाडा भरून जाई. तसेच चांदीच्या पिंजऱ्यांतून दुसरेही शुक-मैनेसारखे पक्षी होते. ते सारे गेले आणि त्यांच्या जागी कोंबडे आले. झुंजी लावून उरलेले धन गेले व कोंबडेही गेले.'

ऐकता ऐकता वात्स्यायनाला भय वाटू लागले. महेश्वरदत्त आला की कसा दिसेल ? काय बोलेल ? आणि आपण काय बोलू ? ही उलथापालथ त्याने कशी घेतली असेल ?

महेश्वराच्या भेटीचा त्याला भयंकर संकोच वाटू लागला. मग त्याच्या मनात आले, आपणही विटपुत्र आहोत. आपण त्याच्याशी संकोचू नये आणि आपणाशीही त्याने संकोचण्याचे कारण नाही. त्याच्या पत्नीशी अवचितच गाठ पडली की नाही ? जो तो परिस्थितीतली उलथापालथ गिळून बसलेला असतो. परिचित संकोचतात, भितात, इतकेच.

उठता उठता करंडी पुढे सरकावून त्याने तिच्या हातातील हातरी घेतली व हातरी कोपऱ्यात हंतरताना म्हणाला,

'ती भेट आहे.'

हातरीवर पडल्यावर शरीर थकले असूनही त्याला वाटले होते तेवढ्या लौकर त्याचा डोळा लागला नाही. या घरातले स्थित्यंतरच इतके विलक्षण होते ! राहून राहून त्याच्या डोळ्यापुढे महेश्वरदत्ताच्या पत्नीला ज्या वैभवात पाहिले होते ते दिवस आले. महेश्वरदत्ताला मुलीला पाहण्याच्या वरणप्रसंगी महेश्वरदत्त आपल्याला घेऊन गेला होता ते वात्स्यायनाला आठवले. तिला पाहायला जाण्यापूर्वीच्या रात्री महेश्वरदत्ताने म्हटले होते,

'मित्र मल्लनाग ! तुझा गृह्यसूत्रांवर विश्वास आहे का ?'

आपण अर्धवट मान हलवली होती. हसून तो म्हणाला होता,

'तुझा तेवढासा विश्वास नाही. मला ठाऊक आहे. पण माझा आहे. माझ्यासाठी तू सगळे शकुन पहा. मुलीला पाहण्यासाठी घराबाहेर पडताना कोणता पक्षी ओरडतो लक्ष ठेव. अशुभ पक्षी ओरडला तर दुसऱ्या दिवशी जा. कोणता डोळा लवतो–कोणता बाहू स्फुरतो तेही पाहा. मुलीच्या घरी गेलास की मुलगी त्यावेळी काय करीत होती पाहा. ती खेळत होती, हसत होती, झोपली होती की जांभई देत होती. आमचे लोक इतके लक्ष देणार नाहीत. मुलीच्या बापाजवळ खूप धन आहे. त्यांना तेवढे पुरेल.'

आपण थंडपणे म्हटले होते,

'सगळे पाहीन. पण पाहताक्षणीच आवडलेली मुलगी करावी असे माझे मत आहे.'

वरणप्रसंगी खरोखरच सगळे शुभ झाले होते. निघतानाच शांतदिशेला कावळा ओरडला होता. मुलगी हसतमुखाने येऊन बसली होती. सगळे प्रसन्न होते.

सगळे शुभशकुन होऊनही शेवटी या संसाराचे असे का व्हावे ? शकुनाव्यतिरिक्त आणखी काही बघायला हवे होते ?

आणखी काही ? ते काय ?

प्रश्न येऊन पडताच, त्याच्या थकलेल्या शरीराला तो झेपला नाही. जड होऊ लागलेले डोळे मिटू लागले.

रात्री केव्हातरी महेश्वरदत्त आला. पण त्याने वात्स्यायनाला उठवले नाही. त्याच्या शेजारी हातरी पसरून तोही झोपी गेला. ◻

---

## वेसेत

---

दुसरे दिवशी सूर्योदयाआधी एक प्रहर, महेश्वरदत्ताने वात्स्यायनाला बाहेर काढले. त्याआधी त्याला थकलेल्या झोपेतून उठवून, स्नान करायला सांगून, आपण आणलेली व वात्स्यायनाने आणून ठेवलेली मिठाई एकत्र करून तिघांनी खाल्ली होती.

खाताखाता महेश्वरदत्त हसत म्हणाला होता,

'मिठाईवर दिवस काढले आहेस कधी ? हल्ली आम्ही मिठाईशिवाय दुसरे काही खात नाही.'

त्याच्या पूर्वीच्या उत्साही स्वभावात वात्स्यायनाला काही फरक दिसला नव्हता. केस थोडे विरळ झाले होते. आवाज पसरट वाटत होता. उठवतानाही तो पूर्वीच्या थाटात ओरडला होता,

'लोकायतिका ऊठ ! सच्च्या लोकायतिकाची उठायची वेळ झाली.'

त्याने आपल्याला लोकायतिक म्हणावे हे पूर्वीच्या दिवसांचे स्मृतिचिन्ह होते. तो नेहमी म्हणे – 'तू पक्का लोकायतिक होणार. पोंगडी पांघरून पृथ्वीवरील सर्व श्रद्धांचे मुंडण करीत हिंडणार.'

काही वेळाने घराबाहेर पडताना – महेश्वरदत्ताची पत्नी दाराशी आली. ती रीतीसाठी यावी तशीही आली असेल. पण महेश्वरदत्ताने मानही वळवून पाहिले नाही. जरा विचित्र वाटून वात्स्यायनानेच मागे वळून पाहिले. आणि तिचे उतरलेले तोंड पाहून अपराध्यासारखे तोंड फिरवले.

काय बिघडले आहे या घरात ? तो स्वतःशी म्हणाला. धन गेले ! केवळ एवढेच नाही. संतती नाही ! तेवढेही नाही. काही असो, या घरात सुख राहिलेले नाही. सगळ्या विटांचा संसार असाच असतो का ?

रस्त्याला लागताच महेश्वरदत्ताचा उत्साह वाढल्यासारखा वाटला. काही तरी ओझे मागे टाकून यावे तसा. आपले उत्तरीय खांद्यावर पटकून महेश्वरदत्त म्हणाला,

'वेशमध्ये जायचंय आपल्याला प्रथम. माझे एक काम आहे. आपण लहानपणी वेश पाहिली त्याहून फार निराळी आहे हल्ली. मी विट झालोय तुला ठाऊक आहे ना ?'

वात्स्यायन हळूच म्हणाला,

'तुझ्या बायकोने सांगितले.'

'तिने ज्या मुद्रेने सांगितले असेल ती विसर. विटांबद्दल लोकांना काय वाटते हे मला ठाऊक आहे. माझ्याकडे पाहा. विट झाल्याचे काही दुःख वाटतंय का माझ्या तोंडावर ?'

तोंड आणखी हसरे करून महेश्वरदत्ताने वात्स्यायनाकडे पाहिले. नव्हते – काहीही दुःख त्या तोंडावर नव्हते. इतका वेळ मनावर ओझे आल्यासारखे झाले होते ते एकदम उतरून वात्स्यायनही हसला. आपल्या पित्याबद्दल जे वाटत होते त्याचा अंशही याच्याबद्दल वाटत

नाही. त्याला आश्चर्य वाटले. महेश्वरदत्त म्हणाला,

'सगळे वित्त-घरदार घालवून बसलोय मी. आमच्या वाड्याचा तर साऱ्या अवंतीत विनोद झालाय. एकेक खोली धनश्रेष्ठींकडे कर्ज काढून टाकीत होतो. एकेक खोली जात होती. लोकं हसत होते. कधी कुणी एकेक खोली गहाण टाकलीय आणि कधी कोणी एकेका खोलीवर कर्ज दिलंय? पण ऋणको विनोदी आणि धनकोही विनोदी.'

मग सूर हळू करून तो म्हणाला,

'मी अवंतीबाहेर आता एक झोपडे पाहून ठेवलंय. कुणीतरी ऋषी व्हायला निघालेल्या वेड्याने ते बांधले होते. हळूहळू, बायकोजवळ अवंतीतल्या घाणेरड्या हवेबद्दल आणि दुष्टजनांबद्दल बोलायला सुरुवात केली आहे. शिवाय उघड्या जागी तपस्वी–मुनींसारखे राहणे कसे युक्त हेही तिच्या मनावर बिंबवतो आहे. अरे! जसा रंग द्यावा तसा स्त्रियांना खरा वाटतो.'

जरा वेळ दोघे मूकपणे चालले. महेश्वरदत्ताने एकदम थबकून विचारले,

'मित्र मल्लनाग! सांग कोणते चांगले? आपले धन आपण स्वत: घालवणे चांगले, की दुसऱ्याकडून फसवून घेऊन घालवणे चांगले?'

वात्स्यायन म्हणाला,

'अर्थात! स्वत:च स्वत:चे धन घालविणे चांगले.'

'मग मी तेच केले. तुला ठाऊकच आहे, आमचा केवढा व्यापार होता! पण व्यापार करणे माझ्या पिंडात नव्हते. हा विट-उद्योग होता माझ्यात. हा मला प्रियही वाटतो आहे. अरे! या पृथ्वीवरील निम्मीअधिक दुःखे कामविषयक आहेत. हा समोरून येणारा नागरिक बघ! याच्याजवळ धन आहे – हा तरुण आहे. हा वरून समाधानी वाटतो. पण रात्री पत्नीशी काय घडले असेल कुणाला सांगता येईल? याच्या मनात काय अस्वस्थता असेल कोण सांगेल? एके दिवशी तो माझ्याकडे येईल. मला म्हणेल, 'महेश्वरदत्त! मी तुला शरण आहे. माझे चित्त आजकाल अस्थिर झाले आहे. मला पत्नीकडून हवे तसे रतिसुख मिळत नाही. मला संसार असार वाटू लागला आहे.'

'आता त्याला वेश्या किंवा गणिका गाठून देणे हे माझे काम. पण त्याक्षणी 'चल! तुला वेशेत नेतो' असे म्हणणार नाही. मी त्याला प्रश्न विचारीन–'बाबा! तुला सुख म्हणजे काय हवंय? तुझे दुःख नेमके सांग.' मग तो एकेक सांगू लागेल. त्यावरून माझ्या ध्यानात येईल की, त्याला विपरित संभोग वगैरेंसारखे काहीतरी हवंय. पण संस्कारामुळे पत्नीशी ते मागता येत नाही. बाभ्रव्य कामसूत्रात विपरीत संभोगाबद्दल काही म्हणो, पण काही लोकांचे समाधान विपरिततातच असते. मग मी त्याला हवे ते मिळवून देईन. विपरीत कर्म आवडणाऱ्या स्त्रियाही असतातच. अरे काय सांगावे! तो मागायला संकोचत आहे पण त्याच्या पत्नीलासुद्धा विपरीतता हवी असेल.'

काही अंतर चालल्यावर महेश्वरदत्त म्हणाला, 'आलो आपण वेशेत. येथील घरांच्या कोठच्या कोठच्या शयनगृहात, द्यूतगृहात, मद्यालयात मी किती किती आणि केव्हा केव्हा धन घालवले दाखवू का? ज्या विषयात धन जाते त्या विषयाचीच गोडी लागते. माझ्यासारखे धन गमावणारे धनिक उगीच विट होत नाहीत!'

मग पुढे होऊन, यजमानाने स्वत:च्या घरापुढे पाहुण्याचे स्वागत करावे तसा वळून नमस्कार करीत महेश्वरदत्त म्हणाला,

'मित्र मल्लनाग! वेशेतल्या साऱ्या सुंदर आणि कामचतुर गणिकांच्या आणि वेश्यांच्या वतीने मी तुझे स्वागत करतो. पाहा! पाहा!'

'पाहा, पाहा' म्हणत पुढे चालत मागून येणाऱ्या वात्स्यायनाला तो वेशेचे वर्णन करीत म्हणाला,

'बघ! वेश्येच्या घरापुढील पुसलेल्या रांगोळ्या रात्रीची नागरिकांची वर्दळ सांगत आहेत. दारांवर लावलेल्या माळा कोमेजल्या आहेत. वेश्यांची घरे सोडताना नागरिकांनी फेकलेले गजरे जागोजागी पडले आहेत. त्या बघ, काही घरांबाहेर कंबोज घोडे आणि हत्तिणी उभ्या आहेत. त्यांचा माहुत आळसावला आहे. घोड्यांवरच्या पाठीवरची आसने दुमडून ठेवली आहेत. त्यांचे अधिकारी वेश्यांकडे गेले आहेत आणि अजून शय्या सोडण्याची त्यांची इच्छा नाही. ती एक वेश्या प्रेमिकाला समजावीत आहे. एक गाते आहे. तिला जागरण झालेले नसावे. ती कामिनी कामीकडून स्वत:ला सजवून घेत आहे. पलीकडे एकजण कामीची शेंडी बांधीत आहे. हा मस्त मोर आंब्याच्या मंजिरींच्या तालावर नाचतो आहे.'

महेश्वरदत्त वर्णन करीत होता आणि वात्स्यायनाचे अर्धे लक्ष तो वर्णन करीत असलेल्या गोष्टींकडे आणि अर्धे त्याच्या फुललेल्या चेहऱ्याकडे होते. घरापेक्षा हा इथे आनंदात आहे. आपल्या पित्याच्या मुखावर हा आनंद आपल्याला कधी दिसला नाही. येथील सौंदर्य आणि कुरूपता दोन्ही याला सुख देताहेत. हा आपल्या पित्याहून निराळा आहे. किंवा आपल्या पित्याकडे येणाऱ्या विटांहूनही निराळा आहे. विट असाही असतो.

वर्णन करता करता थांबून, एका घराच्या दारात बसलेल्या जख्ख म्हातारीकडे बोट करून महेश्वरदत्त म्हणाला,

'ही कामदेवाची चालती-बोलती कोरीव लेणी पाहा! तिच्या शरीरावरची गतविलासाची चिन्हे पाहा. ही गणिकांची राणी होती. हिचे ओठ पाहा. तारुण्यकाली प्रियकरांनी दंतक्षतांच्या वेळी चावलेले हिचे ओठ मध्ये गाठी पडून लोंबत आहेत. हिचे सुकलेले स्तन पाहा. त्या लोंबत्या स्तनांवर प्रियकरांनी नखक्षतांनी पांढऱ्या रंगाची रांगोळीच काढली आहे. ही कधी अलंकार घालीत नाही. अरे! या नखक्षतांच्या अलंकारांपुढे सुवर्णालंकारांचे काय? आणि उत्तरीय तरी कशाला? जी ती गणिका हिच्याकडे मत्सराने बघत जाते. जरा पुढे गेल्यावर हिची गमतीची गोष्ट सांगतो.'

म्हातारीच्या अंगावरून जाता जाता महेश्वरदत्ताने तिला आदराने अभिवादन केले. दहा पावले पुढे गेल्यावर तो म्हणाला,

'अजूनही एखाद्या प्रियकराला ती खेळवीत असते. माझा मित्र, थेरडा मृदंगीय, हल्ली तिचा प्रियकर आहे. काही दिवसांपूर्वी दोघे चुंबन घेत असता त्याचा एक दात पडून तिच्या तोंडात गेला. तोंड बाजूला करून तिने तो थुंकला, आणि ती हसू लागली. मृदंगीय इतका संतापला की, दोघांमध्ये शांती घडवून आणायला मला पराकाष्ठा करावी लागली.'

महेश्वरदत्त सांगता सांगता इतका हसत सुटला! वात्स्यायनाच्या मनात आले की, हा नक्की वेगळा आहे. आपल्या पित्याचा आनंद पैसे काढण्यात होता. त्यापायी आपण मुलांकडून कित्येक वेळा चिडवून घेतले आहे. एक कार्षापण पुढे करून एखादा मुलगा म्हणे,

'मल्लनाग! हे द्रव्य घे आणि मला वेशेत ने.' आपण संतापून बोललो नाही की तो म्हणे, 'अरे! तुझा पिता जे करतो ते करायला तुला करायला लाज का?' त्यावेळी संतापाने आपण काही मुलांना **मारलेही होते.**

महेश्वरदत्त हसतच होता. हसणे आवरल्यावर वात्स्यायनाचा हात धरून चालत म्हणाला,

'जरा पुढे ये मित्रा! गुरुगृहाच्या आवारात आणि पलीकडच्या रानात आपण हातात हात घालून हिंडत होतो तसे इथे वेशेत हिंडू या.'

वेशतले हिंडणे व गुरुगृहातले हिंडणे त्याने समान लेखावे याचा प्रथम वात्स्यायनाला धक्का बसला. पण त्याच्या लक्षात आले की, आपल्याला रागही आलेला नाही. महेश्वरदत्ताचा गुरुगृहीचा आनंद शुद्ध होता, इथलाही त्याचा आनंद शुद्ध आहे. विषय पूर्वग्रहदूषित असतात. आनंद सदा शुद्ध असतो.

महेश्वरदत्त वात्स्यायनाचा धरलेला हात दाबीत म्हणाला,

'आता तुझ्या दृष्टीचे सार्थक करतो. ही नायकीण तांबूलसेना घरातून लगबगीने बाहेर येत आहे, पाहिलीस? तिच्या स्तनतटांवरची नखक्षते अजून ताजी आहेत. डोळे चकाकत आहेत. बटा कपाळावर आल्या आहेत. मित्र! असे सौंदर्य पाहिले की; सार्थक झाल्यासारखे वाटते. म्हटलेच आहे–सुरतश्रमानंतरच स्त्रीचे सौंदर्य खुलते. अरे! देशोदेशींचे लोक हिच्यासाठी इथे गर्दी करून येतात. घे, आपले डोळे निववून घे. कुठे कुठे पाहशील सांगतो–आलिंगनांनी तिच्या स्तनांवरचे चंदन कुठे कुठे पुसले गेलंय पाहा. आलीच पुढे ती. जरा थट्टा करू या तिची.'

तांबूलसेना श्वास आवरत जवळ आली होती. महेश्वरदत्ताला नमस्कार करीत ती म्हणाली, 'प्रिय मित्र महेश्वरदत्ताचे स्वागत असो.'

महेश्वरदत्ताने गालात हसत म्हटले,

'तांबूलसेने! एवढे स्वागत कशासाठी? आणि तांबूलसेने! मला प्रिय मित्र म्हणतेस, मी धन्य आहे. पण काय ग? असे ऐकतो की, हल्ली सकाळसंध्याकाळ तुझ्याकडे 'होम' चालू आहे.'

तांबूलसेना मनस्वी लाजली आणि म्हणाली,

'दुसऱ्याची चेष्टा करायची तुम्हाला सवयच आहे.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'मी म्हणतो ते खोटे का? अग वेडे! म्हटलंच आहे–आकार लपविण्यातच आकार उघड होतो.'

तांबूलसेनेने विचारले,

'माझ्याबद्दल हे खोटेनाटे कुणी सांगितलें तुम्हाला?'

'कुणी सांगायलाच हवंय का? वेडे! तुझे आळसावत चाललेले डोळे, पडलेले कर्णफूल, ओठांवरचे लाल दंतक्षत–'

'चला चला! तुमचा काहीतरीच संशय. मी आताच झोपेतून उठल्ये.'

महेश्वरदत्त वात्स्यायनाचा हात दाबीत हसत म्हणाला,

'चुकले माझे तांबूलसेने! तुझे ओठ कुणीतरी स्वप्नात चावले आहेत. आणि पायांकडे पाहा! चर्मकाराने घाईघाईने डाव्या पायाचे पादत्राण उजव्या पायासाठी केले का? चोरटे! चोरलेला माल घेऊन तू कशी सुटशील?'

तांबूलसेनेच्या श्रांत गालांवर आलेली लाली पाहता पाहता वात्स्यायनाचे डोळेही सुखावले. नखक्षतांची स्तनांवर रांगोळी काढलेली स्त्री समोरून आली की रम्यच दिसते. आपला पिता कधी महेश्वर-

☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

**राजहंस प्रकाशने**

- **सांगत्ये ऐका**
  हंसा वाडकर
  (तिसरी आवृत्ती)
- **टॉलस्टॉय - एक माणूस**
  सुमती देवस्थळे
- **श्रीग्रामायन**
  श्री. ग. माजगावकर
- **शतपावली**
  रवींद्र पिंगे
- **पुरंदऱ्यांची दौलत**
- **पुरंदऱ्यांची नौबत**
  ब. मो. पुरंदरे

☆ ☆

दत्तासारखे बोलला नाही. तो बोलता तर—कदाचित मातेने उज्जयनी सोडली नसती. तो असे बोलता तर, आपल्यातही भय आणि संतापाने आलेली विपरितता आली नसती.

लज्जेने खाली मान घातलेल्या तांबूलसेनेने एकदम तोंड फिरवून आपल्या घराकडे धाव घेतली होती. घराशी पोहोचताच एका खांबाआडून ती चोरून दोघांकडे पाहत बसली. वात्स्यायनाचा धरलेला हात जोरजोराने हेलकावून महेश्वरदत्त वाकून वाकून हसू लागला. मग उत्तरियाने डोळ्यांतले पाणी पुशीत म्हणाला,

'चल.'

'मी ज्या कामाला आलोय ते सांगायचे राहिलेच.'

महेश्वरदत्त हसू आवरीत म्हणाला, 'आज मी नायक आणि नायिका दोघांचा दूत आहे. पाटलीपुत्राचा महापराक्रमी सेनापती कर्णीपुत्र, उत्तरपथात शत्रूचा निःपात करून परतत असता, विलासासाठी अवंतीत थांबला आहे. आर्यावर्तातील सारे वीर युद्धे जिंकून इथे येतात आणि पाहता पाहता इथे हरतात. वीर कर्णीपुत्र गणिका देवसेनेसाठी कामज्वराने पीडित आहे. गेले चार दिवस त्याला झोप नाही. देवसेनाही त्याच्यासाठी झुरते आहे. तीही सुकली आहे. चार दिवस कर्णीपुत्र रागावून तिच्याकडे गेलेला नाही. कारण काय, तर ठरले असताही ती वनयात्रेला आली नाही. ती का आली नाही हेही त्याने विचारले नाही. तिची बिचारीची बहीण रुग्णशय्येवर होती. प्रेमीजन मूर्ख असतात हेच खरे.

'कर्णीपुत्राला वेशेतून हिंडताना तू कधी पाहिले नाहीस. गणिकांत असतानाही त्याने कमरेची तलवार कधी काढली नाही. हरणाच्या कळपातून सिंह जावा तसा तो गणिकांमधून जातो. तुला चोलराजाची कथा ठाऊक आहे? सुरतकाली भान विसरून त्याने किलाप्रहाराने चित्रसेन नावाच्या गणिकेला ठार केले. कुंतलदेशाच्या शतकर्णीपुत्र शालिवाहनानेही, संभोगकाली महाराणी मलयावतीला मुष्टिप्रहाराने ठार केल्याची कथा आहे. हा कर्णीपुत्र आणखी इथे राहिला तर चार-दोन गणिकांची संख्या नक्की कमी होईल. उद्या एकदा त्याला देवसेनेसह पाटलीपुत्राच्या मार्गाला लावले की, सारा देश माझ्यावर पुष्पे उधळील.'

बोलता बोलता महेश्वरदत्त म्हणाला,

'थांब! ठिकाणावर आलो आपण. तू आत येतोस की इथंच उभा राहतोस? इथंच उभा राहा. मी आलोच.'

मग त्याने आपल्या उत्तरियाखाली दडवलेले एक लाल कमळ बाहेर काढून दाखवीत म्हटले,

'देवसेनेनं कर्णीपुत्राला भेट म्हणून हे दिलंय. नीट पाहा! तिने हे दातांनी किंचित चावलंय. स्तनांवर रगडून ओलसर केलंय. तिच्या उष्ण उच्छ्वासानी ते कोमेजलंय. तिच्या शरीरावरचे चंदन लागल्याने याचा रंग जरा फिका पडलाय. रात्रभर ते तिच्या सहवासात असल्याने त्याचे निर्माल्य झालंय. चतुर प्रेमिकांच्या या खुणा आहेत. कर्णीपुत्र त्यातला जाणकार आहे. हे कमल पाहताच तो कसा धावत येईल पहा. आलाच तो.'

घरातून आनंदाच्या आरोळ्या ठोकीत कर्णीपुत्र खरोखरीच बाहेर आला. त्याची सुप्रसिद्ध तलवार कमरेला लटकत होती. धावत येऊन महेश्वरदत्ताच्या हातातील कमळ घेऊन त्याने उराशी धरलं. मग पुढे होऊन त्याने महेश्वरदत्ताला आलिंगन दिले आणि त्याचा हात धरून त्याला घरात नेण्यापूर्वी गळ्यातला सोन्याचा हार त्याच्या गळ्यात घातला.

कर्णीपुत्राकडून उपाहार घेऊन बाहेर पडल्यावर महेश्वरदत्त स्वतः-वर अतिशय प्रसन्न होता. वारंवार गळ्यातील हाराकडे हात नेत स्वतःशी हसत होता. त्याच्या घरी पूर्वी पाहिलेले सोन्याच्या हारांचे, मोत्यांच्या माळांचे, हिरेमाणकांचे पेटारे वात्स्यायनाच्या डोळ्यासमोर आले. या एका हाराने महेश्वदत्ताला जेवढे सुख दिलंय त्याचा अंशही तेव्हा आपण त्याच्या तोंडावर पाहिलेला वात्स्यायनाला आठवेना.

घरातून निघताना जी थोडी विषण्णता होती तीही आता राहिली नाही. महेश्वरदत्ताच्या बोलण्याला आता खळ नव्हता. शब्द फुलून बाहेर पडत होते. तो म्हणत होता,

'ऐक मित्र! ऐक! फुलांचे खिदळणे तुला ऐकू येत आहे का? भुंगे मस्त होऊन गुंजारव करीत आहेत, कोकिळा कुहूकुहू ओरडत आहेत. घाम कसा छान वाटतो आहे. हवा गोड केली आहे त्याने. कठोर, प्रचंड कामाने वसंत भरून गेलाय. एकवेळ हजारो दुतींना, कुमारिकेला आपल्या प्रियकराकडे नेता येणार नाही, पण वसन्त एकटा ते कार्य करतो.

'मित्र मल्लनाग! वसंतऋतू तहान आणतो. कुठेतरी पेयपान करू. ते पहा पलीकडे पेयागर. तुझ्याजवळ किती द्रव्य आहे?'

वात्स्यायन म्हणाला,

'दोघांपुरते भरपूर आहे'

'ठीक! आजचा दिवस तुझ्याबरोबर घालवणाराय मी. आज अनाध्याय! गुरुगृही पाहुणे आले की अनाध्याय असायचा ना?'

वात्स्यायनाच्या मनात आले, याला फक्त दोन काल आठवतात. एक गुरुगृहीचा! दुसरा या वेशेतला. मधला काळ तो बहुधा विसरलाय. विपरीत चित्रे काढीत बसण्याचा आपला काळ आपणास आठवत नाही तसा. आणि विवाहानंतरचा काळ आपणास आठवावासा वाटत नाही तसा. पण पत्नीला तो आठवत असेल. एकदा तिने बोलावे. तेव्हाचे सगळे बोलून टाकावे.

पेयागरात जाऊन पेय घेत असता महेश्वरदत्त म्हणाला,—


'आपल्या गुरूकडे मी बरेच वर्षांत गेलो नाही. येत असलास तर जाऊ या. पुन्हा कदाचित गाठही पडायची नाही त्यांची.'

'जाऊ या!' वात्स्यायन म्हणाला. 'तुझ्या घरी कळवायला हवंय का?'

'वेडा आहेस!' हात उडवीत महेश्वरदत्त म्हणाला, 'अरे! मी सकाळी बाहेर पडतो तो रात्री घरी जातो. रात्रीपर्यंत परतलो की झाले.'

पत्नीविषयीचा मित्राचा निष्काळजीपणा वात्स्यायनाला दुःखकारक वाटला. त्याच्या मनात आले, हे इतके चांगले नाही. यामुळेच त्याच्या संसारात दुःख वाढत आहे. पण आपण पत्नीची चिंता करतो त्यामुळे तरी सुख होते का? आपण फारच चिंता करीत बसतो. तो मुळीच करीत नाही. कोणतेही अतिरेक दुःखाला कारणीभूत होतात, हेच खरे.

[क्रमशः]



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण सोळा : सिमला येथील वरिष्ठ न्यायालयात ( २ )

दिनांक १७ मे रोजी श्री. डांगे यांचे भाषण सुरू होताच आता त्यानंतर माझाही क्रम केव्हाही येणार याची मला अपेक्षा होतीच. म्हणून मी त्या दृष्टीने 'तयार' असाच होतो. याच दिवसांत माझ्या तयारीत माझे मन सर्वस्वी मग्न असता, एके रात्री झोपेत पहाटेच्या वेळी मला सुलक्षणी स्वप्न पडले होते नि त्याने मला आणखीच उत्साहित केले होते. कारण त्या स्वप्नाचा माझा पूर्वीचा अनुभव असा होता की, ते स्वप्न ज्या दोन-तीन वेळी मी बघितले, त्याच्यापाठोपाठ लगेच माझ्या आयुष्यातल्या फार गुप्त घटना अकस्मात घडल्या होत्या. ते स्वप्न माझ्या स्वप्नहोराविशारद वाचकांसाठी येथे सांगतो. त्या स्वप्नात मला गेल्या प्रत्येक वेळी एक सोनेरी नाग फणा उभारलेला असा जाताना दिसला होता. यावेळी तर एक मोठा नाग फणा उभारलेला होता. पण त्याच्या जोडीला एक लहानसा नाग–तोही फणा उगारून जात होता ! ही स्वप्न-घटना मी डांगे यांना सांगितली नि त्यांचे ज्योतिषही विचारले. पण त्यांनी साईबाबांच्या तऱ्हेवाईकपणाने मला 'बरे बरे, आपले काम बघा आधी !' असे तुसडे उत्तर दिले. मला वाटले, ते आपल्याच कामात आहेत म्हणून असे म्हणाले असतील. मी किंचित हिरमुसल्यासारखा होऊनच, पण आपल्या कामाचा पुन्हा विचार करायला लागलो नि अबोल उत्कंठेने माझ्या नंबराची वाट पाहत होतो.

दिनांक २० मे रोजी मी माझ्या भाषणाचा आरंभ कटाच्या आरोपांबद्दल सामान्यपणे चर्चा करून करायचे ठरवले होते. म्हणून सुरुवातीस मी 'कटाच्या आरोपांबद्दल थोडे सांगून त्या संदर्भानेच गोपाळ गोडसेच्या अपिलाबाबत तर्कनिवेदन करणार आहे आणि मग डॉ. परचुऱ्यांच्या अपिलाबद्दल निवेदन करीन' असे सांगितले. आणि म्हणून मी पाकिस्तान-हिंदुस्थानमधल्या निर्घृण विभाजनाचे कंदन संपले नव्हते, तेव्हाच पाकिस्तानने कसे सशस्त्र दंगेखोर 'काश्मिरी' असे म्हणून काश्मिरी प्रदेशात पाठवायला सुरुवात केली व त्याचा प्रतिकार करण्याची जबाबदारी हिंदुस्थानवर कशी येऊन पडली व त्याचेच एक अंग म्हणून स्वतंत्र भारत सरकारने कसे विभाजनाच्या हिशोबाचे ५५ कोटी रुपये पाकिस्तानला देण्याचे स्थगित करून, 'आधी तुमच्या या दंगेखोरांना परत बोलवा व त्यांना आवरा' असे पाकिस्तानला बजावले, याचा सर्वश्रुत ताजा लिहिला जात असलेला इतिहास सांगितला. भारत सरकारचे हे पाऊल सर्वस्वी अहिंसक होते व त्याने महात्मा गांधींना काही वाटण्याचे कारणही नव्हते. पण महात्मा गांधींनी दिल्लीच्या हिंदु-मुस्लिम दंग्याचे मी हिंदु-मुस्लिम एकीच्या आग्रहाचे निमित्त करून दिल्ली येथे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात उपास सुरू केला, ही घटना सांगितली. मी हे सारे गंभीर चेहऱ्याने पण करुणेच्या स्वराने बोलत होतो. अगदी लिहून ठेवलेली वाक्येच बोलत होतो–एकापाठोपाठ दुसरे. भारत सरकारने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये न देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय बदलून पाकिस्तानला ५५ कोटी रुपये विनशर्त देऊ करताच महात्मा गांधींनी १३ जानेवारी ४८ ला आपल्या उपवासाचे पारणे केले नि प्रकृती ताळ्यावर येताच २७ जानेवारी ४८ ला मुल्ला, मौलवी, हाजी हाफिजजींच्या घोळक्यात बिर्ला भवनाच्या प्रांगणातल्या प्रार्थनासभा पुन्हा चालू केल्या होत्या. राम-रहीम, कृष्ण-करीमच्या निनादात भजने चालू होती व दिल्लीच्या थंडीच्या कडाक्यात मुसलमानांच्या ओस मशिदींमधून आसरा घेतलेले असंख्य निर्वासित हिंदू पुन्हा रस्त्यावर लोटले जात होते. या निर्घृण वातावरणातून आलेल्या पोरवयाच्या एका तरुणाने महात्मा गांधींच्या प्रार्थनासभेच्या वेळी दिनांक २० ला दूर अंतरावर एका सुरुंगाच्या दारूभरल्या विटेचा

उघड्या जागेवर स्फोट केला नि स्वतःला पकडू देण्यास काही अडथळा केला नाही. त्याचे म्हणणे, 'मला महात्माजींकडे घेऊन चला. मला त्यांच्या कानांवर निर्वासितांचे वेदनानिवेदन सांगायचे आहे.' त्या मुलाला दिल्ली पोलिसांनी पकडताच पोलीसठाण्यात बंद केले नि वर्तमानपत्रांनी व भारतीय आकाशवाणीने आरोळी ठोकली की, 'महात्माजींच्या प्रार्थनासभेत बॉम्बस्फोट' – 'प्रार्थनासभेवर बॉम्ब फेकला.' त्या तरुणाला–मदनलालला–पोलिसांनी दहा दिवस कैदेत ठेवूनही त्याच्याकडून पोलिसांना एवढेच कळले की, 'त्याला दारूगोळा देणारा एक दाढीवाला, लांब केस–चष्मावाला मराठी माणूस आहे नि त्या माणसाच्या माहितीचे काही लोक मरीना हॉटेलमध्ये उतरले होते. सर्वसाधारण जनता नि पोलीसही बॉम्बस्फोटाच्या बातमीलाच चघळीत असता, तीस जानेवारीला प्रार्थनासभेच्या प्रांगणात महात्मा गांधींवर पिस्तुलाच्या गोळ्या झाडून वध केल्याची घटना घडली! ह्या अमानुष नि अतर्क्य घटनेने होणारी सामान्य जनतेची नि पोलिसांची प्रतिक्रियाही वीस जानेवारीच्या घटनेला तीस जानेवारीच्या घटनेशी जोडून विचार करण्याचीच होती यात नवल नव्हते. या दोन घटनांचा एकसंध विचार करण्याचा–जोडण्याचा–मोह होणे अनिवार्यच होते. कारण घटनास्थान एक, घटना लक्ष्य एक नि घटनामाध्यम एक नि दोन्ही घटनेमधले काळाचे अंतर किती थोडे! दोन्ही घटना एकच आहेत–दोन्ही घटनांचे कर्ते एकच–कटवाले! ही प्रतिक्रिया किती साधी सहज होती! महात्म्याच्या वधाने जगभर झालेल्या अपार दुःखात नि तीव्र संतापात कटाच्या प्रतिक्रियेसाठी कुणाला नि कसा दोष द्यायचा? 'पण महाराज!' त्या दिवशी मी म्हटले होते, 'महात्मा गांधींच्या निर्वाणाने झालेल्या अगणित लोकांच्या अथांग शोकावेगाची ती प्रतिक्रिया होती, या सारख्या दिसू शकणाऱ्या दोन घटनांचे भांडवल एकत्र करू पाहणाऱ्या महाचतुर राजकारणी नेत्यांची ती प्रतिक्रिया होती! आणि या महामतलबी राजकारणी नेत्यांनी या नथूरामला एक प्रतीक बनवले. आणि प्रतीक कशाचे? प्रेस ॲक्टच्या काळ्या कायद्यान्वये मुंबई शासनाने ज्याच्याकडून जमानतीवर जमानती मागून त्या सगळ्या जप्त केलेल्या आहेत अशा संपादकाचे? नाही महाराज! निर्वासितांचे अमाप दुःख पाहून व्यथित झालेल्या हृदयाचे? नाही महाराज! गांधींजीच्या अजब तर्कटाने त्रस्त होऊन गेलेल्या मीमांसक बुद्धिवादाचे? नाही महाराज! नवनिर्मित राष्ट्राचे सर्वांगीण संरक्षण करण्यासाठी आवश्यक शासनव्यवस्था आणि राष्ट्रीय राजनीती सांभाळू न शकलेल्या दुबळ्या भारत शासकांच्या रक्षणासाठी हातात पिस्तूल घेणाऱ्या देशभक्ताचें? मुळीच नाही, महाराज! याचे उलट महामतलबी राजकारणी लोकांनी नथूरामला प्रतीक बनविले त्यांच्या राजकारणातल्या विरोधी पक्षांचे!' मी नम्रपणे पुढे निवेदन चालू केले. 'भारताच्या केंद्रीय शासनाने आणि विभिन्न राज्यांच्या शासनाने ठरवले की, ही खुनाची घटना हिंदुसभाई आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांनी केलेल्या खुनाच्या कटाचा परिणाम आहे. याचा परिणाम देशभरच्या हिंदुसभाई आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघीय मंडळींची सर्रास धरपकड सुरू झाली. शासक मंत्रिमंडळातील गृहमंत्र्यांनी खुनाची चौकशी 'कट आहे' असे लक्षात ठेवूनच करावी असे 'आदेश' दिले. आणि काँग्रेसी गृहमंत्र्यांना ३० तारखेची भयंकर बातमी ऐकून झोपेतून उठवल्यासारखे तीन दिवसांनी आठवले की, या संकटाची बातमी आपल्याला 'कोणीतरी' सांगितली होती आणि हीच मोघम बातमी त्यांनी मुंबईच्या पोलीसकमिशनरना सांगितली नाही. देशभर विरोधी पक्षाच्या लोकांच्या धरपकडी चालूच होत्या आणि या धरपकडीत पोलिसांनी, तुम्ही-आम्ही जन्मलोही नव्हतो इतक्यापूर्वीच मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या मागणीसाठी जगप्रसिद्धी मिळालेल्या महान देशभक्त स्वातंत्र्यवीर सावरकरांपासून तो ज्यांचे नाव त्यांच्या मालकाखेरीज कुणालाही माहीत नव्हते अशा शंकर किस्तय्यासारख्या क्षुद्र अनामिकापर्यंत सर्वांना पकडून महात्मा गांधींच्या खुनाचे कटवाले बनविले.'

'महाराज, ही सारी प्रतिक्रिया सामान्य माणसाची व महाधूर्त पक्षनेत्यांची आहे. आपण येथें न्यायालयात या दोन्ही समान भासू शकणाऱ्या घटनांना कटांच्या स्वरुपात, मतलबी राजकारणाच्या दृष्टीने बघणे हे योग्य होणार नाही. तसेच जन्मभूमीमधून हाकलून दिलेल्या निर्वासितांच्या दयनीय हालअपेष्टांमध्येही शोकनाट्य शोधणाऱ्या सामान्य माणसाच्या दृष्टीनेही बघणे योग्य होणार नाही. महाराज! आपण सत्ताधिष्ठित राजकारणाच्या प्रभावाने किंवा आपणापासून हिरावून घेतले गेलेल्या एका महात्म्याच्या शोकावेगाने वाहवून न जाता न्यायालयीन निष्पक्षतेने याकडे बघितले पाहिजे!' मी पुढे निवेदन केले की, मदनलालने केलेला २० जानेवारीचा स्फोटक आवाज हे त्याचे एकट्याचे कृत्य होते असे आपणास पटविण्याचा प्रयत्न मी दोन आधारावर करणार आहे. पहिल्या आधाराबद्दलचे माझे नम्र निवेदन असे की, २० जानेवारीच्या घटनेचे प्रमाण म्हणून घेतलेला माफीच्या साक्षीदाराचा पुरावा, त्याच्या पोलिसांनी घेतलेल्या चौकशीत त्या प्रश्नपरीक्षणाचा आधार न दाखवता ५७ वा साक्षीदार म्हणून नंतर घेण्याने अभियुक्त अपिलंट पक्षावर अन्याय झाला आहे. कारण त्या माफीच्या साक्षीचे पुष्टीकरण आधीच्या साक्षीत घेतल्याने त्या पुष्टिकारक साक्षीदारांचे योग्य ते कूटपरीक्षण बचावपक्षाकडून होऊ शकले नाही. आणि दुसऱ्या आधाराबद्दल माझे तर्कनिवेदन असे आहे की, मुंबई–राज्यपालांच्या काँग्रेसी मंत्रिमंडळाचे माननीय गृहमंत्री काय किंवा महाविद्यालयातील विद्वान प्रोफेसर काय किंवा एक त्यांच्या ओळखीचा कुणीतरी काय हे तिघे सांगतात की, त्यांना राष्ट्रपित्याच्या खुनाच्या कटाची बातमी ३० जानेवारी ४८ पूर्वीच कळली होती. पण याची पोलिसांच्या डायरीत साधी नोंदसुद्धा या तिघांनी केली नाही. यामुळे त्यांची साक्ष पश्चात बुद्धीचे गप्पाष्टक आहे असे म्हटले पाहिजें आणि या बाबतीतच्या त्या माफीच्या साक्षीदाराचा व त्याच्या पुष्टीकरणाच्या साक्षीचा परीक्षणक्रम कोर्टाच्या फायलीवरून दाखवून व गृहमंत्री आदी साक्षीदारत्रयींबाबतचे फायलीमधले आधार दाखवून मी निवेदन केले की, कमीत कमी माझ्यासारख्या बचाव पक्षाच्या वकिलाचे नम्र निवेदन असेच आहे की, महाराज! आपण ह्या अन्यायाने, अनियमितपणे, नियमित लेखांच्या अभावात ऐकलेला–नोंदविलेला पुरावा मुळीच विचारात घेऊ नये. सगळाच्या सगळा साक्षीमध्ये अमान्य, अग्राह्य असा मानावा. आपल्या भारतीय धर्मन्यायशास्त्राचा एक महत्त्वाचा सिद्धान्त असा आहे की, न्यायप्रक्रियेत अनेक अपराधी मुक्त झाले तरी चालतील, पण त्या प्रक्रियेने निरपराधी माणसाला

शिक्षा-दंड दिला जाऊ नये. तसेच आपल्या भारतीय न्यायालयांमधल्या सिद्धान्तांपैकी हाही एक सिद्धान्त आहे, कोणताही अभियोग असो, सामान्य माणसाच्या खुनाचा असो किंवा जगद्वंद्य महात्म्याच्या खुनाचा असो, न्यायालयातल्या पुराव्याचे प्रामाण्य जोखण्याचे मोजमाप दोन्ही अभियोगाचे सारखेंच राहील, डावे-उजवे राहणार नाही. असे सिद्धान्त अजूनही असतील तरं मी वरिष्ठ न्यायपीठाकडून हीच आशा बाळगीन की, आपणही या अभियोगातला पुरावा फार काळजीपूर्वक पाहावा. निष्पक्ष न्यायदृष्टीनेच बघावा. मी पुढे हेही नम्र निवेदन केले की, या अभियोगामधल्या माफीच्या साक्षीदारांची व काही अभियुक्तांची अगदी वेगळ्या संबंधात, या अपराधकटाशी पूर्णतया असंबद्ध अशा संदर्भात ओळख होती. परंतु त्या संबंधाच्या माफीसाक्षीदारांच्या तोंडच्या गोष्टी, या कटाच्या अपराध्याच्या पुराव्या साखळीतले दुवे म्हणून, विश्वासयोग्य मानणे न्यायाचे होणार नाही. ते निश्चितपणे फार धोक्याचे होईल. कारण त्याने अर्धसत्ये सांगून सत्याचा आभास निर्माण करू पाहणाऱ्या खोटारड्या माणसाच्या लबाडीने आपण फसविले जाऊ. म्हणूनही माफीचा साक्षीदार बडगे याचा पुरावा फार काळजीपूर्वक विचारात घ्यायला पाहिजे.

या अभियोगपर्वामध्ये चौकशी अधिकाऱ्यांनी कशी चौकशी केली हे सांगताना मी नम्र निवेदन केले होते की, चौकशी पोलिसांना दैवाची कृपा व्हावी असा खुनी अभियुक्त मिळाला. त्या खुनी अभियुक्ताचा दैनंदिन व्यवहारातला, राजकारणातला नि दैनिक वर्तमानपत्र चालविण्याच्या व्यवसायातला सहयोगी असा आपटे अभियुक्त मिळाला. चौकशी पोलिसांना दुसरे केंद्र पूर्वीच मिळाले होते ते मदनलालचे. आणि मदनलालचे संबंधित म्हणून पोलिसांनी करकरे आणि बडगे यांनाही अभियुक्त बनवले. या अभियुक्तांमधल्या बडगेबरोबर शंकर किस्तय्यासारखा त्याचा नोकरही अभियुक्त बनवता आला. एवढेच नव्हे तर, अभियुक्त बडगेला एका पोलिसाच्या भावाला माफीच्या साक्षीचे आमिष दाखवून, त्याच्या बेकायदा दारूगोळा मिळविण्याच्या, बाळगण्याच्या, विकण्याच्या व्यवहाराची संशयित गंगोत्री म्हणून किंवा खूनी नथूरामचा मिलिटरी छावणीत नोकरी करणारा भाऊ म्हणून गोपाळ गोडसेलाही पकडता आले. सावरकरांचे चित्र आपल्या दैनिक वर्तमानपत्र हिंदुराष्ट्रच्या पहिल्या पानावर गुरुदेव म्हणून छापले जात असे. यामुळे हिंदुसभाई सावरकरांना या खुनाच्या कटाचा मध्यबिंदू म्हणून पकडणे काही आश्चर्य नव्हते. तसेच ग्वाल्हेरच्या हिंदुसभाई परचुऱ्यांना पकडल्यावर २८ जानेवारीला नथूराम ग्वाल्हेरला आला होता हे पाहून डॉ. परचुऱ्यांजवळचे अनुमत — लायसेन्स्ड पिस्तूल हुबेहूब नथूरामच्या हातात सापडलेल्या इटालिअन बरेटा पिस्तुलासारखे आहे असे पाहून डॉ. परचुरे यांचा या खुनाच्या कटाच्या आरोपाचे अभियुक्त बनवणे दोन दृष्टीने शक्य झाले. एक तर एका पिस्तुलाच्या जागी दुसरे पिस्तूल संशयित वस्तू म्हणून दाखवणे ही हातचलाखी किंवा नुसत्या हातचलाखीच्या धमकीने कटाच्या गुन्ह्याचा कबुलीजबाब मिळवायचा व महात्मा गांधींच्या खुनाचा देशभरच्या हिंदुसभाई लोकांनी कट केला होता हा प्रचाराचा नगारा बडवायचा. डॉ. परचुऱ्यांनी पहिल्याच बंदर-घुडकीत हातपाय गाळून कटाच्या गुन्ह्याचा कबुलीजबाब लिहून दिला. हे या महात्मा गांधी खून खटल्याच्या कटाच्या आरोपांचे महाभारत आहे.

महात्मा गांधी खून खटल्याच्या चौकशी अधिकाऱ्यांनी या अभियोगाची — खुनाच्या कटाची — साग्रसंगीत कहाणी कशी बनवली याविषयीचे माझे वरील तर्कनिवेदन मी अपिलाच्या न्यायपीठापुढे माझ्या भाषेत निवेदन केले होते. माझ्या या निवेदनाच्या वेळी मला न्यायपीठाच्या माननीय न्यायमूर्तींकडून प्रश्न विचारले जात होते. विशेषेकरून माननीय न्यायमूर्ती जस्टिस खोसला हे मला एकसारखे प्रश्न विचारीत होते नि मी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडून होईल तितक्या शांतपणे नि योग्य रीतीने संदर्भ सांगून, पुरावा दाखवून देत होतो. न्यायालयामध्ये न्यायाधीश आणि वकील यांमध्ये चालणाऱ्या तर्कयुद्धाचे एक रंगतदार नाटयच प्रेक्षकश्रोत्यांना पाहायला-ऐकायला मिळाले असावे. याच सुमारास न्यायपीठावरच्या माननीय मुख्य न्यायाधीशांनी-जस्टिस भंडारी व जस्टिस अछरूरामजींनी मला म्हटले होते, 'इनामदार, तुम्ही सुरुवात तर फार छान केली आहे. आतापर्यंतचे तुमचे म्हणणे समजण्यासारखेच आहे. असेच काही तरी, आणखी असेच महत्त्वाचे आम्हाला सांगा!' मी माझ्याकडून महत्त्वाचे मुद्दे सांगायचा अटीतटीचा प्रयत्न करीत होतो. प्रश्नांच्या भडिमाराने माझ्या भाषणाचा ओघ विस्कळीत होत होता. कुणी कुणाचे समाधान केले याचा निर्णय व्हावयाच्या आतच त्या दिवसाचा कोर्टाचा वेळ संपला नि आम्ही बाहेर आलो. कोर्टातून निघून आम्ही सर्व वकील मंडळी चालत सेसिल हॉटेलकडे परत येत असता श्री. दफ्तरी मला सर्वांसमोर म्हणाले, 'इनामदार! तुला ते बोलू का देत नाहीत? तुझे आतापर्यंतचे भाषण किती विचार करण्यासारखे आहे! तुला बोलूच दिले नाही, तर कुणालाही काय करता येईल? काही तरी कर आणि त्यांचे समाधान कर!' मी तरी आणखी काय करीत होतो! माझे नम्र निवेदन करून न्यायपीठावरच्या न्यायमूर्तींचे समाधान करून देण्याचा माझ्याकडून होईल तितका प्रयत्न करणेच मला शक्य होते. मी न्यायाधीशांशी वादावादी करून भांडणे व त्यांना नाराज करणे? छे, छे, असे तर मी मुळीच करणार नाही — केले नाही. त्या दिवशी बाररूममधले मतप्रदर्शन असे होते— 'इनामदारजीने घंटा ढेढ़ घंटा अदालत को चकाचौंध कर दियाजी!', 'अजी साहब प्रासिक्युशनके छक्के छुडवा दिये है इनामदारने!' ही माझी कल्पना नव्हे. श्री. अवस्थीच मला सांगत होते!

दि. २१ ला दुसरे दिवशी मला न्यायपीठावरून विशेष काही प्रश्न विचारले जात नाहीत हे सुरुवातीपासूनच जाणवायला लागले होते, हे मला कबूल केले पाहिजे. यामुळेच की काय, मी गोपाळ गोडसेच्या वतीने असे त्याच्या बचावाचे तर्कनिवेदन सांगताना मला निर्वेधपणे बोलता आले होते. मी सविस्तरपणेच सांगत होतो, पण माझ्या भाषणात वेळ फार खर्च होत नव्हता. मी संदर्भासहित

**'इनामदारजीने घंटा ढेढ़ घंटा अदालत को चकाचौंध कर दियाजी!'**

सविस्तर रीतीने गोपाळ गोडसेकडून कोणतीही अभियोजक वस्तू पोलिसांना मिळवता आली नव्हती, अभियोजक वस्तू म्हणून वस्तू-प्रदर्श क्र. ५४ खाकी कापडाची पिशवी ही कुणाची पिशवी हे पोलिसांना सिद्ध शब्दात कोणाकडूनही सांगवता आले नाही, ओळख परेडीच्या कवायतीचे शिक्षण घेतलेले अभियोग साक्षीदार कसे भरंवशालायक नाहीत, कसे सारे साक्षीदार क्षणिक ओळखीचे साक्षीदार होते पण ते वरळीच्या पोलीस केन्द्रात जाऊन आलेले होते, जेथे सगळे अभियुक्त ठेवलेले होते व जेथे पोलिसांपाशी अभियुक्तांची फोटोचित्रेही पाहायला ठेवली होती, आणि हस्ताक्षर-ओळख सांगणाऱ्या साक्षीदाराने कसे गोपाळकडून अभियोजक हस्ताक्षरासारखे हस्ताक्षर काढवून घेऊन त्यावरून आपले मत देण्याचा आव आणला होता आणि कसे गोपाळच्या १७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी ४८ च्या दिवसांतल्या हालचालींबद्दलचा अभियोगपक्षाचा पुरावा, गोपाळच्या उकसाण किंवा खडकी येथील त्याच्या वास्तव्याबद्दल काहीही चौकशी न करता व तसा पुरावा कोर्टापुढे न आणता कोर्टापुढे ठेवला होता आणि गोपाळच्या बचावाचा साक्षीदार होऊ शकणाऱ्या साक्षीदाराला पोलिसांनी कसे आधीच गाठून त्याच्याकडून आपल्या मतलबाचे लिहून घेतले, पण त्याला कोर्टापुढे आणले नाही. आणि कसे तो साक्षीदार मराठी ब्राह्मण असल्याने त्या दिवसांत ब्राह्मणविरोधी वातावरणाने भ्यायलेला होता, वगैरे संदर्भासहित सांगितले. या सर्व मुद्द्यांबद्दल बोलताना मला नथूरामने केलेल्या भाषणाची पुष्कळच मदत झाली होती. त्यामुळे मला हे काम पुष्कळ थोड्या वेळात करता आले होते.

शनिवारी विश्रांतिमध्यानंतर मी ग्वाल्हेरच्या साक्षीदारांबद्दल बोलायला सुरुवात केली आणि सुरुवातीसच अभियोग साक्षीदार मधुकर काळे, जगदीश गोयल, मधुकर खिरे, रामदयालसिंग, जगन्नाथसिंग यावद्दल सांगितले व दोघा टांगेवाल्यांबद्दलही बोलायला आरंभ केला होता. मी प्रत्येक साक्षीदाराच्या साक्षीतले अभियोगपक्षाच्या कहाणीविरुद्ध किंवा डॉ. परचुऱ्यांच्या बाजूचे असे मुद्दे सांगून आणि एकेक साक्षीदार कसा भरंवसा ठेवण्यायोग्य नाही याबद्दलची माझी सर्व कारणे सांगत होतो. हे सर्व सांगत असता एक गोष्ट माझ्या लक्षात येऊ लागली की, मी टीका करीत असलेल्या मुद्द्यांचे खंडण करण्याचा किंवा त्या मुद्द्यांचे उलट संदर्भ सांगण्याचाही तिघा न्यायमूर्तींपैकी कुणीही प्रयत्न करीत नव्हते, कुणीही काही प्रश्न विचारीत नव्हते, एवढेच नव्हे तर, माझ्या टीकेला मान डोलवीत होते! मी एखादा संदर्भ सांगताच जस्टिस अछरूरामजी मला चटकन पुस्तक, पान, ओळ काढून वाचूनही दाखवीत होते. ग्वाल्हेरच्या या साक्षीदारांबद्दल मला निर्वेधपणे बोलता आले. एवढेच नसून तिघेही न्यायमूर्ती माझ्या मताशी सहमत असल्याचा विश्वास वाटू लागून मी अधिक विश्वासाने बोलू लागलो होतो. विशेषतः मधुकर काळे व जगदीश गोयल या दोघा साक्षीदारांविषयी माननीय न्यायमूर्ती जस्टिस अछरूरामजी माझी बाजूच उचलून धरीत असल्याचे मला प्रकर्षाने जाणवले होते, हे मला येथे निर्मळ मनाने कबूल केले पाहिजे. मी काही आडपडदा न ठेवता, माझ्या बाजूचे तसे मी जे काही साक्षीदारांकडून सिद्ध करू शकलो नाही तेही सांगून ते मी का सिद्ध करू शकलो नाही हेही मोकळ्या भावाने सांगत होतो. इतक्या दिवसांनंतर मला त्या दिवसाच्या कोर्टातल्या वातावरणाची आठवण झाली असता, माझ्या तर्कनिवेदन पद्धतीच्या मोकळेपणे व दोन्ही बाजू सांगून आपल्या बचावाची सीमा स्पष्टपणे कबूल करण्याच्या अंगाचे महत्त्व विशेषेकरून सांगावेसे वाटते. अशा तऱ्हेने तर्कनिवेदनाची पद्धत अनुसरण्याने न्यायाधीशाला आपल्या बोलण्यातील प्रामाणिकपणाविषयीही विश्वास वाटू लागतो व आपले संदेहात्मक मुद्देही स्वीकार होऊन त्याच्या समर्थनासाठी नवीन आधार न्यायाधीशांकडून मिळतो, असा माझा वकिलीच्या व्यवसायातला अनुभव आहे. विशेषतः न्यायाधीशांना विश्वासात न घेता आपल्या बाजूचा कमकुवतपणा लपवून ठेवण्याचा प्रयत्न करणे किंवा अवास्तव अथवा उर्मटपणाची भाषा वापरून विरोधी वकिलाचा किंवा न्यायाधीशाचा अपमान करण्याचा, त्यांना खाली मान घालावयास लावण्याचा प्रयत्न करणे ही अतिआत्मघातक पद्धती आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. असो.

यानंतर रविवारच्या सुटीचा दिवस आला. त्या दिवशीचे माझे विचार काहीसे खालीलप्रमाणे होते. मला वाटत होते, आतापर्यंत मी थोडे फार काही तरी करू शकलो आहेसे वाटते. पण उद्या कबुलीजबाबाचा भाग मी कसा हाताळू–कसा हाताळू शकेन? हे खरे आहे की मजजवळ पुष्कळच सांगण्यासारखे आहे–न्यायमूर्तींची सहानुभूतीसुद्धा मिळेल असे सांगण्याजोगे आहे. पण! न्यायमूर्तींनी मला जर तो निर्दय प्रश्न विचारला–त्यांनी विचारले, 'इनामदार! तुमच्या पक्षकाराचे म्हणणे की, कबुलीजबाब खोटा आहे, असे होते तर तुमच्या पक्षकाराने कबुलीजबाबावर सह्या का केल्या?' तर या साध्या प्रश्नाचे मी कसे–कशाच्या आधारावर उत्तर देऊ? मला अजूनही आठवते की, त्या रविवारी सारा वेळ मी किती बेचैन होतो? माझी सारी तडफड खरे काय आहे याबद्दल नव्हती. माझी तडफड होती सत्य कोर्टासमोर किती एकाकी असते याबद्दल. माझी तडफड होती पोलिसांच्या कोठडीत दीर्घकाळ मॅजिस्ट्रेटच्या किंवा वकिलाच्या मदतीशिवाय राहणाऱ्या बंदीबद्दल!

दिनांक २३ मे रोजी मी हायकोर्टात गेलो तो रस्त्यावर मुकाट चेहऱ्याने चालत, पण मनात करुणाघन परमेश्वराची करुणा भाकीतच! त्यामुळे मला वाटते, ती सारी वाट चालून जाण्याचे त्राण मला मिळाले!

कोर्टाच्या कामास आरंभ होताच मी उभा राहिलो नि ग्वाल्हेरच्या साक्षीदारांपैकी शनिवारी वाचून दाखविलेले सारे साक्षीदार किती फुसके किती अविश्वसनीय आहेत, त्या साक्षीदारांच्या पुराव्याने डॉ. परचुरे महात्मा गांधींच्या खुनाच्या कटात सामील होते असे मुळीच सिद्ध होत नाही हे सांगितले. विशेषतः त्यांतले महत्त्वाचे असे दोन साक्षीदार मधुकर काळे नि जगदीश गोयल तर, पोलिसांच्या बेकायदा कैदेतून सरळ कोर्टात आणून उभे केलेले आहेत. पोलिसांच्या जुलमाने घाबरलेले ते दोन पोरवजा तरुण! त्यांच्या साक्षीवर डॉ. परचुऱ्यांसारख्या माणसाला खुनाच्या कटाचा गुन्हेगार ठरवणे अन्यायाचे होईल. दोन टांगेवाले साक्षीदार तर चक्क अभियोगपक्षाच्या कहाणीच्या विरुद्ध साक्ष देतात. त्यांपैकी एक साक्षीदार तर, स्पष्टपणे सांगतो की, डॉ. परचुऱ्यांच्या घरी जायला आलेली त्याची 'सवारी' मुंबईकडून आलेल्या बंबई एक्सप्रेसने आलेली होती आणि अभियोगपक्षाच्या म्हणण्याप्रमाणे त्या दिवशी

नथूराम व आपटे दिल्लीहून ग्वाल्हेरला आले होते ! त्या टांगेवाल्या साक्षीदाराची ही विरुद्ध साक्ष चुकीची होती, याची सारवासारव करायला पोलिसांनी मधुकर गोळवलकर या साक्षीदाराचा पुरावा कोर्टात आणला तो तिकिटे विकणाऱ्या बुकिंग क्लार्कच्या मुखाने, स्टेशनमास्तराच्या कामाची साक्ष देऊन ! त्या रात्री बंबई एक्सप्रेस म्हणजे अमृतसर एक्सप्रेस व मद्रास एक्सप्रेस म्हणजे ग्रॅण्ड ट्रंक एक्सप्रेस दोन्ही जवळजवळ एकाच वेळी आल्या असे मानले तरी, त्या दिवसांत ग्वाल्हेरच्या स्टेशनाला एकच प्लॅटफॉर्म असल्याने टांगेवाल्यांना गाडी कोणीकडून आलेली आहे हे सहज दिसत असे. मग गरीब टांगेवाल्याचे सांगणे खोटे कसे म्हणायचे ? वगैरे सांगून मी लगेच कबुलीजबाबाच्या पुराव्याकडे वळलो व त्याची पार्श्वभूमी म्हणून त्यावेळी ग्वाल्हेर येथे हिंदुसभेचा कसा जोर होता, ग्वाल्हेर महाराजांकडून लोकतांत्रिक शासन मिळविण्याची मागणी करण्यात डॉक्टर परचुरे कसे आघाडीवर होते व २४ जानेवारी १९४८ ला ग्वाल्हेरच्या महाराजांनी लोकांचे मंत्री म्हणून केवळ कॉंग्रेसवाले पुढारीच कसे मिनिस्टर बनविले नि त्याविरुद्ध हिंदुसभेने कसे जोरदार निदर्शन केले होते याचे वर्णन पोलिसांच्या साक्षीदारांनी सांगितलेल्या पुराव्याचे संदर्भ देऊनच सांगितले नि अशा परचुऱ्यांना आणि ग्वाल्हेरच्या साऱ्या हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांना महात्मा गांधींचा खून ३० जानेवारीला झाल्यावर २ फेब्रुवारीला पकडले आणि डॉ. परचुऱ्यांना तर ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर एका कोठडीत बंदी म्हणून ठेवले ! त्यांचा अपराध एवढाच की, ते लोकतांत्रिक राज्यात जनतेच्या प्रतिनिधीच्या नात्याने सत्तेचा वाटा मागत होते. म्हणून नव्याने सत्ताधीश झालेल्या कॉंगेस मंत्रिमंडळाने स्वतः औरंगजेब बनून सत्तेच्या गादीवर अधिकार सांगणाऱ्या डॉक्टर परचुऱ्यांना जणू ग्वाल्हेर किल्ल्यावरच्या कोठडीतला मुराद बनवून छळ करायलाच तेथे ठेवले होते ! या कॉंग्रेसी सत्ताधीशांनी डॉ. परचुऱ्यांचा छळ कसा केला ? त्यांची मारझोड करून ? छे, छे ! अहिंसावादी कॉंग्रेस मंत्रिमंडळाने तसे कसे करावे ? त्यांनी अहिंसक मार्गाने डॉ. परचुऱ्यांना जानेवारीच्या भयंकर थंडीत ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर एकांतवासाच्या कैदेत ठेवले. तेथे ते आजारी झाले. संधिवाताने त्यांचे सांधे धरले. त्यांचे इंटरॉगेशन– प्रश्नपरीक्षण मुंबईच्या पोलिसांनी केले ते किल्ल्यावरच्या इस्पितळाच्या डिस्पेन्सरी रूममध्ये असे खुद्द पुण्याचे डेप्युटी सुपरिंटेंडेन्ट पोलीस श्री. देऊळकरच सांगतात ! तिकडे डॉक्टर परचुऱ्यांचे ५० वर्षे वयाचे मोठे भाऊ कृष्णराव परचुरे, ग्वाल्हेर महाराजांचे इन्व्हेस्टमेंट आणि बॅंकिंग सेक्रेटरी, ग्वाल्हेर महाराजांच्या अठरा कोटी रुपयांच्या निधीचा हिशोब व्यवहार सांभाळणारे, त्यांना पकडून कैदेत टाकले. डॉ. परचुऱ्यांचा कॉलेजात पहिल्या-दुसऱ्या वर्गात शिकणारा मुलगा नीलकंठ, त्यालाही पकडले नि कैदेत ठेवले. त्या दोघा परचुरे भावांच्या बायकांना पोलिसांच्या ठाण्यात बोलावून त्यांचा छळ करायलाच प्रश्न विचारण्याचे नाटक सुरू केले नि डॉक्टर परचुऱ्यांचे लायसेन्स असलेले पिस्तुल ताब्यात घेतले. कशासाठी तर नथूराम गोडसेने ज्या 'बरेटा' नावाच्या परदेशी– इटालियन बनावटीच्या पिस्तुलाने महात्मा गांधींचा खून केला त्या पिस्तुलासारखे हुबेहूब दिसणारे डॉ. परचुऱ्यांचे लायसेन्स्ड पिस्तुलही होते– इटालियन बरेटा पिस्तुलच होते. फक्त नंबराचा फरक ! पिस्तुलाच्या पंचनाम्यात नंबराचा फरक करून दाखवायला पोलिसांना किती उशीर लागणार होता ? पण असा फरक करण्याची वेळच आली नाही. ग्वाल्हेरच्या थंडीतल्या एकांतवासाने आजारी पडलेले डॉक्टर परचुरे, वडीलभाऊ आणि वडीलमुलगा यांच्या कैदी होण्याच्या घटनेने घाबरलेले डॉक्टर परचुरे, त्यांची बायको नि भावजयदेखील पोलिसांसमोर चौकशीला उभ्या आहेत या कल्पनेने हिंमत हरलेले डॉक्टर परचुरे यांनी मुकाटयाने खोटया कबुलीजबाबावर– हे कबूल करायला की, 'नथूरामने मला सांगितले होते की महात्मा गांधींचा खून करायला निघाला आहे नि त्याला पिस्तुल हवे होते, ते मी मिळवून दिले !' असा खोटा जबाब लिहिलेल्या कबुलीजबाबावर मुकाटयाने सह्या केल्या. डॉ. परचुऱ्यांनी कबुलीजबाबावर सह्या केल्या त्या, तो खरा होता म्हणून नाही, तर अशा सह्या करण्याने कॉंग्रेसी शासन, त्यांच्या भावाचा त्यांच्या मुलाचा छळ करण्याचे थांबवतील, त्यांच्या घरच्या बायकांचा छळ करण्याचे थांबवतील, त्यांच्या सहकाऱ्यांचा छळ करण्याचे थांबवतील, म्हणून ! त्या एकांतवासाच्या विनाचौकशी कैदेत डॉक्टर परचुरे आणखी काय काय करू शकले असते ? अशी पार्श्वभूमी सांगत मी पोलिसांच्या पुराव्यावरून संदर्भ सांगायला सुरुवात केली. वडीलभाऊ, वडीलमुलगा यांच्या कैदेबद्दल संदर्भ सांगितले. बायकांच्या इंटरागेशनबद्दल संदर्भ दाखवला, ग्वाल्हेरच्या थंडीबद्दल संदर्भ दाखवला, डॉक्टर परचुऱ्यांच्या आजारी असण्याबद्दल संदर्भ दाखवला. खुद्द पोलीस वरिष्ठ अधिकारीच सांगत होता की, डॉक्टरांचे प्रश्नपरीक्षण त्यांनी ग्वाल्हेरच्या किल्ल्यावरच्या डिस्पेन्सरी रूममध्ये केले. मग पोलिसांनी अभियोगपक्षाने हे सारे खोटे आहे हे दाखवायला ग्वाल्हेरच्या किल्ल्याचे कमांडर मेजर छत्रे यांना का साक्षीत आणले नाही ? खुद्द कबुलीजबाबावर सह्या करून घेणारे मॅजिस्ट्रेट सांगतात की, डॉ. परचुरे यांना मेजर छत्रे यांनी त्यांच्यापुढे आणले. पोलीस अधिकारी सांगतात की, डॉक्टर परचुरे मिलिटरी कस्टडीत होते. मग डॉक्टर परचुरे यांनी कोणत्या परिस्थितीत मॅजिस्ट्रेटसमोर कबुलीजबाब दिला याचे वर्णन मॅजिस्ट्रेट साहजिकच सांगत नाहीत. ते सांगणे त्यांच्याचविरुद्ध होईल ना ! याचे जबाबदारीने अधिकारी वर्णन सैनिक अधिकारी मेजर छत्रेच करू शकले असते. डिस्पेन्सरीरूममध्ये ज्यांचे प्रश्नपरीक्षण करावे लागले त्या डॉक्टर परचुऱ्यांची प्रकृती किती धडधाकट होती हे सांगायला त्या डिस्पेन्सरी-रूमच्या अधिकारी डॉक्टरांना पोलिसांनी का साक्षीत बोलावले नाही ? जर ते दोघे साक्षीत आले नाहीत, तर मग याबद्दल आपल्याला कोण सांगणार ? एकटे डॉक्टर परचुरेच ना ? मग डॉक्टर परचुरे स्वतः याबद्दल काय म्हणतात ते पाहू या ? असे म्हणून मी डॉक्टर परचुऱ्यांनी लाल किल्ल्यामध्ये कोर्टासमोर जे लेखी निवेदन दिले ते वाचून दाखवायला, छापील पुस्तकाचे पान फायलीमधून काढू लागलो...

**डॉ. परचुऱ्यांनी कबुली जबाबावर सह्या केल्या त्या तो खरा होता म्हणून नाही, तर....**

हा सारा वेळ तिघेही न्यायमूर्तिगण माझ्याकडे आश्चर्याने स्तिमित झाल्यासारखे बघत होते. मधून मधून संदर्भाबद्दल प्रश्न विचारत होते. मी दाखवलेला संदर्भ तपासून पाहत होते. मी पाहत होतो की, मी संदर्भ सांगतो म्हणून म्हणायचा अवकाश की, न्यायमूर्ती अछरूरामजीच आधी संदर्भ काढून त्या पानावरची कितवी ओळ कुठे आहे ते आपल्याबरोबरच्या न्यायमूर्तींना दाखवत होते. मी डॉक्टर परचुऱ्यांच्या लेखी निवेदनाचा संदर्भ देताच जस्टिस अछरूरामजींनी माझ्यावर मेहेरबानीच केली. ते म्हणाले, ' अहो मिस्टर इनामदार ! मीच वाचून दाखवतो. हे पाहा पुस्तक दुसरे, पान २२०, ओळ २२ बघा. सगळा परिच्छेद वाचण्यासारखा आहे ! असे म्हणून त्यांनी इतर दोघा न्यायमूर्तींनी आपआपल्या समोरचे पुस्तक दुसरे उचलून सांगितलेले पान उघडल्याचे पाहिल्यावर तो परिच्छेद मोठ्याने वाचायला सुरवात केली. ते म्हणाले, ' हे पाहा अगोदर पान २२, ओळ ४५ चा नि पुढला मजकूर. मिस्टर देउळकरांनी मला विश्वास देऊन सांगितले की, मिस्टर अटलांनी तुमचे शब्द ' मी माझी भूमिका स्पष्ट करतो आहे ' हे लिहिले आहे नि ते निघून गेले. आणि मी आजारी तेथे बिछान्यावर तळमळत पडलो होतो. माझ्यावर अशा विलक्षण रीतीने कोसळून मला वेढून टाकत असलेल्या माझ्या दुर्भाग्याचा विचार करत होतो. मला सांत्वन देणारा एकच विचार मला धीर देत होता. मला वाटत होते की, असे करून मी माझ्या जिवलग माणसांचा पुढला सगळा त्रास अशा रीतीने टाळीन. माननीय जस्टिस अछरूरामजींनी त्यानंतर तो सगळा परिच्छेद स्वतःच मोठ्याने कोर्टात वाचून दाखविला !

मी हा सारा वेळ बाकी दोघांकडे मुख्य न्यायमूर्ती जस्टिस भंडारी यांच्याकडे व जस्टिस खोसला यांच्याकडे–आळीपाळीने निरखून बघत होतो. जस्टिस अछरूरामजी पॅरिग्राफ वाचत होते, जस्टिस खोसला जस्टिस भंडारींना काही कानात सांगितल्यासारखे बोलत होते. जस्टिस अछरूरामजींचे ते वाचणे संपताच मी पाहिले, तिघेही न्यायमूर्ती आपसांत कुजबुज करीत एकमेकांशी बोलायला लागले. त्यांची कुजबुज मला ऐकू येत होती. जस्टिस खोसला म्हणत होते, ' आम्ही तर हा अस्वीकार करू '–मुख्य न्यायमूर्ती म्हणत होते, ' आम्ही तर ठरवले आहे, हे सारे कवडी किंमतीचे आहे '–जस्टिस अछरूरामजी म्हणत होते, याचा निर्णय मी तर आताच याक्षणी लिहायला तयार आहे. ' मुख्य न्यायाधीश पुन्हा म्हणत होते, ' आम्ही ठरवले आहे हे सारे कवडी किमतीचे आहे '–जस्टिस अछरूरामजी म्हणत होते, ' याचा निर्णय मी तर आताच याक्षणी लिहायला तयार आहे. मुख्य न्यायाधीश पुन्हा म्हणत होते, ' पण आपण मिस्टर दफ्तरींचे काय म्हणणे आहे हे प्रथम ऐकू या–! '

मी उभाच होतो. त्या तिघांकडे बघत त्यांचे बोलणे ऐकत होतो, पण त्याचा अर्थ काय होईल हे ठरविण्याचे धैर्य मला करवत नव्हते. मी अधीर होऊन माझे मॅजिस्ट्रेट अटलांच्या कथनाबाबतचे सारे मुद्दे सांगण्यासाठी अधीर झालो होतो नि हे माननीय न्यायमूर्ती मला बोलू का देत नाहीत ? ' महाराज ! कृपा करा मला सांगू द्या. मला सारे निवेदन करू द्या. कृपा करा...मला पुष्कळ सांगायचे आहे अजून...! ' मी काकुळतीने माझा अधीरपणा बोलून दाखवत होतो. त्यांच्या कुजबुजीचा सगळा अर्थ समजण्याच्या मनःस्थितीत मी नव्हतो ! दोन मिनिटे होऊन गेली--तीन–चार–कोण जाणे किती वेळ हे चालले ? असेल तीन-चार मिनिटेच, पण माझा किती वेळ फुकट जात आहे अशा अधीरपणामुळे मला काही समजत नव्हते ! या अधीर स्थितीत असतानाच मला मुख्य न्यायमूर्ती जस्टिस भंडारी यांचे शब्द ऐकू आले. ते म्हणत होते मला, ' मिस्टर इनामदार, तुम्ही डॉक्टर परचुऱ्यांच्या प्रकरणाबद्दल तर्कनिवेदन करण्याची आवश्यकता नाही. हां, तुम्हाला काही आणखी फारच महत्त्वाचे सांगायचे असल्यास...पण आमचे समाधान एव्हाच झाले आहे. श्री. दफ्तरी काय म्हणतात याबद्दल, ते आम्हांला ऐकू द्या. त्यांचे म्हणणे ऐकल्यावर हवे तर तुम्हांला काय आणखी सांगायचे असेल तर ते अवश्य सांगा. आता तुम्हाला इतर काही दुसरे सांगायचे असेल तर ते सांगा...! '

हे असे कोर्टात त्यावेळी चाललेले सगळे पाहत–ऐकत असणाऱ्या जाणकार श्रोते मंडळींना हे सारे बघून याचा अर्थ काय तो अवश्य समजला असेल. पण मी मुखस्तंभ होऊन न्यायमूर्तींसमोर उभा होतो. कोणत्या विचाराने कोण जाणे पण माझ्या डोळयांत पाणी आले. माझे डोळे भरून मला समोरचे नीट दिसेना. इतर काही न सुचून मी मुख्य न्यायमूर्तींच्या चेहऱ्याकडे बघण्याचा प्रयत्न करीत होतो. माझ्या भरल्या डोळयांना त्यांचा एखाद्या साधूसारखा चेहरा उजळलेल्या मुखमंडलासारखा–चित्रातल्या देवमूर्तींच्या तेजोवलयांकित मुखमंडलासारखाच दिसला. माझी वाचा बंद झाली. माझे मन विचारहीन झाले. मी निश्चल उभा राहून मी ऐकले ते खरेच का असे मनाला विचारीत होतो. असा किती वेळ उभा होतो कोण जाणे ! माझ्या पाठीवर दोन्ही बाजूने हाताचा हळूवार स्पर्श झाला. डांगे नि श्री. अवस्थी मला म्हणत होते, ' अहो इनामदार–इनामदारजी ! तुम्हांला पुढे बोलायची जरूर नाही आता–तुम्ही आपल्या भाषणांचा समारोप करा बरे, आटपा ! ' समोरचे न्यायमूर्तिगणही म्हणत होते, ' काय, मिस्टर इनामदार ! ' हळूवार हातांचा स्पर्श, हळूवार आवाजाची अनुभूती ! दोन्हीमुळेच मी सावरलो. माझे विचारचक्र चालू झाले. माझ्या भाषणाचे सूत्र घेऊन माझ्या सगळ्या तर्कनिवेदनाचा समारोप म्हणून वकिली भाषेमध्ये ' गोपाळ गोडसे नि डॉक्टर परचुरे यांची अपिले स्वीकार होण्याच्या योग्यतेची आहेत. त्या दोघांविषयीचे प्रारंभिक कोर्टाचे निर्णय चुकीचे असून ते रद्दबातल ठरविण्याच्या लायकीचे आहत. माझे दोन्ही पक्षकार निर्दोषी आहेत असे ठरवून हे उच्चन्यायालय त्यांना मुक्त करण्याची आज्ञा देईल अशी मी आशा बाळगतो ' असे म्हणून खाली बसायच्यापूर्वी मी आधीच योजून ठेवलेली वाक्ये बोलत मी म्हणालो, ' मी माझ्या जागेवर खाली बसायच्या अगोदर मला, ग्वाल्हेर संस्थानच्या वकिलाला, या उच्च न्यायपीठासमोर येऊन अपिलांचे काम चालविण्याची अनुमती देण्याची जी कृपा या अखंड न्यायपीठावर बसलेल्या व इतरही न बसलेल्या सगळ्या न्यायमूर्तींनी केली त्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञभावाने आभार मानायचे आहेत ते मानतो आणि निवेदन करतो की, अपणा सर्व न्यायमूर्तींच्या या सौजन्यपूर्ण कृपेची मला कृतज्ञ आठवण जन्मभर राहील ! ' असे म्हणून तिघाही माननीय न्यायमूर्तींना यथोचित क्रमाने अभिवादन केले नि आपल्या आसनावर बसलो.

माझे सहयोगी श्री. अवस्थींनी घड्याळाकडे बघितले आणि

विश्रांतिमध्यंतरला अजून बराच अवकाश आहे हे बघून ते उभे राहिले आणि त्यांनी त्यांचे अशील शंकर किस्तय्या याच्या वतीने आपले तर्कनिवेदन सांगायला सुरुवात केली. धीम्या स्वराने नि सुयोजित क्रमाने त्यांनी शंकर किस्तय्याबाबतच्या एक एक घटना घेऊन त्याबद्दलचे आपले विवेचन चालू ठेवले. मी ते ऐकत होतो नि इकडेतिकडे बघतही होतो. अवस्थी तयारीने बोलत होते. त्यांनी शंकर किस्तय्याचे चित्र परिणामकारकरीतीने कणवभरल्या शब्दांनी न्यायपीठासमोर रंगवले–सांगितले. शंकर किस्तय्यासारखा अशिक्षित, तरुण, अननुभवी मनुष्य, बडगेंचा खाजगी नोकर, काही इतर भाषा-हुन्नर येत नसलेला, बडग्याची सायकलरिक्षा पुण्याच्या गल्लीबोळामधून रेटीत बडग्याच्या कृपेवर आपल्या पोटाची खळगी दोन वेळ भरीत असणारा असा हा अभियुक्त आहे. याला भोवती काय चालले आहे हे समजण्याची अक्कल नाही, माहीत करून घेण्याची मुभा नाही. याने महात्मा गांधी अभियोगपर्वात हा अपराध आहे असे समजून केलेली कोणतीही गोष्ट केल्याचा पुरावा नाही. शंकरविरुद्ध एकटचा माफीच्या साक्षीदाराचा सायकलरिक्षा चालवणाऱ्या नोकराच्या पाताळयंत्री मालकाचा, अविश्वसनीय पुरावा सर्वपटीने अपुष्ट–असमर्थित असा आहे. या पुराव्यावर विसंबून कोणतेही न्यायालय या अभियुक्ताला दोषी कसे ठरवू शकेल हेच मला समजत नाही. प्रारंभिक न्यायालयाने ज्या आधारांवर या शंकरला जन्मठेपेची शिक्षा दिली आहे ते आधार किती चुकीचे, किती तथ्यहीन आहेत हे मी आपणाला निवेदन करतो, असे म्हणत अवस्थींनी छापील पुस्तकाचे संदर्भ एक एक करून सांगायला सुरुवात केली तोच विश्रांतिमध्यंतराची वेळ झाली नि कोर्ट उठले !

मीसुद्धा नथूरामकडे बघत उठलो. नथूरामच्या तोंडावर हसू पसरले होते नि तो म्हणत होता, 'छान...फाऽऽरऽऽऽऽच छान !' श्री दफ्तरींनी मला हाक मारली नि म्हटले, 'ए इनामदार ! तू एक फारच चांगली दांडी उडविलीस हं ! तुझे अभिनंदन !' खेळाडू, सर्वांगाने खेळाडू, दिलदार खेळाडू ! दफ्तरींचे व्यक्तिदर्शन आणखी कसे वर्णायचे ! दफ्तरींबद्दलच्या माझ्या साऱ्या आठवणी मला वकिली व्यवसायात भेटलेल्या सगळ्या वकिलांमधून सर्वांत जास्त स्नेहमय, आपुलकीच्याच आहेत. बॅनर्जी मला म्हणत होते, 'तुझे हे यश मला बववत नाही. मला तुझा हेवा वाटतो !' मला भेटत असलेला प्रत्येकजण माझे अभिनंदन करीत होता ! पण माझे आत्मशंकी मन मला बजावीत होते की, 'सबूर,...सबूर, उगीच शेफारून जाऊ नकोस ! अजून तुला दफ्तरींशी मुकाबला करायचा आहे !'

मी सेसिल हॉटेलमध्ये संध्याकाळी परत आलो ते स्वस्थ चित्त, आनंदी मनानेच. अवस्थी माझ्याबरोबरच येत होते. डांगेही होते. ते म्हणत होते मला, 'का त्या दिवशी मी तुम्हाला साईबाबाच वाटलो नाही ? मी उगीच नाही तसे बोललो. मला साईबाबानेच सांगितले होते तसे बोलायला ! जा, घरी,जा नि देवाच्या पाया पडा !' असे म्हणून डांग्यांनी गळ्यातल्या लॉकेटला हात लावून नमस्कार केला. माझ्या जिवलगांची आठवण येत होती. त्यावेळी ती मजजवळ असावयास हवी होती ! त्यांची उणीव मला तीव्रतेने भासत होती अवस्थी–सहानुभूती बाळगणारे अवस्थी ! त्यांनी करायचे तेच केले. ते मला आपल्या घरी जेवायला घेऊन गेले नि तेथे त्यांच्या घरगुती वातावरणात मी संध्याकाळचा वेळ घालविला व रात्रीचे जेवून खोली नंबर ६९ मध्ये रात्री दहा वाजता परत आलो. दार बंद करून, मी गुडघे टेकून करुणामय, दयामय परमेश्वरापुढे नतमस्तक होऊन, मला माझ्या जिवलगांच्या प्रीतीला पात्र कर अशी करुणा भाकली !

[ क्रमशः ]

---

पुस्तके

## नादलुब्ध रसिकाच्या रसिल्या आठवणी

# स्मृति–विहार

रविकिरण साने

आधुनिक मराठी वाङ्मयात आत्मचरित्र हा साहित्यप्रकार चांगलाच लोकप्रिय होऊ लागला आहे आणि बहुधा अशी आत्मचरित्रे विशिष्ट क्षत्रामध्ये आपले कर्तृत्व सिद्ध केलेल्या थोरामोठ्यांची असल्याने त्यांच्या खरेखोटेपणासंबंधी पुरेशी वादळेही निर्माण होतात. या आत्मकथन करणाऱ्यांपैकी अनेकांना आपल्यावरच्या आजवरच्या आरोपांची उत्तरे द्यायची असतात. कधी पूर्वी झालेल्या महान चुकांचे समर्थन करावयाचे असते, तर कधी अशा चुका नियतीवर टाकून मोकळे व्हायचे असते. आत्मकथनामुळे मिळणारा मोकळेपणा व स्वातंत्र्य यांचा लाभ घेऊन अनेक खऱ्या-खोटचा गोष्टी कलात्मकरीत्या वाचकांच्या गळी उतरवून आपली बाजू भक्कम करावयाची असते. एखादे खळबळजनक आत्मचरित्र आणखी तीन-चार आत्मचरित्रांना जन्म देते व वाचकांची भरपूर करमणूक करते. पण अशा साहित्यिक राजकीय साठमारीत क्वचित एखादवेळेस एखादे निराळेच आत्मकथन हाती येते. प्रसिद्धीच्या प्रकाशझोतापासून दूर असणारा, पण प्रकाशात वावरणाऱ्या साऱ्या थोरामोठ्यांचे जीवन जवळून पाहणारा एखादा चमचक्षू नेहमीच जागा असतो. तो जर पुरेसा रसिक असेल तर, अशा प्रथितयशांचे एक वेगळेच जीवन आपल्या अनुभवाला येते. मग कधी एखादा दिवाण सामोरा येतो आणि संस्थानिकांच्या लीला कथन करतो. एखादा ए. डी. सी. येतो आणि राष्ट्राध्यक्षांच्या राष्ट्रपतिभवनातून आपल्याला फिरवून आणतो आणि तोच जर एखादा नादलुब्ध रसिक असेल तर, संगीताच्या, क्रिकेटच्या सहवासात आपल्याला नेतो.

डॉ. गंगाधर कृष्ण गोवंडे हे खरे तर, एक शेतीतज्ज्ञ. 'प्लँट फिजिऑलॉजी'

हा त्यांच्या खास संशोधनाचा विषय, पण उन्हातान्हातून शेतात भटकणाऱ्या या शेती-संशोधकाला संगीताकरता वाट्टेल तेवढी जागरणे करण्याची हौसही तेवढीच दांडगी. त्यामुळे त्यांच्या या आत्मकथनात व्यावसायिक आठवणी तशा थोड्याच, पण या व्यवसायाच्या निमित्तानेच संगीतासाठी प्रसिद्ध असणाऱ्या भारतातील प्रमुख शहरात ह्यांचे वास्तव्य झाले. डॉ गोवंडचांची पहिली काही वर्षे आफ्रिकेत गेली सिंहांच्या परिसरातील बालपणच्या आठवणी ते अतिशय चटकदारपणे सांगतात. या आठवणीतून या शतकारंभी आफ्रिकेतील काळे, भारतीय अधिकारी, इंग्रज, जर्मन आदी पाश्चात्य यांचे एकमेकांशी असणारे संबंध यांचे एक वेगळेच दर्शन आपणाला होते. भारतात परतल्यावर शेती शिक्षणासाठी पुण्यातले वास्तव्य. नंतर बनारस हिंदू विद्यापीठातील शेती संशोधन. इंदूर व बडोदा येथे संशोधन खात्यात नोकरी. त्यानंतर सक्तीची निवृत्ती आणि मग नोकरीसाठी महाराष्ट्रात आगमन आणि सध्याचे निवृत्त जीवन. असे व्यावसायिक टप्पे त्यांनी पार केले. हे आत्मकथन अशा कालक्रमानुसारच येते.

साठ-सत्तर वर्षांच्या दीर्घ कालखंडात अनेकविध प्रकारची माणसे त्यांना भेटली. या साऱ्यांची शब्दचित्रे गोवंडे आपल्यापुढे सहजतेने उभे करतात. ते स्वतः उत्तम व्हायोलिन वाजवतात. क्रिकेटवर विलक्षण प्रेम करतात. चांगले खेळतात आणि शेतीतही आपले कर्तृत्व दाखवतात. त्यामुळे त्यांचा अनुभव विविध अगांनी फुलत जातो. संगीतक्षेत्रातील बुजुर्गांच्या त्यांनी पेश केलेल्या आठवणी तर एकापेक्षा एक सरस आहेत. बडोद्यातील वास्तव्यात गोवंडचांना फैय्याजखांच्या सहवासाचा लाभ मिळाला. खाँसाहेबांकडे वारंवार होणाऱ्या बैठकींना ते हजर असत. अशा छोटया छोटया प्रसंगांतून खाँसाहेबांचे सुरेख व्यक्तिचित्र त्यांनी उभे केले आहे. त्यातली एक आठवण प्रांगण्यासारखी आहे. बडोद्यात वे. शा. सं. छोटूशास्त्री ध्रुव नावाचे प्रकांड पंडित तेव्हा वास्तव्य करून होते. खाँसाहेबांचा आणि शास्त्रीबुवांचा अकृत्रिम स्नेह. शास्त्रीबुवाही संगीतातले जाणकार. त्यामुळे कधी खाँसाहेबांकडे, तर कधी शास्त्रीबुवांच्या ज्ञानमठात गाण्याच्या बैठकी रंगायच्या. एकदा शास्त्रीबुवांकडे तेलंगणातले अकरा विद्वान ब्राह्मण आले होते. या ब्रह्मवृंदाला खाँसाहेबांचे गाणे ऐकण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे खाँसाहेबांनी आपल्याच बिन्हाडी खास बैठक जमवली आणि एरवी सहसा ऐकायला न मिळणारी सकाळच्या रागांची अपूर्व मेजवानी त्यांनी दिली. या मैफलीने प्रसन्नचित्त झालेले ते ब्राह्मण खाँसाहेबांना उदंड आशीर्वाद देत बोलले, 'खाँसाहेब, आपण तर सामवेदांचा सांभाळ करीत आहात. म्हणजे आपण आमच्यापैकीच आहात. ईश्वर आपणास उदंड आयुष्य देवो.'

आपल्या प्रगल्भ प्रतिभेने आणि चिंतनशील व्यक्तिमत्त्वाने रसिकांना मोहवून टाकणाऱ्या कुमार गंधर्वांची आठवणही अशीच. त्यावेळी कुमार नुकतेच प्रसिद्धी पावले होते. एका दौऱ्याहून परतताना इंदुरात त्यांचा मुक्काम होता. ठाकूरदासबुवांकडे दहा-बारा वर्षांचा हा मुलगा आपल्या सोबत्यांबरोबर खेळताना इतरांसारखाच दिसे. त्याचा कसलाही वेगळेपणा दिसत नसे. पण कुमारांचे गाणे ठरले की, मात्र त्या दिवशीचा अनुभव ठाकूरदासबुवांच्या शब्दांतच सांगण्यासारखा आहे. ते म्हणतात, 'सकाळी अकरावाजेतो कुमार इतर मुलांबरोबरच खेळत होते; पण नंतर ते मुलांतून अलग पडून घरात एकटेच बसून राहिले. वागण्यातला बालिशपणा गेला आणि इतरांशी बोलणे बंद होऊन चेहऱ्यावर पोक्तपणा दिसू लागला. तासातासाने त्यांचे वय जणू वाढत होते, असे त्यांच्या चेहऱ्यावरचे गांभीर्य पाहून वाटले.' अर्थात अशा तन्मयतेने सादर झालेले गाणे किती रंगले असेल हे वेगळे सांगायला नकोच.

संगीताच्या क्षेत्रातील अनेक नामांकित कलावंतांची शब्दचित्रे–व्यक्तिचित्रे डॉ. गोवंडे यांनी चांगली रंगवली आहेत. प्रसिद्ध तबलानवाझ मुनीरखाँ, उस्ताद फैय्याजखाँ, इलालचीबुवा, हैदरखाँ, बालगंधर्व, गोविंदराव टेंबे, लक्ष्मीबाई जाधव, गणपत पिराजी पंडित, बिस्मिल्लाखाँ, दिलीपचंद्र बेदी; हिराबाई बडोदेकर या थोर कलावंतांच्या आठवणी हृद्य आहेत. त्याबरोबरच त्यांच्या स्वतःच्या व्हायोलिन वादनांच्या काही मजेदार आठवणी यात आहेत. बडोदे कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवात मराठी माणसांचे काहीतरी सादर झालेच पाहिजे, या जिद्दीने डॉ.गोवंडेंचे व्हायोलिन पेश केले गेले. वेळ फक्त तीन मिनिटे, पण डॉक्टरांची तयारी (फक्त दोन गाण्यांची) दांडगी. त्यांनी दणकून भरपूर वाजवले. पण सयाजीराव महाराज इतके खूष झाले की, त्यांनी आग्रहाखातर आणखी एक गाणे वाजवून घेतले. पुण्याच्या मुक्कामात एकदा असेच अचानक त्यांना व्हायोलिन पेश करावे लागले. सरोजनी नायडू, हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय व कमलादेवी यांचे काव्यगायन फर्ग्युसनमध्ये होते. पण या तिघांनी, मुलांनी आधी काहीतरी सादर करावे, असा आग्रह धरला. तेव्हा गोवंडेंनी ती सभा आपल्या वाद्यवादनाने जिंकली.

संगीताच्या या व्यासंगामुळे आणि अनेक खानदानी गायकांची गाणी मनसोक्त ऐकल्यामुळे संगीतविषयक आठवणींना या आत्मकथनात प्राधान्य मिळाले आहे. पण या आठवणींच्या जोडीला शिक्षणक्षेत्रातील, शेतीव्यवसायातील आणि समाजातील इतर थोर व्यक्तींच्या अनेक आठवणी गोवंडेंनी सांगितल्या आहेत. वसंतराव कप्तान, सयाजीराव महाराज, रियासतकार सरदेसाई, बनारस विद्यापीठातले शेतीशास्त्रज्ञ इनामदार, भूगर्भशास्त्रज्ञ रोडे, कुलगुरू मालवीय, डॉ. छत्रे, वीर सावरकर, बडोद्याचे प्रतापसिंह गायकवाड, सुप्रसिद्ध गणिततज्ज्ञ डी. डी. कोसांबी, सर सी. व्ही. रामन्, शिल्पकार र. कृ. फडके, संगीत-दिग्दर्शक एस्. पुरुषोत्तम, शेतीतज्ज्ञ हजितसन अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींची व्यक्तिचित्रे यात आहेत.

पंडित मालवीयांची एक आठवण त्यांच्या न्यायबुद्धीवर आणि चरित्रावर चांगला प्रकाश टाकते म्हणून ती उद्धृत करण्याचा मोह आवरत नाही. त्यावेळी बनारस विद्यापीठात काव्यभूषण आप्पासाहेब खापर्डे मराठीचे प्राध्यापक म्हणून आले होते. सिनेटपुढे त्यांना कायम करायचे का नाही असा प्रश्न होता. बहुतेकजण त्यांच्याविरुद्ध होते. नेहमीप्रमाणे मराठी माणसेसुद्धा त्यांच्याविरुद्ध होती. पंडितजींच्या मनाचा निर्णय होत नव्हता. खापर्डेबद्दल अनेक कंड्याही पिकवण्यात आल्या होत्या. मग पंडितजींनी एक वेगळाच कौल लावला. एक बांधकाम पाहण्याच्या मिषाने ते गोवंडचांचे संशोधन चालू

होते तिकडे आले. गोवंड्यांचे संगीत-साहित्यावरचे प्रेम पंडितजींना माहीत होते. पंडितजींनी सरळ गोवंड्यांनाच गाठले आणि गोवंड्यांची चौकशी करत करत त्यांच्या सुविद्यपणाची, निस्पृहतेची पारख करून अखेर खापर्ड्यांसंबंधी सहज प्रश्न विचारले. खापर्डेंना पूर्वीपासून चांगले ओळखत असल्यामुळे त्यांची संपूर्ण माहिती-जी पंडितजींना नवी होती. गोवंडेंनी सांगितली. ते विद्यार्थ्यांत किती प्रिय आहेत हे सांगून त्यांच्या शिकवण्याबद्दल खात्री दिली. एका वेगळ्या विद्याशाखेतील पण दुसऱ्यांच्या गुणाची पारख असलेल्या विद्यार्थ्याला लावलेला हा कौल अपूर्वच म्हणावा लागेल. या संभाषणाने पंडितजींची खापर्डेंच्या कर्तृत्वाबद्दल खात्री पटली आणि सर्वांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी खापर्डेंना कायम केले. आपल्या प्राध्यापकांची अशी परस्पर परीक्षा करून त्यांचे गुणदोष जाणून घेणारा असा कुलगुरू विरळाच.

अशा अनेक आठवणी नामवंत व्यक्तींच्या चरित्रातील एकेक वेगळाच पैलू आपल्यासमोर आणणाऱ्या, हृदय हेलावणाऱ्या. वस्तुतः आत्मचरित्र म्हणजे स्वतःची टिमकी वाजवण्याचे मोठे साधन. पण गोवंड्यांच्या या आत्मकथनात इतर साऱ्यांचे वर्णनच अधिक. त्यांच्या सहवासात मी कशाकरता आलो एवढ्यापुरताच त्यात मीचा संबंध. म्हणूनच त्यांच्या व्हायोलिनच्या आठवणी येतात त्या त्यांच्या कौतुकाखातर नव्हे तर सयाजीरावांचा मोठेपणा सांगण्यासाठी. पुणेकर टुकार कार्यक्रम उधळून लावतात. पण त्याच गदारोळानंतर येणारा चांगला कार्यक्रम विलक्षण तन्मयतेने ऐकतात, हा नीरक्षीर विवेक दाखवण्यासाठी त्यामुळेच स्वतःच्या संशोधनासंबंधी ते काही सांगत नाहीत. आपल्यावर झालेल्या अन्यायावर तुटून पडत नाहीत. मनुष्यस्वभाव दाखवण्यापुरता या सर्वांचा उल्लेख करतात. सारी हयात संगीतामागे धावण्यात आणि शेतावर राबण्यात गेल्यामुळे आपल्या लेखणीसंबंधी ते साशंक आहेत. एके ठिकाणी त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे एकावेळी अंतर्देशीय पत्राएवढा मजकूर लिहिण्याची सवय आणि हा गुण संपूर्ण आत्मचरित्रात दिसून येतो. त्यांचे प्रसंगवर्णन, व्यक्तिचित्रण खरोखरच अंतर्देशीय पत्रात मावेल एवढेच ते करतात. अशा छोट्या मोठ्या प्रसंगांतून हे आत्मकथन आकारत जाते. पण निरहंकारी स्वभाव, प्रांजलपणा स्वतःच्या गुणदोषांची यथायोग्य जाणीव, आत्मसमर्थनाचा तिटकारा, व्यक्ती आणि घटनांचे वस्तुनिष्ठ निरीक्षण या त्यांच्या गुणामुळे अकृत्रिम मोकळेपण या कथनाला आला आहे आणि त्यामुळेच ते रसाळ उतरले आहे. ◻

**स्मृतिविहार**
**डॉ. गंगाधर कृष्ण गोवंडे**
**प्रकाशिका– सौ. वैदेही गोवंडे, बडोदे.**
**मूल्य २० रु.**

---

# आमचे ग्रंथालय

जे. एन्. पोंडा

---

## Yesterday and Today

हे पुस्तक म्हणजे श्री. के. पी. एस. मेनन यांनी ऑल इंडिया रेडिओवरून दिलेली भाषणे व इतर अनेक नियतकालिकांमधील लेखांचा संग्रह होय.

बोटांवर मोजण्याइतके भारतीय जे उत्कृष्ट इंग्रजी लिहितात किंवा लिहीत होते, त्यांतले श्री. मेनन हे एक. चांगले इंग्रजी लिहिणारे भारतीय लेखक, दिवंगत किंवा हयात, म्हणजे आर. के. नारायण, जवाहरलाल नेहरू, राजेंद्रप्रसाद, कृष्ण मेनन, राधा कृष्णन्, मुल्कराज आनंद व इतर. श्री. के. पी. एस. मेनन ह्यांची बरीच पुस्तके मी माझ्या वाचनालयात संग्रहित केली ती जास्त करून त्यांच्या सुंदर इंग्रजीमुळेच.

मेनन यांची हातोटी फक्त राजकीय लेखच लिहिण्यात नसून या पुस्तकात निकोलस रॉरीक् (पेंटर), सॉमरसेट् मॉम, म्युरिअल लेस्टर (गांधीजींची लंडनमधील यजमान. तो इनर स्पेसमध्ये गेलेली म्हणजे अंतर्मुख झालेली), व आऊट स्पेसमध्ये गेलेली व्हॅलेंटिना टेरेश्कोव या व अशा व्यक्तींविषयी लेखांचा समावेश आहे.

म्युरिअल लेस्टर ही जेव्हा म. गांधी यांच्या पुतळ्यासाठी वर्गणी गोळा करीत होती त्या वेळेला एका श्रीमंत मंत्र्याने फक्त १० शिलिंग्जचीच देणगी दिली होती. इतर गरिबांनी मात्र सढळ हाताने देणग्या दिल्या होत्या. यावर मेनन यांनी म्युरिअलला एक चुटका सांगितला. ते म्हणाले, 'एका इजिप्शियन व्यापाऱ्याला लंडनमधून हाकलले गेले. त्यावर त्याने १०,०१० पौंडांचा दावा लावला. १०,००० पौंड धंद्याचे नुकसानभरपाईसाठी व १० पौंड इंग्रजी बायको गमावल्याबद्दल!' अशा प्रकारचे अॅन्टिब्रिटिश व अॅन्टिअमेरिकन चुटके मेनन यांचेपाशी बरेच असावेत.

एकंदरीत हे पुस्तक म्हणजे एक रिडेबल कॉकटेल आहे. मेनन म्हणतात की, 'सॉमरसेट मॉम हा निराशावादी व जीवनाची घाणेरडी बाजू पाहणारा होता.' परंतु तेच पुढे म्हणतात की, 'मॉमचा तोतरेपणा व ठेंगणा देह या दोन न्यूनगंडाने तो आयुष्यभर पछाडलेला होता.' याची जोड मॉमच्या दुःखी-कष्टी बालपणाला दिली तर मॉम निराशावादी झाला नसता तरच नवल! मॉमला निराशावादी किंवा जीवनाची घाणेरडी बाजू पाहणारा असे म्हणण्यापेक्षा cynic म्हणणेच जास्त योग्य झाले असते.

या पुस्तकातील अबू अब्राहम यांचे चित्ररेखाटन निश्चितच खटकते. श्रीमती इंदिरा गांधी एक दृढनिश्चयी व्यक्ती आहेत. पण पुस्तकातील स्केचमध्ये त्यांची हनुवटी व ओठापर्यंतचा भाग बघून ही व्यक्ती एवढी ठाम भूमिका घेऊ शकेल असे वाटत नाही. नेहरूंचे चित्र रेखाटून बघून ही व्यक्ती म्हणजे ठाम भूमिका घेणारी व तडकाफडकी निर्णय घेणारी असा समज होतो. पण नेहरूंचा अस्थिरपणा व संवेदनशीलता सर्वश्रुत आहेच. कृष्णमेनन यांच्या रेखाटनात त्यांचा नेहमीचा आक्रमक स्वभाव कुठेच आठळून येत नाही.

आणखी एके ठिकाणी मेनन म्हणतात की, पपई खाल्ल्याने रक्तातला कोलेस्टेरोल कमी होतो. परंतु वैद्यकीय शास्त्रात अशी माहिती कुठेच आढळत नाही.

प्रकाशकाने हे पुस्तक फारच सुरेख छापले आहे. जॅकेटवर निळ्या गडद रंगामध्ये हरवलेला Yesterday व आज उगवत असलेला Today ही कल्पना फार सुरेख आहे. मला पान नं. ३४ वर एकच मुद्रणदोष आढळला.

तेथे 'Philosopher'चे 'Pholosopher' असे छापले गेले आहे. ◻

**Yesterday and Today**
By K. P. S. Menon
Allied Publishers
Pages 223, Rs. 30–00.

## The Physicians
### A Novel of Malpractice

मी १६ वर्षांपूर्वी वाचनालय सुरू केले, त्यावेळी पेरी मॅसन वगैरे पॉकेटबुक्सची किंमत २५ सेंट म्हणजे तेव्हाचा १। रु. एवढी होती. या परीक्षणाखाली असलेले पुस्तक पेपरबॅकचे आहे. त्याची किंमत रु. १८·३५! मराठी पुस्तकांच्या किंमती याहीपेक्षा Prohibitive !

समाजात जास्त पुस्तके वाचणारे म्हणजे मध्यमवर्गीय. फार श्रीमंत लोक पुस्तके विकत घेऊ शकतात. पण ते पैशाच्या मागे इतके पळत असतात की, त्यांना वाचावयास फुरसतच नसते. ड्रॉइंगरूम किंवा सीटिंग हॉलमध्ये मॅचिंग पुस्तके शोकेसमध्ये ठेवली ती त्यांच्या उच्च अभिरुचीची ग्वाही झाली!

हेन्री डेन्कर म्हणजे टू इन् वन्. आर्थर हॅले आणि स्टॅनले गार्डनर ! त्याचे 'फिजिशियन' नावाचे पुस्तक म्हणजे डॉक्टरी पेशातला एक कोर्टरूम ड्रामा. ह्या अमेरिकन लेखकांनी कादंबरीसाठी एखादा विषय घेतला की, त्याचा ते किती खोल अभ्यास करतात ते या पुस्तकात जाणवते. ते एखाद्या करन्ट ट्रॉपिकची पार्श्वभूमी घेतात म्हणून पुस्तकाचा खपही अफाट होतो. पुस्तकाच्या पार्श्वभूमीची माहिती विश्वसनीय असते, त्यामुळे वाचकांचे मनोरंजन होते व ज्ञानात भर पडते.

रेनॉल्डस् नावाचा एक अति श्रीमंत म्हातारा व्यापारी असतो. त्याचा ४० वर्षांपर्यंत कोणी पुरुष वारस नसतो. ज्यावेळेला त्याच्या मुलीला मुलगा होतो त्यावेळेस त्या मुलास कावीळ झालेली असते. त्या अर्भकाला रेनॉल्डस्नी देणग्या दिलेल्या हॉस्पिटलात आणतात. तेथील डॉक्टर क्रीस् ग्रॅन्ट् त्याला बहुतांशी फोटोथिरपीने व थोडेसे ॲन्टिबायोटिक्सने ट्रीट करतो. फोटोथिरपी म्हणजे फक्त निळा फ्ल्यूरोसेंट लाईटचा (पेशंटचे डोळे झाकून) प्रकाश सोडणे. अमेरिकन वैद्यकीय शास्त्रज्ञाने काविळीवर शोधलेला हा एक नवीन उपाय. भारतामध्ये अजून बहुधा तो आला नसेल.

काविळीवर दुसरा उपाय म्हणजे रक्त बदलणे. पण त्याची डॉ. ग्रॅन्टला आवश्यकता वाटत नाही. अर्भकातील रक्ताचा bilirubin लाईट्स्मुळे खाली येतो व कावीळ सुधारते. चार महिन्यांनंतर त्या मुलामध्ये कॉम्प्लिकेशन्स निर्माण होतात व वैफल्यामुळे रेनॉल्डस् डॉ. ग्रॅन्टवर हलगर्जीपणाबद्दल ५० लक्ष डॉलरचा दावा लावतो. डॉ. ग्रॅन्टने रक्तच बदलावयास पाहिजे होते व निळ्या लाईटस्मुळे ऑक्सिजनअभावी मेंदूवर झालेला परिणाम व शरीराचा बदललेला निळा रंग डॉ. ग्रॅन्टला दिसला नाही, असा युक्तिवाद रेनॉल्डस्चा वकील करतो.

मूल जन्माला आल्यापासून पहिल्या २४ तासांत त्याला कावीळ झाली तर, ती फारच धोकादायक असते. आईचे रक्त जर RH (Negative) गटातले असेल तर, पहिल्या गरोदरपणात मूल निर्धास्त असते. त्यानंतर मात्र ती (मूल जर RH Positive असेल तर) Sensitize होते व तिला एका विशिष्ट प्रकारचे इंजेक्शन देण्याची गरज असते. अशी अनेक प्रकारची माहिती या पुस्तकात ठायी ठायी आढळते.

सध्या हलगर्जीपणाच्या दाव्याचे टूम स्टेट्स्मध्ये फार चालले आहे, त्यामुळे डॉक्टर्समध्ये दहशत निर्माण झालेली आहे. आणि या दाव्यातील नुकसानभरपाईचे आकडे लक्षांत किंवा कोटीत असतात. भारतात अशा प्रकारचे दावे क्वचितच ऐकावयास मिळतात. पेशंटचा मृत्यू किंवा नुकसान कशामुळे झाले ते लोकांना तर माहीत नसतेच, पण बऱ्याच वेळा डॉक्टर्सनाही ते माहीत नसते ! अशा प्रकारचे दावे लावता येतात अशी कल्पनाही लोकांना नसते.

या लेखकाची इतर दोन पुस्तकेही (Director आणि दुसरे Place for the Mighty) फारच वाचनीय आहेत. ◻

(**The Physicians–A Novel of malpractice**–by Henry Denker. Rs. 18.35. Pocket Books, p. 342)


### Some New Titles

1. Shahu Chhatrapati – (Biography) – Dhananjay Keer Rs. 80/–
2. T. E. Lawrence : In Arabia and After – (A Novel of the Motion Picture 'Lawrence of Arabia') – B. H. Liddle Hart Rs. 18·75
3. Yesterday and Today – (Articles) – K. P. S. Menon Rs. 30/–
4. The Physicians – (A Novel of Malpractice) – Henry Denker Rs. 18·35
5. The Innocents Abroad – (Travel) – Mark Twain Rs. 9·70
6. The R Document – (Bestseller – Novel) Irving Wallace Rs. 12·50
7. Gehlen Spy of The Century – (Bestseller) Rs. 8·45
8. Tales of Power – (Bestseller – Initiation into Sorcery of an Anthropologist) – Carlos Costaneda Rs. 14·25
9. Honour Thy Hather – (Bestseller – about Mafia) Non fiction Rs. 10·70
10. The Observer's Book of Cricket – Peter Smith – Rs. 18·00

**फिनिक्स लायब्ररी, सदाशिव पेठ, पुणे.**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १०।७।७६ ते १६।७।७६

**मेष : उद्योग करा**

उद्योगाच्या दृष्टीने आठवडा महत्त्वाचा ठरावा असे ग्रहमान आहे. आठवड्याच्या मध्यास रवी चौथा होत आहे. तो उद्योगात प्रगती घडवून आणू शकेल. अपेक्षित योजना धंद्यात राबवून त्याचे फलित दृष्टिपथात आणू शकाल. आर्थिक बाजू तशी भक्कमच राहील. कर्ज मिळविणे किंवा जुनी ठेव, बचत परत मिळविणे असल्या कामात लक्ष द्या. शेतीच्या कामाकडे फार श्रम न करता लक्ष देता येईल. नोकरीत वरदान नसले तरी प्रतिकूल परिस्थिती नाही. वरिष्ठांबरोबरचे संबंध अनुकूल राहतील. शुभ दिनांक ११, १३, १४.

**महिलांना :** नोकरीत बरीच अनुकूलता राहील. कामाचा ताण कमी होईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात लक्ष घालावेच लागेल. स्मरणशक्ती तीव्र होईल.

**वृषभ : अडचणींवर मात**

आठवड्याच्या मध्यास रवी तिसरा होत आहे. हा बदल सार्वजनिक व व्यावसायिक क्षेत्रात डोकेदुखीच्या होऊन बसलेल्या प्रश्नांची व्यवस्थित उकल करील. या संबंधीचे तुमचे प्रयत्न यशाच्या दृष्टिपथात येतील. मनाची चंचलता यावेळी तरी तुमच्या साफल्याच्या आड येणार नाही. आर्थिक बाजू खरे म्हणजे काळजी करण्यासारखी राहणार नाही. अनेक ठिकाणी गुंतलेल्या पैशांची वसुली होईल. गैरसमज दूर होतील. नोकरीत कोणतेच प्रश्न उरणार नाहीत व नवे निर्माण होणार नाहीत. निवृत्तीची भीती बाळगू नका. शुभ दिनांक १०–१२.

**महिलांना :** कलागुणांच्या प्रदर्शनामुळे आनंद व पैसा मिळेल. नोकरीच्या प्रयत्नाला यश मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जागेची अडचण दूर होईल. एखादा छंद लागेल.

**मिथुन : समंजसपणाने वागा**

राशीतून रवी बदलला आहे तरी दुसऱ्या स्थानी असलेला मंगळ तिसरा झाला आहे. हे ग्रहमान काहीसे आशादायक आहे. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडवण्यात मोठे यश मिळेल. डोक्यात ठाण मांडून बसलेल्या अडचणींचा डोंगर वितळायला सुरुवात होईल. गैरसमज अथवा चुकीच्या मार्गाने वागून तुम्ही जे स्वतःभोवती कुंपण तयार केले होते ते हळूहळू दूर होईल. खरे मित्र कोण व खरे हितचिंतक कोण याची प्रचीती येईल. दुरावलेले लोक पुन्हा जवळ आणण्यात यश मिळवाल. स्वभावात समंजसपणाचा प्रादुर्भाव होईल. आर्थिक बाजू सुधारू लागेल. तरी पण काळजी घ्या. शुभ दिनांक ११–१३.

**महिलांना :** गैरसमज वाढवू नका. मन स्वच्छ व निर्मळ ठेवा. त्यामुळे खरा आनंद व समाधान मिळू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** वाङ्मयात रस घ्या. कलावंत वर्गाचा सहवास लाभेल.

**कर्क : आर्थिक सुधारणा**

राशीत रवी आला आहे तर तेथेच शनी आहे. मंगळ दुसरा आहे. सर्वसामान्य ही ग्रहरचना अनुकूल आहे. ही परिस्थिती उद्योग व नोकरी या दोन्ही दृष्टींने अनुकूलच आहे. एकदम पैसा मिळू शकेल. रेस व लॉटरी याला अनुकूलता आहे. व्यापारात मनासारखा नफा मिळवू शकाल. चालू धंदा सुधारेल. योजनांची अंमलबजावणी करू शकाल. अडचणी दूर होतील. नोकरीत बदल हवा असेल तर अनुकूलता आहे. पण बदल करायला हवा असे नव्हे. चालू नोकरीत अनुकूलता राहील. सर्वांबरोबर सहकार्य व मैत्री यामुळे लोकप्रियता राहील. प्रमोशनची शक्यता आहे. शुभ दिनांक १३, १४, १५.

**महिलांना :** नोकरीत खूप अनुकूलता राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. पगारवाढीची मागणी करू शकाल.

**विद्यार्थ्यांना :** मनाची अस्थिरता सोडली पाहिजे. शिक्षणाबरोबर नोकरी अगर धंद्याचा उपक्रम करू शकाल.

**सिंह : सन्मान होईल**

साडेसातीत सर्वच काही प्रतिकूल घडते असे समजू नका. या आठवड्यात तुमचे पाऊल प्रगतीच्या वाटेवर पडणार आहे. मंगळ पहिला आहे ही एकच गोष्ट तुमच्या सामर्थ्याचा प्रत्यय आणून द्यायला पुरेशी आहे. गुरू–मंगळाचा त्रिकोण तुमच्या भोवती अनुकूलतेचे वारे वाहत ठेवणार आहे. या आठवड्यात तुमच्या कर्तृत्वाचा व बुद्धिकौशल्याचा अनपेक्षित सन्मान होऊन जाईल. सार्वजनिक कामात एखादे महत्त्वाचे पद तुमच्या गळ्यात पडेल. नोकरीची परिस्थिती सुधारेल. नोकरीतील अनिश्चितता संपून स्थैर्य मिळेल. आर्थिक बाजू भक्कम नसली तरी खूपच सुधारणा आहे. शुभ दिनांक ११, १३, १४.

**महिलांना :** प्रामुख्याने आर्थिक बाजू सुधारेल. अनेक क्षेत्रांत तुमचे कर्तृत्व झळकून राहील.

**विद्यार्थ्यांना :** परदेशी प्रवासाची इच्छा पूर्ण होण्याची लक्षणे दिसू लागतील. प्रेम व सहानुभूती मिळेल.

**कन्या : प्रतिष्ठा उंचावेल**

मंगळाने व्ययस्थानी प्रस्थान ठेवले असले तरी त्याची मुळीच पर्वा करू नका. कारण गुरू त्याच्यावर सर्वत्र नजर ठेवून आहे. त्यामुळे हा आठवडा तुम्हाला काही तरी नवे व चांगले देणारा ठरणार आहे. नोकरीत कामाचा ताण वाढला तरी पर्वा करू नका. कारण तेवढी कार्यक्षमताही अंगात निर्माण होईल. आर्थिक बाजू एकदम सुधारली नाही


सद्यःस्थितीत सर्वांनी वाचलेच पाहिजे असे साप्ताहिक

**साधना**

**संस्थापक : साने गुरुजी**

**वार्षिक वर्गणी : रु. २५**

स्थानिक वृत्तपत्र विक्रेत्यांना वितरणार्थ मागवण्यास सांगा.

**साधना साप्ताहिक**

३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

तरी उत्पन्नात निश्चित वाढ होईल. आनंद-दायक क्षण येतील. चारचौघात तुमचे कौतुक होईल. धंद्याच्या दृष्टीने मात्र थोडी काळजी घ्या. नोकरांवर काही सोपवू नका. मुलांच्या कौतुकाने मन आनंदी होईल. तब्येत सुधारेल. शुभ दिनांक १२, १३.

**महिलांना :** घाबरटपणा सोडा व स्थिर मनाने कोणतेही काम करा. घरात आनंदी वातावरण राहील

**विद्यार्थ्यांना :** तुम्ही भाग्यवान ठरणार आहात. पैसा, कीर्ती असे काही तरी अनपेक्षित तुमच्या वाट्याला येईल.

## तूळ : आर्थिक बाजू भक्कम

अकराव्या मंगळाचे वरदान तुम्हाला लाभले आहे तर भाग्यस्थानी रवी आहे. ग्रहस्थिती सुधारण्याला पोषक व वातावरणाला अनुकूल आहे. यावेळी अनेक बाजूने तुमचे यश दृष्टिपथात येईल. वेळेच्या कामाचे चीज होऊन चार पैसे हाती येतील. लॉटरी-सारख्या मार्गाने हाती पैसे येईल. व्यापार-धंदा मंदीच्या खाईतून बाहेर पडून नवी तेजी निर्माण करील. कापड व्यापारी खूष होतील. प्रकाशनाच्या धंद्याला उत्तेजन मिळू शकेल. नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीमुळे अनेक नव्या नव्या योजना राबवू शकाल. नोकरीत जे कायम नसतील ते कायम होतील. शुभ दिनांक १४–१५

**महिलांना :** दागिन्यांची हौस पुरी होईल. अनेक दिवस आवडीने उराशी बाळगलेली वस्तू सहज पदरात पडेल.

**विद्यार्थ्यांना :** नाटयक्षेत्रात चमकण्याची संधी मिळेल.

## वृश्चिक : नोकरीत बढती

एकटा मंगळ दशमस्थानी ही एकच गोष्ट तुमच्या नशिबाची परीक्षा सुवर्णमय होण्यास पुरेशी आहे. तो तुमच्या राशीचा मालक आहे. त्यामुळे तुमची समृद्धी व स्थैर्य हेच त्याचे ध्येय आहे. आता तुम्ही अजिबात घाबरू नका. शेतीच्या क्षेत्रात अभूतपूर्वक यश पदरात पडणार आहे. नोकरीत बढती मिळेल. ही बढती तुमच्या आयुष्यभरची महत्त्वाकांक्षा पुरी करणारी असेल. वरिष्ठ क्षेत्रात तुमचा नावाचा दबदबा निर्माण होईल. मोठ्या विश्वासाने सारे गुपित तुमच्याकडे उघडे करतील. मात्र तुम्ही विश्वास देणे आवश्यक आहे. वैवाहिक सौख्यात थोडी फार उणीव निर्माण होण्याची शक्यता आहे. लॉटरीत व रेसमध्ये यश. शुभ दिनांक १२–१४

**महिलांना :** वारसाहक्काने स्थावर-इस्टेट मिळण्याची शक्यता आहे. घर व जागा ही महत्त्वाकांक्षा पुरी होईल.

**विद्यार्थ्यांना :** प्रवासात नशिबवान ठराल. हौस पुरी होईल. परदेशी प्रवासाचे देखील जमू शकेल.

## धनू : संकट टळले आहे

एखाद्या अदृश्य संकटाने गेले काही दिवस तुमचे मन अस्वस्थ करून सोडले होते. परमेश्वरकृपेने तुमचे संकट टळले आहे, हे सांगायला फार आनंद वाटतो. हा आठवडा तुमच्या वैचारिक जीवनात नवी क्रांतिकारक पावले निर्माण करील. बुद्धीचा प्रगल्भ आविष्कार प्रामुख्याने व्यावसायिक क्षेत्रात दिसून येईल. ज्यांनी गैरसमज पसरवले होते ते निःष्प्रभ ठरतील. तुम्ही कर्तबगार म्हणून पुन्हा तेजाने चमकणार आहात. आर्थिक स्थिती खालावली होती ती पुन्हा सुधारू लागेल. तब्येतीची काळजी दूर होऊन आजार तुम्हाला भिऊन दूर पळेल. धंद्याची स्थिती प्रगतीचा नवा टप्पा गाठील. पत्र-व्यवहार यशस्वीरीतीने करू शकाल. शुभ दिनांक १३–१५.

**महिलांना :** तुम्ही काळजी करावी असे काही आता प्रतिकूल राहिलेले नाही. नोकरीत बाजू सावरून तुम्ही अक्षरशः शिरजोर बनाल.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात मोठे यश पदरात पडणार आहे. शैक्षणिक अडचणी कमी होतील.

## मकर : फक्त तब्येत सांभाळा

मंगळाने आठव्या स्थानी ठाण मांडले आहे. ते तसे प्रतिकूल नसले तरी, तब्येतीची कुरकूर निर्माण करणार आहे. नैराश्य व उदासीनता मनात वास करीत राहील. कुल-देवतेची उपासना करा, म्हणजे येणारी निराशा दूर होऊन मार्ग दिसेल. यावेळी तुम्ही प्रवासात अडकले जाण्याची शक्यता आहे. इच्छा नसताना हा प्रवास करावा लागेल. मात्र एकूण सार्वजनिक कामगिरी मोलाची होईल. नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीचा प्रसाद वाट्याला येईल. स्थानांतर होण्याची शक्यता आहे. कामातही बदल अपेक्षित आहे. बेकारांनी जिद्द सोडू नये. आश्वासनापेक्षा यावेळी निश्चित असे काही तरी त्यांच्या पदरात पडू शकेल. चालू नोकरीत बदलीची शक्यता आहे. शुभ दिनांक १४–१५.

**महिलांना :** कामाचा ताण सहन करण्याचे दिवस आता संपत असल्याची प्रचिती येईल. हाती चार पैसे खेळतील.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मोठे यश मिळवाल. कौतुकाचा विषय ठराल.

## कुंभ : डावपेच यशस्वी होतील

तुम्ही सध्या निराशेच्या आहारी जात असलात तरी, ते चुकीचे आहे, हे तुम्हाला आता कळून येईल. हा आठवडा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारा आहे. डावपेच लढवणे हा तुमचा स्थायी स्वभावच आहे. नोकरी असो की सार्वजनिक कार्य असो, त्यात तुमचा विशेष डावपेच असतोच. या आठवड्यात यश तुमची सावली बनणार आहे. राजकारणात तुमचे मत प्रभावी ठरणार आहे. नोकरीत बरेच काही मिळून जाणार आहे. बढती, प्रमोशन, पगारवाढ असे काहीही पदरात पडेल. व्यापारी क्षेत्रात तोट्याची परिस्थिती दूर होऊन थोडी परि-स्थिती सुधारेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. शुभ दिनांक १४–१५.

**महिलांना :** सार्वजनिक कामात विरोधाची पर्वा करू नका. नोकरीत चांगले दिवस येतील.

**विद्यार्थ्यांना :** भांडणाची वृत्ती सोडणे आवश्यक आहे. समंजसपणाने सारे काही साधू शकाल.

## मीन : नोकरीत बढती

रवी, बुध, शनी, मंगळ सारेच ग्रह उत्तम आहेत. तुमच्या प्रगतीचे कंकण त्यांनी बांधले आहे. त्यामुळे यावेळी तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम केलेत तरी यश पदरात पडणार आहे. नोकरीतील तुमच्याबाबतीत आजवर होणारा अन्याय संपणार आहे. इतकेच नव्हे तर बढती, प्रमोशन मिळण्याची परिस्थिती निर्माण होणार आहे. उत्पन्नात भर पडेल. दुय्यम धंद्यात सुधारणा होऊन आर्थिक व कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. लॉटरीच्या मार्गाने पैसा मिळू शकेल. तब्येत सुधारणार आहे. शुभ दिनांक ११–१४.

**महिलांना :** लेखिकांना सुखकारक असा हा काळ आहे. नोकरी-उद्योगात प्रगतिकारक घटना घडू शकतील.

**विद्यार्थ्यांना :** तांत्रिक शाखेच्या विद्यार्थ्यांना हा आठवडा चांगला आहे. यश मिळाल्याचा आनंद मिळेल. □

# नंदू राजेलिखित (दादा कोंडके) लेखमाला वसंत सबनीस यांचा खुलासा (२)

लेखांक : ६

'सोंगाड्या' चित्रपटाच्या यशाचं सर्व श्रेय बाबांना–भालजी पेंढारकरांना आहे असं दादांनी म्हटल्याचे श्री. नंदू राजे लिहितात. (लेखांक ६) आपण ज्या अर्थाने यशाचे सर्व श्रेय परमेश्वराला आहे असं म्हणतो त्या अर्थाने हे विधान तंतोतंत खरे आहे. बाबांनी सोंगाड्याच्या निर्मितीत खूपच रस घेतला होता हे खरे असले तरी, प्रत्यक्ष निर्मितीच्या कामात त्यांनी काहीही भाग घेतला नव्हता. इतकेच नव्हे तर, कथेचा सांगाडा त्यांचा असूनही कथालेखक म्हणून स्वतःचे नाव घालण्यासही त्यांनी विरोध केला होता. त्यांचा आशीर्वाद मात्र निश्चित होता. ते वेळोवेळी विचारपूसही करीत होते.

चित्रपटाचे यश सांघिक असते. त्याच्या निर्मितीत भाग घेणाऱ्या तंत्रज्ञ कलाकारांचे मिळून असते. एकाचे असत नाही. दुसऱ्यांच्या श्रेयाचा योग्य तो वाटा त्यांना देणे हे सभ्य व सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. दादांनी वरीलप्रमाणे बेछूट विधान केले तरी, नंदू राजेंनी त्यावर प्रश्न विचारला नाही आणि हेच नंदू राजे सातव्या लेखांकात स्वतःच्या लेखणीने लिहितात; 'सिनेमासारख्या मूलतः टीम ॲक्टिव्हिटीमध्ये श्रेयाची मोजन मापटी घालणं सुतराम शक्य जसं नाही तसंच तसा प्रयत्न करणं हे हास्यास्पददेखील आहे असं मला ठामपणे वाटतं.' असं ठामपणे वाटत असूनसुद्धा आणि नंतर त्यांना एका नामवंत कवीने श्रेयाबाबत विचारणा करूनसुद्धा नंदू राजे सर्व चित्रपटांच्या कथा, प्रसंग, संवाद व चित्रीकरण यांची श्रेयाची मापटी दादांच्या झोळीत टाकायला मागेपुढे पाहत नाहीत! हा हास्यास्पदपणा कुठल्या कोटीत बसतो?

असेच आणखी एक हास्यास्पद विधान या लेखात केले आहे. ते दादांच्या मुखी आहे. ते म्हणतात की, दिग्दर्शक बाबांनीच मिळवून दिला. म्हणाले, 'हा गोविंद कुलकर्णी. याला फार काही कळतं अशातला भाग नाही. पण तंत्र उत्तम जाणतो.' एक तर बाबांनी दिलेल्या दिग्दर्शकाची ओळख बाबा अशी करून देणार नाहीत. त्यांनी अशी ओळख करून दिलीच असेल, तर त्याचा अर्थ एवढाच की, ते बापासारखे दादांच्या मागे उभे असल्यामुळे आपल्या पोराची कुवत ओळखून, फार काही कळत नसले तरी, पोरापेक्षा जास्त कळणारा दिग्दर्शक त्यांनी बघून दिला असला पाहिजे. गोविंदराव कुलकर्ण्यांना फार काही कळत नाही असे जर बाबांचे मत होते आणि तसे असतानाही त्यांनी जर त्यांची निवड केली असेल तर, त्याचा अर्थ बाबांनी दादांना न कळणारा दिग्दर्शक देऊन फसवलं असा होतो. किंवा बाबांनाच दिग्दर्शनातले काही कळत नव्हते; म्हणून त्यांनी हा न कळणारा मनुष्य निवडला, असाही अर्थ होऊ शकतो. पण दादांनी आपले कलुषित मत बाबांच्या तोंडी घातले आहे हेच खरे आहे. कारण श्री. गोविंद कुलकर्णी यांनी 'सोंगाड्या'च्या आधी ४।५ चित्रपटांचे दिग्दर्शन केलेच होते. इतकेच नव्हे तर, 'सोंगाड्या' आणि 'एकटा जीव' नंतर भालजींनी आपल्या चित्रपटाचे दिग्दर्शनही त्यांच्याकडे सोपविले होते. तेव्हा भालजींना श्री. कुलकर्णी यांच्या कुवतीची पूर्ण जाण होती हे उघड आहे. मग ही चिखलफेक का? त्यालाही इतिहास आहे.

'विच्छा'प्रमाणेच 'सोंगाड्या'चेही यश अपेक्षित नव्हते. झालेला खर्च परत मिळवून देण्याची हमी श्री. गोविंदराव कुलकर्णी यांनी दिली होती. पण 'सोंगाड्या'ला अभावितपणे यश मिळाले. दादांना अफाट पैसा मिळाला. तेव्हापासून त्यांच्या स्वतःबद्दलच्या कल्पना बदलू लागल्या. त्यांची भाषा बदलली. हे दूरच्या माणसांना कळणे शक्य नव्हते. जवळच्या माणसांना हा फरक जाणवू लागला होता. तरीही विशेष काही खटकले नव्हते. 'एकटा जीव सदाशिव' चित्रीकरण पुरे झाले. पुण्याला चित्रपट प्रदर्शित करण्याचे ठरले. त्याच वेळी व त्याच तारखेला पुण्यात 'प्रभात'ला पिंजरा लागायचा होता. साहजिक शांतारामबापूंचे चित्र असल्यामुळे आम्हाला धास्ती वाटत होती. प्रसिद्धी जोरात करणे आवश्यक होते. आठ दिवस आधी श्री. गोविंदराव कुलकर्णी पुण्यास गेले होते. त्यांना 'एकटा जीव'ची प्रसिद्धी कमी वाटली आणि केवळ प्रसिद्धी कमी पडली म्हणून चित्रपटाला अपयश येऊ नये या भावनेने ते प्रसिद्धी कमी असल्याबद्दल स्पष्टपणे पण जरा कठोर शब्दांत दादांना बोलले. ह्या बोलण्यामुळे आपला अपमान झाला, माझ्यासारख्या यशस्वी निर्मात्याला एक दिग्दर्शक तडकून बोलतो म्हणजे काय, अशी दादांनी समजूत करून घेतली आणि गोविंदराव कुलकर्ण्यांनी आपल्यासाठी काय काय केले हे एका क्षणात विसरून दादा त्यांच्याबद्दल वाट्टेल ते बोलू लागले. मग त्यांचे गुण दुर्गुण झाले, त्यांचे घरोब्याचे संबंध तुटले, लगेच त्यांना दिग्दर्शनातले काही कळेनासे झाले आणि 'सदिच्छा' हे नाव सुचविणाऱ्या कुलकर्ण्यांची दादांच्या यशातून आणि परिवारातून हकालपट्टी झाली, हा इतिहास आहे. त्यावेळी दादांच्या परिवारात असलेल्या कुणालाही विचारावा. दादांचे सहकारी त्यांना सोडून गेले नाहीत, तर दादांनीच त्यांना दूर केले. ज्याने दादांच्या पूर्वायुष्यात त्यांना एक वर्षभर आपल्या घरी सांभाळले अशा जिवलग मित्रालाही त्यांनी शून्य मिनिटात दूर केले. मग इतरांची काय कथा? तेव्हा जुने सहकारी आपल्याला सोडून गेल्याचा दादांनी केलेला कांगावा खोटा आहे.

'सोंगाड्या' चित्रपटाच्या पटकथेच्या संदर्भातही दादांनी माझ्या नावे वाट्टेल ते खपविण्याचा प्रयत्न केला आहे. मी म्हणे त्यांना असला बोलपट काढणं म्हणजे हमखास अपयश असे सांगितले, तसेच तुम्ही पटकथा लिहा– मी कॉमेडी लिहितो असेही ते मला म्हणाले म्हणे आणि मी काकू करीत 'सोंगाड्या'ची पटकथा लिहिली म्हणे! ही सर्व विधाने खोटी आहेत. यासाठी 'सोंगाड्या'च्या पटकथेची कहाणी सांगणे आवश्यक आहे.

दादांनी भालजी पेंढारकरांच्या सल्ल्याप्रमाणे चित्रपट काढण्याचे ठरविले तेव्हा मी

मुळीच विरोध केला नव्हता. पण प्रथमपासून हेच सांगितले की, चित्रपटकथेचं माध्यम मी कधीही हाताळलेलं नाही. त्या धंद्याचीही मला माहिती नाही. पटकथा लिहिण्याचे जर मला जमले नाही तर त्यापायी तुम्हाला पहिल्याच चित्रपटात अपयश द्यायला नको म्हणून पटकथेचं तंत्र जाणणाऱ्या लेखकाकडून पहिली पटकथा लिहून घ्या आणि धंद्यातल्या जाणकारांकडून धंद्याची माहिती घ्या. ' विच्छा 'चा धंदा मी पाहिला तसा हा मला जमेल असे समजू नका. हे मी अत्यंत स्पष्टपणे दादांना सांगितले होते व ते त्यांना पटले होते. म्हणून तर प्रथम श्री. ना. ग. करमरकर आणि नंतर श्री. शंकर खंडू पाटील यांच्याकडे पटकथा-संवाद-लेखनाचे काम त्यांनी सोपविले. पण दादांना ते पटले नाही. शेवटी श्री. भालजी पेंढारकरांनी मला पटकथा–संवाद लिहिण्याचा आग्रह केला. ' दादांची तुमच्या लेखणीवर श्रद्धा आहे तेव्हा तुम्हीच हे काम अंगावर घ्यावे अशी माझी इच्छा आहे. ' असे बाबांनी मला सांगितले. बाबांना मी माझे विचार सांगितले. मी का लिहीत नाही तेही सांगितले. त्यावर बाबांनी ' तुम्हाला जसं वाटेल तसं लिहा– ते सिनेमातंत्रात कसं बसवायचं ते मी पाहीन, ' असे सांगितल्यावर मी ' सोंगाड्या 'ची पटकथा व संवाद लिहिले. लिहायला लागल्यावर त्यांत रस निर्माण झाला आणि उत्साहाच्या भरात मी दोन चित्रपट तयार होतील एवढी पटकथा लिहिली. ही सर्व हकीकत मी १९७१ साली दै. मराठामध्ये लिहिलेल्या ' माझी पहिली पटकथा ' या लेखात नमूद केलेली आहे. विनोदी प्रसंग, संवाद हे सगळे आधीच मी योजले होते. दादांशी, श्री. प्रभाकर पेंढारकर यांच्याशी चर्चा करून त्यांत आणखी भर घातली गेली. प्रसंग निर्माण करण्याची जबाबदारी तशी दादांच्यावर नव्हती. त्यांनी मुलाखतीत आव मात्र असा आणला की, जणू काय सर्व विनोदी प्रसंग निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच होती !

भली मोठी झालेली पटकथा कमी करण्याचे काम बाबांनी श्री. गोविंदराव कुलकर्णी यांच्याकडे सोपविले. त्यांनी माझ्याशी विचारविनिमय करून पटकथेला कात्री लावली. मी लिहिलेली काही दृश्ये बाबांना योग्य वाटली नाहीत म्हणून काही दृश्ये त्यांनी स्वत: लिहिली, पण त्यांनी लिहिलेली दृश्ये अतिगंभीर होती आणि त्यातून विनोदनिर्मिती होत नव्हती. तेव्हा ती दृश्ये न घेण्याचे दादांनी ठरविले, पण तसे बाबांना सांगण्याचे धाडस त्यांच्याजवळ नव्हते. त्यामुळे बाबा जेव्हा जेव्हा सेटवर येत असत तेव्हा तेव्हा त्यांनी लिहिलेल्याच दृश्याचे चित्रीकरण चालू आहे असा भास निर्माण केला जात असे. बाबा फारतर पाचदहा मिनिटे सेटवर थांबायचे आणि जायचे. ते गेले की लगेच मूळ दृश्याचे चित्रीकरण सुरू व्हायचे. हे सांगण्याने दादांना वाईट वाटेल याची मला कल्पना आहे. पण इलाज नाही. कारण ' सोंगाड्या 'चा शॉट न् शॉट बाबांच्या देखरेखीखाली घेण्यात आला असे बेधडक विधान त्यांनी मुलाखतीत केलेले आहे ते किती खोटे आहे, हे दाखविण्यासाठी ही वस्तुस्थिती सांगणे भाग आहे. तोच प्रकार २० दिवस सकाळ-संध्याकाळ बाबांनी घेतलेल्या तालमीचा आहे. ' सोंगाड्या 'चा मुहूर्त २० जुलै १९७० रोजी झाला. मुहूर्ताच्या दोन दिवस आधी आम्ही सर्व संबंधित लोक कोल्हापुरात गेलो दादा फार तर त्याच्याही आधी दोन दिवस गेले असतील. मग २० दिवस तालमी कुठं घेतल्या ? दादांच्या स्वप्नात ? ' विच्छा 'च्या आम्ही तीन महिने कसून तालमी केल्या असं सांगून दादा जो विनोद करतात त्याचीच ही ' सोंगाड्या '– आवृत्ती !

## लेखांक : ७

' सबनिसांचं झालेलं कौतुक ह्यांच्या कर्तबगारीपेक्षा दादाबद्दलच्या अज्ञानातून झालं असं मला ठामपणे वाटतं. ' असं एक वाक्य श्री. राजे यांनी लिहिलं आहे. यात खरेखोटेपणाचा प्रश्न नाही. श्री. राजे कोणतेही ठाम मत मांडू शकतात. त्याबद्दल आक्षेप नाही, पण हे वाक्यच नव्हे तर बरेचसे लेखांक श्री. राजे यांनी माझ्याबद्दलच्याच नव्हे तर दादांबद्दलच्या अज्ञानातून लिहिले आहेत असे माझे अतिशय ठाम मत आहे तेवढे येथे जाता जाता नोंदवून ठेवतो.

' सोंगाड्या ' पासून ते थेट त्याच्या आताच्या पाचव्या चित्रपटापर्यंत त्यातली कॉमेडी, त्याचं चित्रीकरण, त्यात आलेले संवाद ही सगळी दादांच्या अफलातून भेजातून निर्माण झालेली फळं आहेत, असं म्हणण्याचा अघोरी अविचारही श्री. नंदू राजे यांनी केला आहे. निदान ' सोंगाड्या ' व ' एकटा जीव सदाशिव ' या दोन चित्रपटांच्या बाबतीत तरी हे विधान १०० टक्के खोटं आहे. 'सोंगाड्या'-च्या वेळी चित्रीकरणातले दादांना काहीही कळत नव्हते. ' एकटा जीव सदाशिव ' च्या वेळी दादा थोडे मुक्त होते, पण मोकाट नव्हते. पुढच्या चित्रपटांच्या बाबतीत मला काहीच माहीत नाही. कदाचित श्री. नंदू राजे यांचे विधान त्या चित्रपटांच्या बाबतीत खरे असल्यास त्यांचे त्यांना माहीत.

खरी गोष्ट अशी आहे की, दादांच्या अभिनयात निळू फुलेइतकी विविधता, सखोलता आणि आव्हानात्मक भूमिका करण्याची ताकद नाही. त्यांचा अभिनय ठराविक साच्याचा व ढंगाचा असल्यामुळे तो मर्यादित आहे. तरीही दादा हुशार आहेत, त्यांची विनोदाची जाण जबरदस्त आहे, हजरजबाबीपणा वाखाणण्यासारखा आहे, त्यांची वाक्ये फेकण्याची हातोटी कौतुकास्पद आहे, संवादातील टायमिंगचा सेन्स अफलातून आहे, ते रंगमंचावर किंवा कॅमेऱ्यापुढे जातात तेव्हा रंगदेवता त्यांच्यावर प्रसन्न असते, हे सर्व खरे आहे. पण दादांना काहीतरी आधार असल्याशिवाय ते उभे राहू शकत नाहीत. काडीचा तरी आधार लागतोच. त्यांची गाजलेली मुंबईची लावणी ही कै. अण्णाभाऊ साठे व पठ्ठे बापूराव यांच्या मुंबईच्या लावणीचा वास घेत आली आहे. काही जुने शाहीर यावर अधिक प्रकाश टाकू शकतील. त्यांच्या लोकनाट्यातील अभिनयाचा मूळ आधार आहे दादू इंदुरीकरांचे अनुकरण. नंतर त्यांनी त्यात स्वतःची भर घातली ही गोष्ट वेगळी. चित्रपटातील अभिनयाचा आधार आहे मेहमूदची स्टाइल. त्यातही त्यांनी स्वतःची भर घातली. पण त्यांची मुळे सुटली नाहीत. दादांना प्रसंग निर्माण करून दिल्यावर तो धमाल रंगवण्यात त्यांचा हातखंडा आहे. काही प्रसंग तेही निर्माण करू शकतात, हेही खरे आहे. पण प्रसंग निर्माण करताना प्रसंगातील विनोदापेक्षा स्वतःच्या विनोदी जागांना वाव मिळविण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. संवादाच्याबाबतीतसुद्धा विनोदी संवादाची मूळ बैठक असल्याशिवाय दादांना अधिक विनोदी कलाकुसर करता येत नाही. एक संवाद त्यांना

दिल्यावर त्या संवादाची तार पुढे ताणत नेण्यात ते कुशल आहेत. म्हणूनच ज्या ज्या चित्रपटात त्यांना संवादाची भक्कम बैठक मिळाली त्या त्या चित्रपटात त्यांनी घातलेली विनोदाची भर शोभून दिसली, पण जेथे बैठक मिळाली नाही किंवा डळमळीत मिळाली तेथे त्यांची विनोदाची पातळी घसरली आहे. खालच्या दर्जाचे विनोद करण्याचा दादांना मुळातच उत्साह. 'विच्छा–'च्या वेळीसुद्धा काही वेळा सवंग विनोदाबद्दल दादांना दाटावे लागत असे–प्रसंगी त्यांची हजेरी घ्यावी लागत असे. पुढे मी 'विच्छा–'च्या प्रयोगाकडे लक्ष देईनासा झाल्याबरोबर दादांच्या रसवंतीला उधाण आले. प्रयोगाची पातळी घसरल्याची तक्रार अनेक लोकांनी माझ्याकडे केली होती. मीसुद्धा दादांना 'तुमचा प्रयोग आता बघवत नाही इतका सवंग होतो' असे स्पष्टपणे सांगितले होते आणि प्रयोग बघण्याचे मीही सोडून दिले होते.

'आंधळा मारतो डोळा' या कथेचे जनक आहेत दादांचे एक जुने स्नेही (ज्यांना दादा मोठ्या भावाप्रमाणे मानतात) श्री. राजाराम गोलतकर. पटकथेवर नाव फक्त श्री. जगदीश खेबुडकरांचे आहे. संवाद दिनेश यांचे आहेत. हा एक वेगळा किस्सा आहे आणि त्याच्याशी असलेल्या माझ्या संबंधाबद्दल मी नंतर त्या विषयाच्या वेळी लिहिणार आहे. इथे इतकेच पुरे.

आता 'एकटा जीव सदाशिव' या चित्रपटाच्या संबंधात लेखांक ४ मध्ये आणि ७ मध्ये जी विधाने केली गेली आहेत त्यांचा मी येथे एकत्रच समाचार घेणार आहे. यासबंधीची विधानेही चुकीची व तर्कविसंगत आहेत. एकदा नंदू राजे म्हणतात की,'एकटा जीव'ची पटकथा दादांनी शरद तळवलकरांच्या मदतीने अर्धीअधिक बदलून घेतली. एकदा तर पटकथेचे सर्व श्रेय ते तळवलकरांच्या खिशात टाकतात. मी पटकथा भोंगळ लिहिली असेही म्हणतात आणि इतके होऊनही पुन्हा चित्रपटाच्या शेवटाबद्दल माझा आग्रह होता म्हणून दादांनी तो पसंत नसताही मान्य करून तडजोड केली असेही म्हणतात. यात कशाचा कशाला काही मेळ आहे का? अरे, ज्याची पटकथा तुम्ही अर्धीअधिक बदलू शकता त्याने लिहिलेला शेवट बदलायला तुम्हाला कोणी हरकत घेतली होती? पटकथेचं सर्व श्रेय तळवलकरांना देत असाल तर शेवटचे तथाकथित अपश्रेय आमच्या माथ्यावर का? तरी बरं, 'एकटा जीव'ची संपूर्ण कथा त्याच वर्षी चित्रपट लागण्यापूर्वी 'आवाज'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती. ती कथा सुद्धा दादांनी व तळवलकरांनी दुरुस्त केलेली होती असे नंदू राजेंनी लिहिले नाही हे माझे सुदैव! परंतु पटकथेच्या बाबतीत श्री. शरद तळवलकरांनी खुलासा करणे अधिक योग्य ठरेल, ते तसा तो करतील अशी मी आशा बाळगतो.

'एकटा जीव सदाशिव' या चित्रपटाचे नाव 'मानसापरीस मेंढरं बरी' असे ठेवावे असे माझे मत होते. 'आवाज'मध्ये प्रसिद्ध झालेल्या कथेला हेच नाव मी दिले आहे, पण 'एकटा जीव सदाशिव' हे नाव दादांनी कथा तयार होण्याच्या आधीच ठरविले होते. कथेशी संबंध असो वा नसो–नाव आधीच ठरवायचे हा दादांचा खाक्या! त्याचेच दुसरे उदाहरण म्हणजे 'आंधळा मारतो डोळा.' हेही नाव कथा तयार होण्याआधीच ठरले होते. कथेचा आणि नावाचा काय संबंध आहे हे अजूनही मला कळलेले नाही. नाव कॅची पाहिजे हीच दादांची धारणा आहे. 'एकटा जीव'च्या शेवटच्या बाबतीत आम्ही कसलाही आग्रह धरला नव्हता. दादांनाच ट्रॅजिडीची अॅलर्जी आहे. 'एकटा जीव'मध्ये त्यांच्यावर एकच करुण प्रसंग रंगवायची वेळ आली होती, त्यावेळी करुण अभिनय करताना अनेकदा त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. शेवटी अभिनय चांगला केला ही गोष्ट वेगळी. परंतु प्रेक्षकांनी थिएटरबाहेर पडताना गंभीर चेहऱ्याने बाहेर पडू नये–हसत बाहेर पडावे हे दादांचे सूत्र आहे. कलात्मकता किंवा कलात्मक उंची वगैरे गोष्टी फालतू आहेत असे त्यांनीच या मुलाखतीत आवर्जून सांगितले आहे. नावाप्रमाणे चित्रपटाचा अर्थ असावा असा प्रश्नच नव्हता. चित्रपटाचा शेवट कथेप्रमाणे नसून दादांच्या प्रकृतीप्रमाणे आहे. 'सोंगाड्या'चा शेवट जसा नायिकेच्या मिठीत झाला तसाच 'एकटा जीव'चाही शेवट नायिकेच्या सान्निध्यात व्हावा ही दादांची नॅचरल इन्स्टिंक्ट होती. उलट प्रेक्षकांची नाडी आमच्यापेक्षा दादांना जास्त कळते असे आजही माझे मत आहे आणि त्यावेळीही होते. शिवाय चित्रपट हा कथेसाठी नसून प्रेक्षकांना काय आवडते ते देण्यासाठी आहे, हे तर दादांचे मुलाखतीत व्यक्त झालेले प्रमुख विचारसूत्र आहे. त्याच्याशी 'एकटा जीव'चा शेवट पूर्णपणे सुसंगत आहे.

यासंबंधात एक गोष्ट मला समजली नाही ती अशी की, 'एकटा जीव सदाशिव' हा दादांचा यशस्वी रौप्यमहोत्सवी चित्रपट आहे. तो लागून गेला–त्याचा जवळ जवळ धंदा होऊन गेलेला आहे. असे असताना बाकी सर्व सोडून 'एकटा जीव'च्या शेवटाबद्दल या मुलाखतीत दादा वारंवार का हळहळताहेत? याचे उत्तर मला तरी सापडलेले नाही. एखादी लहानशी जखम पूर्ण बरी होऊन गेल्यावर चारपाच वर्षांनी त्या जखमेची आठवण काढून दुःखाने विव्हळण्यासारखे हे विसंगत वाटते. शिवाय 'एकटा जीव' ही जखमही नव्हती!

या 'एकटा जीव'च्या शेवटामुळे मी व गोविंद कुलकर्णी दादांच्या सेटअपमध्ये राहिलो नाही, असे श्री. राजे यांनी जे सूचित केले आहे ते तद्दन असंमजसपणाचे आहे. श्री. गोविंद कुलकर्णी का राहिले नाहीत, याची हकीकत मागे आलीच आहे. माझी हकीकत पुढे येणार आहे. दादांना 'एकटा जीव'चा शेवट कचलात्मक करण्याची इच्छा होती असे भासवून दादांना नको असलेली कलात्मकता त्यांच्या माथ्यावर मारण्याचा श्री. नंदू राजे यांचा हा का अट्टाहास आहे, हेच कळत नाही.

माझे आणि दादांचे संबंध बिघडले कसे या प्रश्नाला उत्तर देताना दादांनी जी विधाने केली आहेत ती संपूर्णपणे चुकीची आहेत. मी 'एकटा जीव'ची कथा मन लावून लिहिलीच नव्हती, पटकथा तद्दन भोंगळ होती, राम निवासमध्ये घेतलेल्या खोलीत मी आणि गोविंदराव कुलकर्णी 'एकटा जीव'च्या कथेऐवजी भलत्याच कथेची चर्चा करीत होतो, वगैरे भरमसाट विधाने दादांनी केली आहेत. दादा काही वेळा विनोदी थापा मारतात त्याचाच हा भाग असेल तर हरकत नाही. पण तो तसा नसावा. ही सर्व विधाने जाणूनबुजून खोडसाळपणाने केलेली आहेत. दादांना आम्ही फसवलं असा भास निर्माण करण्याचा हा बेडगळ प्रयत्न आहे.

पहिली गोष्ट म्हणजे 'एकटा जीव सदाशिव'ची पटकथा मन लावून लिहायचीच

नसती तर पुण्याच्या 'स्वस्ति' व 'मेघदूत' लॉजमध्ये मी ८१८ दिवस कशासाठी जाऊन राहिलो होतो ? आणि मन लावून न लिहिण्याचे कारण काय होते ? 'सोंगाडया'च्या वेळी मला पटकथेबद्दल आत्मविश्वास नव्हता, पण ती स्थिती 'एकटा जीव'च्या वेळी नव्हती. पटकथा तद्दन भोंगळ होती हे दादांना चित्रपट तयार होऊन, लागून त्याचे पैसे मिळून गेल्यावर मग कळले काय ? पटकथा तयार झाली त्यावेळी अशा प्रकारचा एक शब्दही ते बोलले नव्हते–माझ्याजवळ वा दुसऱ्या कोणाजवळही ! तद्दन भोंगळ असलेली पटकथा घेऊन कुठलाही शहाणा निर्माता चित्रीकरणास सुरुवात करणार नाही. हीही पटकथा थोडी मोठी झाली होती व ती आयत्यावेळी कापावी लागली. काही प्रसंग काढून टाकावे लागले. तसेच एक दोन प्रसंग दादांनी व शरद तळवलकरांनी मिळून वाढविले. त्याबाबतीत माझा एवढाच आक्षेप होता की, मला त्यांनी आधी सांगायला हवे होते. पण ते प्रसंग रंगतदार होते म्हणून मी थोडासा नाराज होऊनही त्यांना मान्यता दिली.

माझ्या माहितीप्रमाणे दादांबद्दल निर्माण झालेली ही पहिली नाराजी. तीही मी मनातून काढून टाकली आणि 'एकटा जीव'च्या दिवाळी अंकातील जाहिरातींची डिझाइन्स बनवणे, जाहिरातींचे वाटप करणे, जागा राखून ठेवणे ही कामेही मी 'सोंगाडया-' प्रमाणेच केली. 'एकटा जीव'च्या प्रदर्शनाच्या वेळी दादा आणि गोविंदराव कुलकर्णी यांच्यामध्ये जो बेबनाव झाला होता त्यात मी गोविंदरावांच्या वतीने दादांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि मी गोविंदरावांच्या बाजूचा आहे असा दादांचा समज होऊन ते थोडे दूरत्वाने वागू लागले. 'एकटा जीव'च्या रौप्यमहोत्सवाच्या वेळी मी हजर होतो. दादांच्या बोलण्या–वागण्यात बराच फरक पडला होता. तरी मी त्याकडे दुर्लक्ष केले. तथापि भाषण करताना मात्र 'दादांना उत्तरोत्तर अधिक यश मिळो आणि ते यश पचविण्याचे सामर्थ्य मिळो,' असे मी जाहीरपणे सांगितले होते. ही गोष्ट दादांना लागली. 'यश मी केव्हाच पचवले आहे.–मला उपदेश करणाऱ्यांनाच यश पचले नाही.' असे ते अनेक ठिकाणी बोलल्याचे माझ्या कानांवर आले. तरी मी त्याबद्दल त्यांना कधी विचारले नाही.

'सोंगाडया' चित्रपटाच्या लिखाणाचे पैसे 'सोंगाडया'चा रौप्यमहोत्सव होईपर्यंत मी मागितले नव्हते किंवा दादांनी दिले नव्हते. रौप्यमहोत्सव समारंभाच्या वेळी सर्वसंबंधितांना बोनस म्हणून किती किती पैसे द्यावेत याची योजना दादांनी माझ्याच सल्ल्याने तयार केली होती. अर्थात त्या यादीत मी माझ्याबद्दल काहीच नमूद केले नव्हते. मला बोनस म्हणून काय द्यावयाचे हे दादांनीच ठरवावे – माझी काहीही अपेक्षा नाही, असे माझे मत होते. दादांनी समारंभात जोरदार भाषण केले आणि 'सवनीससाहेबांना मी काय देणार ? हे सर्व त्यांचेच आहे – त्यांनीच उभे केले आहे. म्हणून मी त्यांना कोरा चेक देतो. त्यावर त्यांनी काहीही आकडा घालावा.' – असे सांगून जबरदस्त टाळ्या मिळविल्या होत्या. मीही दादांच्या उदारपणाने काहीसा गहिवरून गेलो होतो. त्यांनी मला मिठी मारून माझ्या हाती दिलेला कोरा चेक तसाच खिशात ठेवला. समारंभ झाल्यानंतर कुणीतरी विचारले म्हणून मी चेक दाखविला. चेक इतका कोरा होता की त्यावर दादांची सहीसुद्धा नव्हती – हे दिसून आले. नंतर दादांनी, आकडा ठरविल्याशिवाय चेकवर सही करणार नाही असा हट्ट धरला. श्री. गोविंदराव कुलकर्णी यासंबंधी मला विचारू लागले तेव्हा मी हेच सांगितले की, ते दादांनी ठरवावे. मी काहीही सांगणार नाही. अपेक्षा एवढीच आहे की, निदान मला 'सोंगाडया'च्या लिखाणाचे पैसे तरी मिळावेत. बोनस म्हणून दादांनी एक रुपया जरी दिला तरी माझी हरकत नाही. कारण मला द्यायचे हा सर्वस्वी त्यांच्या इच्छेचा प्रश्न आहे. शेवटी लिखाणाचे ५ हजार व बोनसचे ५ हजार असे १० हजार द्यावेत, असे ठरल्यावर दादांनी सही केली. तरीही मी दादांवर नाराज नव्हतो. दादांनी केलेला एक विनोद म्हणून ते फारसे मनावर घेतले नाही.

'सोंगाडया' नंतर गोविंदराव कुलकर्णी यांना दिग्दर्शक म्हणून घेऊ नये असा दादांचा विचार होता. पण त्यावेळी मी त्यांना हा विचार सोडायला लावला. जो माणूस तुमच्यासाठी राबला, त्याला लगेच दूर करणे कृतघ्नपणाचे ठरेल. बरं, त्याला तसे कारणही नव्हते. त्यांनी पहिला चित्रपट १ लाख २५ हजारांत म्हणजे बजेटमध्ये पुरा केला होता. तो यशस्वी झाला होता. दादांनाही ते पटले आणि 'एकटा जीव' हा चित्रपटही गोविंदराव कुलकर्ण्यांकडे देण्याचे त्यांनी ठरविले. यावरून तिसऱ्या चित्रपटाला गोविंदराव राहतील की नाही याची मला खात्री नव्हती. म्हणून मी त्यांनाही तशी सूचना दिली होती. पुढे 'एकटा जीव'च्या प्रकाशनाच्या वेळी दादांशी त्यांचा जो खटका उडाला त्यामुळे तर माझी आणि त्यांचीही खात्री झाली की, पुढचे चित्र मिळणार नाही. तरीही ते आशा धरून थांबले. 'आंधळा मारतो डोळा'ची तयारी सुरू झाली आणि श्री. दिनेश यांना दिग्दर्शक म्हणून घेतल्याचे समजले. श्री. गोविंदराव कुलकर्णी यांचा उपजीविकेचा व्यवसाय चित्रपट हाच होता. तेव्हा त्यांना स्वतःचा विचार करणे प्राप्तच होते. म्हणून त्यांनी दोघा–तिघांना जमवून स्वतःच चित्रपट काढण्याचे ठरविले. माझाही सल्ला त्यांनी घेतला. त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहणे आवश्यक होते म्हणून मीही त्यांच्या योजनेला पाठिंबा दिला. त्या माणसाची कष्ट करण्याची ताकद, कामाची तळमळ, स्पष्टपणा व प्रामाणिकपणा मी अनुभवला होता. तेव्हा त्यांनाही मदत करावी असे मला वाटले. म्हणून मी त्यांना काहीही पैसे न घेता कथा, पटकथा, संवाद व गाणी देण्याचे कबूल केले. त्याचा दादांना राग आला असावा. मी फक्त दादांसाठीच लिहीन अशी काही माझी प्रतिज्ञा नव्हती. मी कुणासाठीही लिहायला स्वतंत्र होतो आणि आहे. कथेच्या मोबदल्यात श्री. गोविंदरावांनी मला भागीदारी देऊ केली. पण मला ती स्वीकारता येत नव्हती म्हणून त्यांनी माझ्या पत्नीच्या नावे भागीदारी दिली. भागीदारी हा प्रकार माझ्या प्रवृत्तीशी न जुळणारा आहे. केवळ कथेसाठी भागीदारी प्रकार मला बरा वाटेना म्हणून मी पत्नीला माझ्या ओळखीच्या लोकांकडून कर्जाऊ पैसे आणून दिले. तिने ते कंपनीला दिले.

भागीदारीच्या संदर्भात जाता जाता एक गोष्ट सांगितली पाहिजे की, 'विच्छा' तुफान चालू लागल्यावर एका प्रसिद्ध व्यक्तीने मला 'विच्छा'चे प्रयोगाचे हक्क अडवून

दादांकडून निम्मी भागीदारी मागण्याचा सल्ला दिला होता. पण मी तसे केले नाही. आणि हे सर्व मी दादांनाही सांगितले होते. ती वेळ अशी होती की, मी हक्क अडवले असते, तर दादांनी ५० टक्केच काय, पण ९० टक्केसुद्धा भागीदारी दिली असती. परंतु ते मला करायचे नव्हते. दादा भक्कमपणे उभे राहावेत, मोठे व्हावेत याच एका हेतूने मी 'विच्छा'ची जबाबदारी अंगावर घेतली होती. उलट 'विच्छा' चांगली उभी राहिली तेव्हा दादांना मी असा सल्ला दिला होता की, 'तुम्ही, तुकाराम शिंदे, परशुराम मोहिते आणि राम नगरकर असे चौघे भागीदार व्हा आणि संस्थेची कामे वाटून घ्या. त्यांनाही बरे वाटेल आणि संस्थाही नीट चालेल.' पण दादांनी माझा हा सल्ला धुडकावून लावला. तसे झाले असते तर, आज बाकीच्या तिघांच्याही आयुष्याचा प्रश्न सुटला असता.

तेव्हा, गोविंदरावांना मदत करायला मी निघालो आहे, हे दादांना रुचले नाही. तेव्हापासून दादा माझ्याबद्दल पाठीमागे अद्वातद्वा बोलू लागले. तेही मी मनावर घेतले नाही. या सर्व घटना 'एकटा जीव सदाशिव'च्या रौप्यमहोत्सवानंतर दादांची 'आंधळा मारतो'ची तयारी सुरू झाल्यानंतर घडलेल्या आहेत. तेव्हा 'एकटा जीव'च्या डिस्कशनच्या वेळी आम्ही काही दुसरेच प्लॅन आखत होतो हे म्हणणे कसे खोटे आहे, हे दिसून येईल. दादा गोविंदरावांच्याबद्दल ज्या तिरस्काराने बोलत होते ते लक्षात घेता गोविंदरावांबरोबरचा माझा व्यवहार त्यांना सांगणे मला इष्ट वाटले नाही. तरी त्यांना सर्व बातम्या मिळतच होत्या ही गोष्ट वेगळी ! दादांनी जो 'जोड वागणे', 'जोड वागणे' म्हणून कांगावा केला आहे ते 'जोड वागणे' हे होते. तरी 'विच्छा'चा व्यवहार सुरळीतपणे चालू होता. मी सर्व कामे करीतच होतो. 'ह्या नाऱ्या झिंदाबाद !' हा चित्रपट त्यांची डोकेदुखी आहे हे लक्षात आल्यावर मुद्दाम हा विषय काढून त्यांच्याशी बोलण्याचे मला कारण नव्हते. गरजही नव्हती.

दादा म्हणतात की, आमचे संबंध तुटायला 'एकटा जीव'पासून सुरुवात झाली आणि 'ह्या नाऱ्या'च्या मुहूर्ताच्या वेळी ते पूर्णपणे तुटले. हे खरे नाही. हा प्रवास 'एकटा जीव' ते 'ह्या नाऱ्या' असा नसून 'ह्या नाऱ्या' ते 'आंधळा मारतो डोळा' असा आहे. 'आंधळा मारतो'चा इतिहास सांगणे अगत्याचे आहे. कारण दादांच्या आणि माझ्या संबंधाचा प्रमुख धागा त्यातच तुटला. आणि त्याला जबाबदार दादाच आहेत. मी दादांच्या अनेक चुकांकडे, गफलतींकडे दुर्लक्ष केले, परंतु याबाबतीत मला कठोरपणे वागण्याखेरीज गत्यंतरच नव्हते.

'आंधळा मारतो डोळा'ची कथा त्यांनी श्री. राजाराम गोलतकर यांच्याशी चर्चा करून आणली होती. त्याचे संवाद मी लिहावेत असा त्यांचा आग्रह होता. मी ते टाळण्याचा प्रयत्न केला. त्याचे एक कारण असे की, दुसऱ्याच्या कथेवर संवाद लिहिताना काही न पटलेला भाग असेल तर, पंचाईत होते. तसा 'आंधळा मारतो'मध्ये माझ्या मते बराच भाग होता. मी दादांना जमणार नाही म्हणून सांगितले. नंतर आम्ही 'विच्छा'चा दौरा घेऊन उत्तर भारतात गेलो. त्या दौऱ्यात दादांनी संवादासाठी फारच गळ घातली. 'तुमचे संवाद असल्याशिवाय मी शूटिंगच सुरू करणार नाही. तुम्ही म्हणाल तितके दिवस थांबण्याची माझी तयारी आहे.' असे त्यांनी पुनःपुन्हा मला सांगितले. दादांच्याबद्दल पूर्वीइतका जिव्हाळा राहिला नव्हता, तरी मी त्यांच्या हट्टाखातर संवाद लिहायला तयार झालो. दोन-तीन आठवड्यात संवाद लिहून मी पुरे केले. दादांच्या ऑफिसमध्ये स्क्रिप्टचे वाचनही झाले. त्यावेळी दादा, प्रभाकर पेंढारकर, बाबूराव गोड वगैरे मंडळी हजर होती. त्यांतील दोन-तीन प्रसंगांवर चर्चा होऊन ते प्रसंग बदलावेत असे ठरले. त्याप्रमाणे मी प्रसंग बदलून लिहायचे व ७/८ दिवसांनी सर्वांनी पुन्हा भेटायचे असे ठरले. मी ते प्रसंग बदलून लिहिले आणि दादांना कळविले. श्री. प्रभाकर पेंढारकरांना केव्हा वेळ आहे ते विचारून तुम्हाला कळवतो, असे दादांनी मला फोनवर सांगितले. पण नंतर ते स्क्रिप्ट नेण्यासाठी दादा माझ्याकडे पुन्हा आलेच नाहीत. त्यांचे शूटिंगही सुरू झाले. अजूनही ते स्क्रिप्ट माझ्याकडेच आहे. नंतर मला कळले ते असे की, मला स्क्रिप्ट लिहायला सांगितले, त्यावेळी त्यांनी श्री. प्रभाकर पेंढारकरांनाही अन्यत्र स्क्रिप्ट लिहावयास बसविले होते. खरे-खोटे कुणास ठाऊक ! पण ज्या अर्थी शूटिंग सुरू झाले त्याअर्थी स्क्रिप्ट कुणीतरी लिहिलेलेच असणार. माझे लिखाण दादांना किंवा पेंढारकरांना पसंत पडले नसेल, तर त्यांनी तसे स्पष्टपणे सांगायला हरकत नव्हती. निदान दादांचे आणि माझे संबंध तरी औपचारिकपणाचे खास नव्हते. ही दादांनी केलेली माझी फसवणूक मला अपमानास्पद वाटली. ज्या माणसासाठी मी इतके कष्ट उपसले होते त्याने मला अशा रीतीने फसवावे, याचा राग आला, दुःख झाले आणि दादांबरोबरील संबंधाचा प्रेमाचा अखेरचा दुवा येथे निखळला.

हे झाल्यानंतर मी दादांना नोटिसवजा पत्र पाठविले आणि यापुढे तुम्ही चित्रपटाच्या संबंधात कोणत्याही कामासाठी माझ्याकडे येऊ नये. तुमच्या माझ्यामध्ये चित्रपट हा विषय संपला आहे असे कळविले. त्याचबरोबर 'विच्छा'चे व्यवस्थापनाचे काम मी करू शकणार नाही आणि 'बतावणी'ही मोफत करणार नाही असेही कळविले. तसेच यापुढे तुमचा व माझा संबंध फक्त व्यवहाराच्या पातळीवर राहील हेही मी स्पष्ट केले होते.

त्यांनी 'विच्छा'बाबतच्या सर्व अटी मान्य केल्यामुळे 'विच्छा'पुरते व्यवहारी संबंध मी शेवटपर्यंत ठेवले होते.

दादांचे आणि माझे संबंध दुरावण्याची खरी कारणे ही अशी आहेत. श्री. नंदू राजे यांनी याबाबतीत जी बंडलबाजी केली आहे, ती खोटी आहे. अर्थात त्यांनाही दोष देता येत नाही. कारण त्या बिचाऱ्या समीक्षकाला हा इतिहास कसा माहीत असणार ? तेव्हा एवढ्याबाबतीत तरी त्यांना क्षमा करायला हरकत नाही.

## लेखांक : ९

'ह्या नाऱ्या झिंदाबाद'च्या मुहूर्ताबद्दल दादांनी जे सांगितले ते खरे नाही. या चित्रपटाचा मुहूर्त कोल्हापुरातील जयप्रभा स्टुडिओत झाला. त्याचे आमंत्रण दादांना गेले होते. दादांची शुभेच्छा व सुयश चिंतणारी तारही आली होती. गाण्याचे रेकॉर्डिंग हा मुहूर्ताचा भाग नव्हता. गाण्याच्या

रेकॉर्डिंगला सगळ्या गावाला आमंत्रण देण्याची पद्धत नसते. ज्यांच्या चित्रपटाचा मुहूर्तच गाण्यावर होतो तेथे सर्वांना बोलावतात. तेव्हा 'ह्या नाऱ्या'च्या बाबतीत आमंत्रण देण्याचा प्रश्नच नव्हता आणि आमंत्रण देणारा मी कोण ? दादांनी पुढच्या कथेच्या डिस्कशनसाठी मी येऊ का म्हणून मला फोनवर विचारले वगैरे जे सांगितले आहे ते थाप या शब्दाशिवाय दुसऱ्या कशातही बसत नाही. श्रीमती आशाबाई भोसले यांच्यासंबंधी मला काहीही लिहायचे नाही. त्यांना या वादात गोवावे असे मला मुळीच वाटत नाही. पण जाता जाता एवढेच सांगायचे आहे की, आतापर्यंत दादांच्या सर्व चित्रपटांत दादांना गाण्याचा आवाज देणाऱ्या श्री. जयवंत कुलकर्ण्यांना 'तुमचं आमचं जमलं'च्या वेळी दूर का करण्यात आले ? त्याची कारणे जर योग्य असतील तर दादांना दूर ठेवण्याचे कारणही अयोग्य ठरत नाही.

'ह्या नाऱ्या झिंदाबाद' हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही तो चालू नये, चांगल्या थिएटरला लावला जाऊ नये, यासाठीही बऱ्याच खटपटी केल्या गेल्या, याचा इतिहास तसा फारसा जुना नाही; आणि तो धंद्यातील मंडळींना माहीतच आहे. कारण मागे लिहिलेच आहे की, दादांना जसे स्वतःचे अपयश सोसत नाही तसे दुसऱ्याचे विशेषतः एकेकाळी त्यांच्याजवळ असलेल्यांचे यशही सोसत नाही. अशा परिस्थितीत दादांशी कोणत्या नात्याने आणि का संबंध ठेवावेत ? ते दुरावणे अपरिहार्य होते— आवश्यक होते ! किंबहुना मला एक समाधान मोठे आहे. दादांची जोरदार चलती असतानाच मी त्यांच्यापासून दूर झालो. म्हणजे त्यांच्या पैशाचा तिळमात्र मोह मला नाही हे तरी स्पष्ट झाले. त्यांच्याबद्दलच्या प्रेमाने मी त्यांच्याजवळ आलो आणि व्यवसायातील त्यांच्या धूर्तपणामुळे मी त्यांच्यापासून दूर गेलो. त्यात काहीही बिघडले नाही. कारण प्रेम संपल्यानंतर लोढणे होऊन राहण्यात काहीही अर्थ नसतो. उलट दादांना माझ्यामुळे जे एक प्रकारचे बंधन वाटायचे त्यातून त्यांची सुटका झाली. ते काहीही करायला, काहीही बोलायला, कुणाचाही सल्ला घ्यायला मोकळे झाले. नाही म्हटले तरी त्यांनी मोठ्या भावाचा मान मला दिल्यामुळे त्या नात्याचा थोडातरी धाक राहतोच. तोही आता त्यांना राहिलेला नाही. प्रचंड यश, अफाट लोकप्रियता व अमाप पैसा मिळाल्याने त्यांना सल्ला देण्यासाठी मोठमोठी माणसे मिळू शकतात. चित्रपटधंद्यातील धनुर्धरांचा सल्लाही त्यांना उपलब्ध होऊ शकतो ! अशा रीतीने माझ्या दुरावण्याने त्यांचा उलट फायदाच झालेला आहे, आणि दुसऱ्याचा फायदा झाल्याने मला वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही !

दादांनी त्यांच्या पद्धतीच्या विनोदाने भरलेली, पण कलात्मकतेशी मुळीच संबंध नसलेली धमाल विनोदी चित्रे त्यांना पाहिजे तशी काढावीत. त्यांना आता चारी दिशा मोकळ्या आहेत. त्यांना कुणीही काहीही म्हणणार नाही. शिवाय त्यांना तसे कुणावर अवलंबून राहण्याचीही आवश्यकता नाही. ते कथा बांधू शकतात, विनोदी प्रसंग निर्माण करू शकतात, कॉमेडी लिहू शकतात, गाणी करू शकतात, संगीत दिग्दर्शकाला चाली शिकवू शकतात, दिग्दर्शनही करू शकतात. (निदान बक्षीस मिळाल्यामुळे तरी असे म्हणणे प्राप्त आहे !)

माझी प्रार्थना आहे की, दादांनी स्वतःच्या कल्पनेप्रमाणे एकाहून एक यशस्वी चित्रे काढावीत आणि त्यांना भरघोस यश मिळावे !

खऱ्या–खोट्या प्रसिद्धीसाठी लागतील तेवढे नंदू राजे त्यांच्या दरबारी हजर होतीलच !

□

पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०